सहामाही ३ " " ८
सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास.....८४

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV AKOLA MONDAY OCTOBER 6 1890 NO 39

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख ६ माहे आक्टोबर सन १८९० इ० अंक ३९

वामन गोपाळ यांचा अनेक औषधे मिश्रित

सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, (गरमी) व जिवापासून होणारे पक्षवा तादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गोतमराव केशव, मुंबई.

सचित्रक्याटलाग

आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

नोटीस

निजाम उद्दीन वलद ढोलन मिरजा पाटील मुसलमान राहणार वडगांव हसनपूर तालुके जळगांव यांस नोटीस देणार गुलाबचंद ईश्वरदास साहूदुकान धानोरा नोटिशीनें असें कळविलें जातेंकीं, तुह्मी व आह्मी मिळून कपाशीचा व्यापार सरकतीनें केला त्यांत माल खरेदी करितां तुह्मी रुपये आह्मापासून नेलें त्याजबद्दल व सर्व कपाशीच्या व्यापारा बद्दल आज पावेतों तुह्मी आह्मांस सर्व हिशोब दाखवून नफा नुकसान एकमेकांनीं वाटून घ्यावें द्यावें.

१ तुह्मी आमचे कर्ज रुपये ७००० सात हजार देणें त्याचे हप्तेबंदी दरसाल रुपये ४४० च्यारशें पंचेचाळीस देण्याचे ठरवून आज पावेतों एकही हप्ता दिला नाहीं. व चालू खातीं तुह्मी रुपये उचलले त्यापैकीं कांहीं रुपये तुह्मी दिले. व बाकीचे बद्दल पुरी सफाई केली नाहीं.

२ तुमचे बंधु बद्दल तुह्मी जामीन आहा व त्याजकडे जे रुपये येणें त्याच्या सालबंद्या करून दिल्या आहेत परंतु आजपावेतों सालबंदीची सफाई केली नाहीं. याजकरितां ह्या नोटिसें असें कळविलें जातें कीं, नोटिस पावल्या पासून पंधरा दिवसांत सर्व सदरा लिहिलेला निकाल करावा असें झाले नाहींतर रिती प्रमाणें काम चालवून अखेर निकाल होई पर्यंत ह्या नोटिशीचे खर्चा सुद्धां सर्व नुकसान भरून घेतली जाईल ह्मणून दीली नोटीस सही तारिख २९ माहे सप्टेंबर सन १८९० इसवी.

(सही)
गुलाबचंद ईश्वरदास साहूदुकान
धानोरें दस्तुर खुद

पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्र कर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पातुर्डी ३०।९।९०

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांस. सा. न. वि. वि.

हवा— उत्तरा नक्षत्राचे पावसानें बाहार करून दिली व अजून पाऊस येत आहे शेतीवाले आनंदात आहेत.

देवस्थान— येथील श्री मारूतीचे देवास आज पर्यंत देऊळ नव्हतें हल्लीं आमचे येथील. रा. रा. रावजी दादा पाटील यांणी चांगली खटपट करून वर्गणी जमा करून देवळास काम चालविलें आर्थे काम होत आलें. देवळाचें काम पुरें झाल्यावर पुढें सभामंडप करावा असें त्यांचें मत दिसतें व तें हें काम फार लक्षपुर्वक करीत आहेत.

चोऱ्या शेतांतील उंभपीक कडबा गवत फार चोरीस जात आहे एकदोन शेतांत तर फारच ह्मणजे निदान ०।१० दाहापणाचें नुकसानीचा कडबा एकाच रात्रींतून गेला. चोर गांवचे आहेत पण शेतांत सांपडत नाहींत. आज ६० सहीचा अर्ज मे. डे. कमिशनर साहेब याजकडेस देण्याकरितां तयार झाला आहे अर्ज देण्याकरितां रा. रा. शंकरराव देशमुख हे आकोल्यास जात आहेत तरी साहेब बाहादुर आह्मा गरीब लोकांस मदत देतील ही आशा आहे चोर धरण्यास गांवकरी पाटील पुष्कळ खटपट करीत आहेत.

सर्प — बानखेड येथें रानांत एक सर्प नीघाला होता त्यानीं एक हरीण गिळला येथील पुष्कळ लोक पाहून आले सर्प मारला मोठाहोता.

गांवसफाई — गांवांत मोऱ्यांचें पाणी काढण्याचे कूर होतें तें सर्व बंद करून जें आड जमीनी बरोबर होतें त्यांचीं तोंडें उंच बांधण्याचीं कामें सपाट्यानें चालूं आहेत. कळावें ही विनंती

आपला
[क्ष]

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ८ शके १८१२

सिंहावलोकन

आमच्या भाग्यशाली अथवा हतभागी— कांहीं ह्मणा— देशावर ह्या शतकाच्या अगोदर पुष्कळ पराक्रियांनीं स्वाऱ्या करून अनेक प्रकारें लोकांचे छळ केले व अपार संपत्ति— सौभाग्य भांडार लुटून नेलें परंतु परमेश्वराच्या आह्मी कसोटीस उतरल्यावर त्यास दया येऊन त्यानें हल्लीं अम्हांस इंग्रज सरकारच्या छत्राखालीं आसरा दिला आहे व वर्षांगणती भोगलेल्या यातनापासून आमची त्या जगनियंत्यानें सुटकाकरून शांतता व स्वास्थ्य ह्यांचा उपभोग घेण्यास आह्मांस कोणत्याही प्रकारचा अडथळा ठेविला नाहीं ह्या बद्दल आम्हांस त्याचे खरोखरच अभार मानिले पाहिजेत.

एकाच स्थितांत रहाण्याचें कंटाळवाणें वाटतें, किंवा कोणत्या तरी व्यवसायावांचून दिवस कंठणें जड वाटत म्हणून मनुष्यप्राणी कोणत्या तरी खटपटींत असणारच, व आहे ती पेक्षां अधिक सुखावह अशा वाटणाऱ्या स्थितीकडे हरप्रयत्न करून जाण्याचे उद्योगांत असणें हा त्याचा स्वाभाविक गुण आहे. ह्या तत्वास आमच्या देशानेंही अनुसरून विद्यमान काळापर्यंत त्यानें आपली रहाटी ठेविली आहे. पेशवाईत किंवा मुख्यत्वें तिच्या अगोदरच्या मोगलाईत आमच्या लोकांच्या मागें बरीच लचांडें लागलेलीं असत. संसार सागरातून सुखरूप पैलतीरास जाऊन पोहचण्याचें साधन जें धन व सर्व वस्तुपेक्षां प्रिय जो प्राण ह्या दोन्ही अमोलिक व दुर्मिळ व स्तूच संरक्षण करण्याची बहुतेक जबाबदारी ज्याची त्यावरच असल्या कारणानें त्या काळीं आमचे सर्व विचार शक्तीची प्रेरणा तिकडेच होत असे. त्या वेळचा जीवनार्थ कलह काळ जरी नव्हता तरी आहे त्याचें संरक्षण आजच्या प्रमाणेंच उद्यां कसें होईल ह्याची घोर चिंता वाहण्यांत आमचा बहुतेक काळ व संरक्षणार्थ उपाय योजण्यांत आमच्या बहुतेक विचार शक्तीचा उपयोग होत असे. व त्या योगानें आम्ही जसें होतो तसेंच राहिलों इतकेंच नव्हे तर आम्हास उतरती कळा लागत चालली आमच्या सर्व मान्य पूर्वजांनीं घालून दिलेले नियम व करून ठेवलेलें शोध यांच्याकडे बहुतेक दुर्लक्ष होऊन आम्हास अगदीं निराळें स्वरूप आलें. 'धडस्वार्थ ना परमार्थ' अशी आमची स्थिती झाली व मराठे शाई जर गाजली नसती तर हिंदु हें नांव ऐकावयास सांपडतें किंवा नाहीं कोण जाणें व तुकारामादि साधुतत्ववेत्ते व मोरोपंतादि पंडिता सारखी रत्नें जर आमची आर्यभू प्रसवली नसती तर आमची रानटी अजागळ लोकांत बसून रहाण्याची पाळी आली असती. सारांश, आमच्या ऋषी पूर्वजांनंतर चा आमचा बहुतेक सर्वकाळ विपत्ती संकटे व यातना भोगण्यांतच गेला. ह्या काळांत आमचें पाऊल मागेंच हटत चाललें होतें व आमची असलेली स्थिती अधिक सुखावह व उत्कर्षदायक होण्यास आमच्या कडून क्वचितच प्रयत्न करण्यांत आले. इहलोकींच्या क्षणिक परंतु अवश्य असलेल्या सुखसाधनांचे मार्ग परकीयांच्या आधीन असल्या कारणानें परलोकच्या अखंड सुखानंदाचा लाभ जोडण्यांत आमच्या कांहीं विद्वान अथवा सुधारे लोकांचा काळक्षेप झाला व अधिकार सूत्रें तिसऱ्यानेंच बळकावल्या कारणानें जातिभेद असतांही वैमनस्य वाढण्याचा मार्ग कुंठित झाला हेंच काय ते दोन फायदे आमच्या वांट्यास आले असें दिसतें. परंतु हल्लीचे मन्वंतर बरीक अगदीं फिरलें आहे.

इंग्रज लोकांचा सहवास आज निदान पन्नास वर्षे तरी आम्हांस आहे. ह्या अवधी

तकाच्या अवधींत त्यांच्या रीतरिवाजाचें अनुकरण करण्याची आमची लहर लागल्यानें आमच्या एकंदर समाजांत बरीच धांदल उडून गेली आहे. व भाविकाळ सुखावह होईल किंवा नाहीं ह्याची काळजी उत्पन्न झाली आहे. तेव्हां ही होऊन राहिलेली चळवळ आपला मार्ग चुकवीत आहे कीं काय व चुकत असल्यास राजमार्ग कोणता हे शोधून काढण्याचे कामांत प्रत्येक विचारी मनुष्याला आपल्या डोक्याचा उपयोग केला पाहिजे.

(पुढें चालू)

अकोले येथील स्मालकाज कोर्ट बंद होऊन सुमारें आज दीड महिना होत आला आहे परंतु अद्याप त्याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचें लक्ष कसें जात नाहीं हें कांहीं समजत नाहीं. अधिकारी नसला ह्मणजे एखादे कोर्ट बंद ठेवायाचे ही स्थिती इकडे हमेशा चालूच आहे. त्या बद्दल आम्ही पुष्कळवेळा सूचना केल्या आहेत व पक्षकार लोकांना त्याचप्रमाणें वकील लोकांना अशीं कोर्टें एकदम बंद ठेवल्यामुळें कितपत त्रास होतो हें पुष्कळवेळां दाखविले आहे परंतु त्यापासून कांहीं व्यवस्थेत सुधारणा झाली आहे असें तर अद्याप आढळून आलें नाहीं. केवळ अधिकारी नसल्या मुळें अशी स्थिति होते ह्मणावी तर तसें ही कांहीं दिसत नाहीं. कित्येक वेळां असें दिसून येतें कीं कित्येक अधिकारी काम नसल्यामुळें स्वस्थ रिकाम फाडित बसत असतात. व कित्येक कांहींच अधिकार नसल्यामुळें कचेरींत येऊन कशीतरी हजरी लावित असतात व कांहीं कोर्टें अधिकारी नाहींत ह्मणून बंद असतात. असें होण्याचें खरें कारण काय असेल तें असो. गुदस्त साली येथें काय ते तीन अधिकारी होते व सर्व कोर्टांची कामें मुरळीत चालली होतीं. परंतु हल्लीं येथें चार अधिकारी व शिवाय डे. क. असून स्मालकाज कोर्टावर काम करण्यास मनुष्य नाहीं. मि. गणेश बापुजी यांची नेमणूक होऊन सुमारें १॥ महिना झाला आहे परंतु अद्याप त्यांना दिवाणीचा कांहींच अधिकार मिळत नाहीं. ते नवें असल्या मुळें त्यांना स्मालकाज अधिकार देणें जर रास्त दिसत नाहीं तर दुसरे जे कोणी जुने असतील त्यांना ते अधिकार देऊन यांची त्या जागीं योजना केली ह्मणजे झालें मि. एकनाथ गोरेश्वर यांना जर स्मालकाजचे अधिकार देता येतात तर मग यांना देण्याला काय हरकत आहे. हें कांहीं समजत नाहीं. तहशिलदारीचें काम जसे ते करीत आहेत तसेंच हे ही त्यांच्या पेक्षां कांहीं जास्त पावसाळे तहशिलदार आहेत. कदाचीत् जगाचा अनुभव त्यांना थोडासा वयाअधिक्यामुळें जास्त असेल ही गोष्ट खरी आहे. जगाचा अनुभव कमी असल्यामुळेंच स्मालकाजचे अधिकार मिळण्यास नालायकी येते असें ह्मणावें तर मि. म्यागील साहेबांना ते अधिकार मिळू शकले एकंदर कोणच्या तत्वावर व्यवस्था होते हे समजणें फार गूढ आहे तरी एवढें मात्र खरें आहे कीं येथील कोर्टावर अधिकारी नसल्या मुळें पक्षकार लोकांस त्रास होऊन विनाकारण जाण्यायेण्यांत व भत्ते भरण्यांत खर्च सोसावा लागत आहे व सर्व कोर्टांतील नौकर मंडळी काम नसल्यामुळें सरकारचा विनाकारण पैसा खराब करीत आहे. तर या कडे लक्षदेऊन वरिष्ठ अंमलदार कांहीं तरी योग्य योजना लवकर करतील.

हिंदुस्थानांतून इंग्लंडास तेथील लोकांस हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेची व प्रजेच्या सुख दुःखाची माहिती देण्या करितां डेलिगेटस (हिंदुस्थानांतील लोकातर्फे मुखत्यार) गेले होते त्यांनीं इंग्लंडांत निरनिराळ्या ठिकाणीं मोठमोठ्या सभा भरवून त्यामध्यें जी भाषणें केलीं तीं मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांस कळण्या करितां भाषांतर रुपानें खालीं दिलीं आहेत.

फिन्सबेरी येथें भरलेली सभा.

इंग्लडदेशांत हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेनें नेमलेली ब्रिटिश कमेटी आहे तिच्या मार्फतीनें हिंदुस्थानांत कायदे कौन्सिलांत सरकार तर्फे लोक निवडले जातात ते तसे न निवडले जातां लोकांनीं निवडावे अशा करितां ज्या जाहिरसभा भरल्या त्यांमध्यें या ठिकाणीं जी सभा भरली ती पहिली होय. ही सभा सोमवारी तारीख १४ एप्रील रोजीं क्लरकनवेल रस्त्यावर फारेस्टर्स हॉल ह्मणून एक इमारत आहे त्यामध्यें भरली. त्या ठिकाणीं लोकांचा जमाव चांगला जमला होता. सर व्युलयम वेडरबर्न ब्यारोनेट साहेब यानीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें.

मि. डिग्बी साहेब (हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेनें इंग्लंडांत नेमलेली ब्रिटीश कमेटी आहे तीचे सेक्रेटरी) यानीं मिस्तर जेम्सरोडम् पार्लमेंट सभेचे मेंबर, तसेच मिस्तर बेंजामीन ल्युक्राफ्ट, रेवरन्ट फ्रियिय फास्ट, व मिस्तर जे रेनिक सीगर यांजकडून सभेची मागितल्या बद्दल व चालले काम आमचे पसंत आहे अशा अर्थाची पत्रें आलीं होतीं तीं वाचून दाखविलीं. त्यानंतर अध्यक्ष साहेब यानीं आपले भाषणास सुरवात केली. ते ह्मणाले " कुलीनस्त्रीयानों व सभ्यगृहस्थहो आपणा सर्वांस माहित आहे कीं प्राचीन काळचे रोमन राज्यांत कोणत्याही गरीब मनुष्यास सीझर साहेबाकडेस दाद मागण्यास जाण्याचा हक्क असें हिंदुस्थानदेश हें तुमचें राष्ट्र आहे. रोमन राज्यांत जी लोकसंख्या होती त्याचे दुप्पट लोकसंख्या ह्या तुमचे हिंदुस्थानांत आहे. त्या हिंदुस्थानांतील तुमचे कोटीशः बंधुजन ज्यांच्या तर्फे दाद मागण्याला कोणीही मंजूर केले गेले नाहींत त्यांनीं आज आपल्या सीझराला ह्मणजे तुम्हां ब्रीटिश राने लोकांस दाद मागण्याचे मनांत आणिलें आहे. आजपर्यंत लोक असे समजत होते कीं, हिंदुस्थानांतील लोक मुके आहेत; परंतु हल्लीं त्यांनीं सुदैवानें हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेच्या मार्फत बोलण्याचे आरंभिलें आहे. त्या राष्ट्रीय सभेनें इंग्लंडदेशांत आपल्या कडून प्रतिनिधी पाठविले आहेत. हे गृहस्थ चांगले अनुभवलेले आहेत, व यांनां हिंदुस्थानांतील लोकांच्या काय काय मागण्या आहेत हें पूर्ण पणें माहीत आहे व त्या मागण्या त्यांनां चांगल्या रीतीनें कळविता येतील अशी त्या लोकांची पूर्ण खात्री आहे. या लोकांना वाग्देवी सुप्रसन्न आहे कारण ते जें बोलतात तें बेंबीच्या देठा पासून बोलतात (आनंदाची टाळी) मी आतां इतक्यांत असें म्हणालोंकीं हिंदुस्थानांतील लोक पूर्वी मौन व्रती होते तेव्हां आतां त्यास वाचा कशी फुटावी हें कळण्याची आपणास इच्छा उत्पन्न झाली असेल याचा जबाब असा आहे कीं, तुम्ही लोकांनींच त्यांस विद्यामृत पाजिलें लहान लहान गावठी शाळेचे विद्यामृत पाजिलें असें नाहींतर त्यांस पाठशाळांतून मिळणारे विद्यामृत पाजिलें ज्या वेळीं बॉर्ड मेकाले साहेब हे हिंदुस्थानांतील लोकांकरितां कॉलेजाची व युनिव्हर्सिटीची स्थापना करून त्यांस आपल्या प्रमाणें उंच प्रतीचें विद्यादान द्यावें अशाबद्दल खटपट करीत होते त्यावेळीं पार्लमेंट सभेमध्यें ते ह्मणाले:—

" लोकांनीं आपल्या कह्यांत रहावें याकरितां त्यांस अज्ञान अवस्थेंत ठेवावें ही क्लासि अगदीं नीच आहे. " ज्याप्रमाणें इंग्लंडांतील लोकांवर आपलीं भरंवसा आहे त्याप्रमाणेंच हिंदुस्थानांतील लोकांवर आपलीं भरंवसा असला पाहिजे असें त्यांस वाटत होते (आनंदाची टाळी.) सभ्य गृहस्थहो हे त्यांचें ह्मणणें खचितच मोठ्या मनाचें होतें. हल्लीं जी सुधारणा आपल्या दृष्टीस पडते त्यावरून त्यांची योजना फारच सयुक्तिक होती हें आपणांस दिसून येईल. कारण हिंदुस्थानांतील जे पुढारी विद्वान् लोक आहेत ते त्याबद्दल इंग्लंडांतील लोकांचे फार अभार मानितात व त्यामुळेंच त्यांची इंग्लंडांतील लोकांवर विशेष भक्ति बसली आहे. या विद्वान् लोकांचे मनांत ब्रिटिश सरकारचें राज्य जाऊन त्याचे ऐवजीं रुसदेशाचें राज्य यावें असें येत असेल असें तुह्मास वाटतें काय (नाहीं, नाहीं) अशी कधींही गोष्ट घडणार नाहीं. कां तर तुम्ही पहात नाहीं कीं रुशिया सरकार विद्वान लोकांचा कंटाळा करितें व त्या सरकारास विद्वान् लोकांची भिति वाटते. तें सरकार तशा लोकांस सायबेरिया देशांत पाठविते. नुकतेंच थोडे दिवस झाले त्या सरकारनें तिकडील पाठशाळा बंद करण्याचे व शेकडोंशें विद्यार्थ्यांस कारागृहांत पाठविण्याचे आरंभिलें होतें. ही कांहीं लोकांचीं मनें वळविण्याची रीति नाहीं यामुळें गोंधळ मात्र उत्पन्न होतो. तुमची कांहीं तशा प्रकारची क्लासि नाहीं. तुम्ही लोकांस विद्यादान दिलें आहे व त्याचे मोबादल्यांत ते लोक तुमच्यांशीं सौंदर्यभाव ठेवून तुमचें हित चिंतितात. बरें. असो. सभासद हो आजरात्रीस तुमच्यां समोर हिंदुस्थानांतील मुखत्यार आले यांमध्यें प्रथम जे गृहस्थ भाषण करणार त्या सारखा दुसरा योग्य वक्ता मिळावयाचा नाहीं व त्याच्या योग्यतेनुरूप आपल्यासारखे असे श्रोतेजनही मिळणार नाहींत. हिंदुस्थानांतील लोकांस उंच प्रतीचे विद्यादान दिलें. त्यापासून जीं फळें उत्पन्न झालीं त्यामध्यें आमचे मित्र मि. बानरजी साहेब हे ढळढळीत उदाहरण आहे. वस्तुतः ते फलापेक्षां जास्ती कांहीं आहेत असें म्हटल्यास हरकत नाहीं. त्याना ज्या वृक्षावर अशा प्रकारचें फल येतें त्या वृक्षाची ही एक फांदी आहे असें म्हटले असतां चालेल. हे गृहस्थ कलकत्त्यास एक स्वतंत्र पाठशाळा आहे ती वरील अध्यक्ष आहेत. त्या पाठशाळेंत विद्यार्थी लोकांची संख्या आज २५०० दोनहजार पांचशें आहे. आणि सभासदहो ही अशा प्रकारची सभा पहिल्यानेंच जीं जीं म्हणून मुख्य शहरें गणलीं गेलीं आहेत त्यांमध्यें मणिलें गेलेलें जें हें फिन्सबेरी शहर त्यामध्यें भरत आहे हे फारचफार उत्तम घडून येतें आहे. ह्या फिन्सबरी शहरांतील लोकांनीं हिंदुस्थानाविषयीं फारचफार कळवळा दाखविला आहे. व त्याचें कल्याणाकडे येथील लोक फारच झटले. त्यांनीं हिंदुस्थानचे लोकांकरितां प्रोफेसर फासेट साहेब पहिले इंग्रेज गृहस्थ यास मेंबर करून पाठविलें. (आनंदाची टाळी)

रूरल बोर्डला प्रमाणें तालुका बोर्डचे मेंबर कमी करण्याचें काम ता. २९ सप्तेंबर रोजीं येथें टाउनहॉलांत झालें. अध्यक्षस्थान मे. डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांनीं स्विकारलें होतें. चार तालुक्यांचे एकंदर ३९ मेंबर हजर होते. जळगांव तालुक्यातील कोणीच आले नव्हते. चिठ्ठ्या टाकून मेंबर निघालेते.

अकोला तालुका.

टाउनफंड पैकीं मि. अनंदराव हरसींग

जागलेसेस पैकीं मि. गोविंदराव लक्ष्मण राव, चिमणाजी धनसिंग, देवराव अनंदराव.

२ अकोट तालुका.

टाउनफंड पैकीं- मि. मुकंदराव नंदाजी.

जागलेसेस पैकीं मेसर्स नुरुद्दिन बाहुद्दिन काजी, शंकर रावजी, सिताराम लक्ष्मण.

३ खामगांव तालुका.

टाउनफंड पैकीं मेसर्स बळवंतराव कान्हुजी, भगवान बहमाजी.

जागलेसेस पैकीं. मेसर्स सोनाजी भवानी, अजबसिंग महताबसिंग.

४ बाळापूर तालुका.

टाउनफंड पैकीं. मेसर्स विठोबा वलद पुंजाजी पाटील

जागलेसेस पैकीं. मेसर्स- पोपटलाल परशराम, रावजी जानजी पाटील, लक्ष्मण रामचंद्र कुळकर्णी.

५ जळगांव तालुका.

टाउनफंड पैकीं. मेसर्स देवकिसन माणिकचंद, माधवराव रामचंद्र देशपांडे.

जागलेसेस पैकीं—मेसर्स मल्हारराव खुशालराव देशमुख, अमृतराव अकाराम देशमुख.

एकंदर पांच तालुके मिळून २० मेंबर कमी झाले. ज्या दिवशीं मेंबर कमी करण्याचे ठरलें त्याच दिवशी प्रातःकाळचे टप्पातून मे. कमिशनर साहेबांचें पत्र आलें कीं जो मेंबर मयत झाला असेल तो कमीच झाला असें समजून काढून टाकावा. मयत मेंबराची जागा पुढील वर्षपर्यंत रिकामीच ठेवणार असें स्पष्ट दिसतें. जे मेंबर मयत झाले आहेत त्यांचे नांवावर फुली दिली आहे. सभा सुरूअसतांच कांव निघालें असें समजून खामगांव तालुक्यापैकीं मि. अजबसींग जमादार यांस एका प्रकारचे वैराग्य उत्पन्न होऊन बोललेंकीं माझे नांव निघालें हें बरें झालें माझा सर्व त्रास चुकला. आकोल्यास व खामगांवास येण्याचा रिकामा त्रास सोसावा लागत असें तो चुकला त्या वरून मे. डे. कमिशनर साहेबानीं त्यांची जी समजूत घातली ती चांगली ध्यानात बाळगण्या सारखी आहे. बोर्डाचें काम रिकाम टेकडेपणाचें नसून मोठ्या इनतीचें व भरवंशाचें आहे भलतांच मनुष्य बोर्डांत येईन ह्मणेल तर होणार नाहीं. त्यावर लोकांचा भरंवसा असला पाहिजे त्याला आपल्या इनतीची थोडीशी तरी चाड असली पाहिजे व आपल्यावर काय जबाबदारी आहे हें त्याला समलें पाहिजे. हल्लीं बोर्ड जीं कामें करीत आहेत तीं प्रथम जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर आपल्या स्वतःचे विचारानेंच करित असत परंतु हल्लीं तीं कामें करण्या बद्दल मेंबर लोकांनां विचारावें व मेंबर लोकांचें मत मिळाल्या शि

बाय कांहीं होऊ शकत नाहीं. तर सल्ला देणें किंवा विचारली जाणें हें इजतीचें काम नाहीं असें कसें ह्मणतां येईल. अद्याप बोर्डाची बाल्यावस्था असल्यामुळें फारशीं कामें त्याज कडून होऊ शकत नाहींत. व त्याचा लोकांस तूर्त फायदा वाटत नाहीं परंतु पुढें फायदा वाटूं लागेल. ह्या अशा कांहीं गोष्टींनीं बरीच समजूत घातली. ह्या बद्दल साहेबांचे उपकार मानणें भाग आहे. परंतु साहेबाचा जो एक ग्रह बनून गेला आहे कीं बोर्डाचीं कामें तहशिलदार लोकां कडून झाली पाहिजेत. व तहशिलदार यांत असल्या शिवाय कामें होणारच नाहींत तो कांहीं बरोबर नाहीं. खरोखर मुळ हेतू असाच आहेकीं अधिकाऱ्याच्या मदती शिवाय बोर्डाला आपलीं कामें करता येतील कीं नाहीं. व हा हेतु सिद्धास नेण्याकरितां व त्याची कसोटी पाहण्या करितां निदान कांहीं दिवस तरी साहेबांनीं आपला हा ग्रह सोडून द्यावा व बोर्डाला करतां येतात कीं नाहीं याची एकवेळ परीक्षा होऊं द्यावी. बोर्डा कडून कामें होत नाहीं असें दिसल्यास पुनः अधिकाऱ्याकडे कामें देतां येणार नाहींत असें नाहीं परंतु परिक्षेच्या आधींच त्यांनीं निकाल न करिता मे. कमिशनर साहेबांच्या ह्मणण्या प्रमाणें एकवेळ या लोकानांच आपलीं कामें स्वतः करूं द्यावीत अशी आमची सूचना आहे.

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 6, 1890.

A WORD FOR OUR REFORMERS

Those, who are well acquainted with the philosophy of opinion and sentiments, will readily admit that nations are differently formed owing to their being placed in special and peculiar circumstances and conditions. Natural laws acting on them from their infancy their feelings have been differently formed; and feelings are one of the great causes that give speciality to the habits customs and modes of thoughts of a country. Nobody should therefore look upon any nation with moral surprise; but on the contrary, our duty should be to study a nation with a very critical and impartial eye. We should find out all the modes of thoughts of men by studying all the races; we should compare them in their relative heights and weights; and then we should come inductively to the conclusion of any method that leads best to the happiness of mankind. This is really a great task & will require time and patience. Further full information can not be had. But it is gratifying to know that endeavours are being taken in that direction. But in the meanwhile, of the results of inquiry we have at the present time we can make the best use possible in determining how far a particular nation is dependent upon its particular circumstances for its happiness and this can only be determined by viewing all the historical facts with happiness as end and interpreting them accordingly. For instance we can place before them a line of thought about our own country the most civilized and the most ancient too. From the Vedic-times upto the post Manu period we find that India, notwithstanding its gross defects, enjoyed a long peace and happiness. Every body felt shame consequent on having committed a sin for having transgressed his duty. Crimes such as murders and thefts were very few. Property and persons were protected though in a peculiar way. Although there were civil inequalities people being inured to them by long habits were not groaning under them. In a word people were happy & free and morally elevated. But to mould such a society together in such a happy form we find only two great causes at work. The first is the predominance of religion that is customary laws over individual actions; and the second is their being left for a considerable time unmolested and undisturbed by foreigners. When they first came into India they showed their military power and conquered all the aboriginal tribes and then began to infuse into their minds their own religious notions. The effect of this can be naturally inferred. The aboriginal tribes at first resisted the intruders; but when they became a conquered people and when they became sure that their conquerers were more powerful, they began to groan under their rule. This state of feeling continued for a time till at last the feeling itself lost all its force and became a mere sentiment. It died soon and they began to admire, then like and afterwards morally approve their rule. Of course this state was wrought by religion. But the very way by which our ancient society was formed under peculiar circumstances suggested to it the great vital force of every social organism. It revealed to us that happiness or well being was the sole end of every society. Not only this but it went further as it got time to develop that recognized and evolved vital force. People enjoyed that happiness so much that they no longer thought it a prized object but a mere sentiment and a common place thing. And had that body social allowed to grow still further without being crushed it would have *reasonably* recognized that great vital force and would have spent all their originality in devoloping it. The religious government or theological aspect would have then being thrown away as an injurious principle Metaphysics and Positivism would have suggested to the members of that society that happiness ought to have been obtained through individual exertions and not through the threat of external authority and thus Moral Sense and Responsibility would have reigned and then India would have become a conquering people and not a conquered one We have dwelt on this country rather long and we wish to be excused for having gone from the main line of our subjects. We have done so in order to satisfy and to some extent try to convince the advocates of reform that they have much to learn about their own country. To some who are prejudiced in favor of European civilization the above train of reasoning will appear a mere fancy. But where there is a biassed mind there is no conviction;

PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Hindu and Mahomedan Law.

Time allowed three hours

I Who may give in adoption. Are the powers of all the persons who may give exactly the same? 8 M.

II A and B were devided brothers, their chiidren are shown in the annexed tree



After the death of A. C. B. D. G. and E. there was litigation between F. H and K in regard to property acquired by A. What shares are they entitled to if A. C B D G and E died in that order. Would it make any difference if E was blind at the time of his death. Would it make iany difference if C and D left widows who survived E. 10 M.

III A and B were undivided brothers A died first and then B. B left a son C. after the death of A B and C. A's widow adopted a son D without the consent of B's widow who was still alive. Does D take the estate—

A's widow having inherited property from her husband made a gift of the property to C her sister's son. After making the gift to C she adopted a son D. D sued C to recover the property given to him. A suit was brought before the death of the widow. Will D succeed?

Explain fully the grounds for decision in both cases. No marks will be given for an opinion without reasons. 12 M.

IV A and B were undivided brothers. A borrowed Rs. 1000 from C for his own separate use. After A's death C sued B to recover his debt from A's share of the joint family property which had passed to B on A's death. Will C succeed?

A and B were divided brothers. A owned a house worth Rs. 10,000. He Borrowed Rs. 1000 from C. After A's death the house passed to B. C sued to recover his debt from the house which had passed to B. will he succeed? Explain the grounds of decision in both cases. 12 M.

V A mahomedan dies leaving a widow a mother and a sister. How will the estate be distributed? 8 M.

VI What are the restrictions on bequest by will under Hindu and Mahomedan Law respectively? 8 M.

VII Contrast the position of a female in a Hindu and Mahomedan family in regard to inheritance from males. In what respects is the Western school of Hindu Law more favorable to females in this respects than pure Mitakshara? 12 Marks

VIII A Mahomedan having a right of pre-emption in regard to certain property hears of the sale when in the train between Amraoti and Murtizapur. What must he do in order to perfect his claim? 10 Marks

IX What is the extent of a Hindu sons liability to pay debts incurred by his father

(1) during his father's lifetime

(2) after his father's death

out of (1) the property inherited from his father (2) his self acquired property 8 Marks

X Explain the Mahomedan law in regard to dower? 12 Marks

वऱ्हाड.

मि० आर्बर्ड सा० दहा दिवसाचे रजेवर गेले आहेत.

रा० रा० पांडुरंग सखाराम यांस अकोल्यास डे० क्ला० आ० को० नेमले होते ती नेमणूक रहित होऊन त्यांना उमरावतीसच डे० क्लां० ओ० को० नेमलें आहे.

क्या० वार्न हेस्टिंगज यांचे हाताखालीं खानेसुमारीचे कामासाठीं मि० सुबराव तहशीलदार व रा० रा० पांडुरंग सखाराम उमरावतीचे डे० क्ला० आ० को० यांस नेमणार आहेत असें कळतें.

उमरावती येथील हायस्कुलांतून म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेस जाणाऱ्या उमेदवारांची प्रिलिमिनरी परीक्षा झाली. सुमारें १५ विद्यार्थी परीक्षेस जातील असें वाटतें.

कमिशनर आफिसांतले शेकमुनीर यांस उमरावतीस स्मा० का० को० नाझर नेमलें.

सिव्हिल आणि सेशन जज्जचे डे० क्ला० आ० को० चे जागीं त्याच आफिसांतील मि० मारुतीराव यांस व त्यांचे ६० रु०चे जागीं रा० रा० नारायण रामचंद्र गुप्ते क्ला० डे० क० आफिस अकोलें यांस नेमले असें कळतें.

रा० रा० रामराव बापूजी यांस इलिचपूर येथें डे० कमिशनर आफिसांत क्ला० आ० को० चे कामावर जाण्यास हुकूम मिळाला व आतां ते लवकरच तिकडे जातील.

वऱ्हाड करितां डायरक्टर आफ आग्रिकलचरची १८०० रुपयाची जागा करून त्या जागीं मे० हेअर साहेब यांची नेमणूक करणार असल्याचे मागील एके अंकी कळविले आहेच. आतां कळतें कीं त्यांच्या हाताखालीं एक ९०० रुपयाचा व एक ५०० रुपयाचा असे दोन असिस्टंट देऊन बराच मोठा कमही देणार आहेत. ही व्यवस्था झाल्यावर कमिशनरचे रेव्हिन्यु शाखेचे बरेंच काम तिकडे होईल. मलकापूर तालुक्यांत लवकरच सर्व्हे सुरू होणार असेंही कळतें.

आगगाड्याच्या वेळांत फेरफार— मुंबावळे कडून येणारी रात्रींची गाडी अकोल्यास जो १॥ वाजल्यावर येत असे ती रात्रीं १२—वाजून ५१ मिनिटांनीं येईल. व दिवसाची गाडी २—१९ला येत असे ती १—२९ ला येईल. नागपुराकडून दिवसाची गाडी अकोल्यास २।१३ला येई ती २।६ ला येईल. व रात्रीची ३-१५ ला येत असे ती २-४३ ला येईल.

नोटीस.

नोटीस बेरामी पीरमहंमद वल्द फत्तेमहंमद बागवान व वजीर महंमद वल्द सोनाभाई चुडीवाले वस्ती अकोले यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमचे मळ्यांतील पूर्वभागाच्या केळीचा बार दरशेकडा रुपये ३० प्रमाणें तीनशें खोड कबूल करून करार नामा लेखी करून दिला व शंभर केळीचे दाम अगाऊ देऊन शंभर खोड घेऊन गेला बाकी खोडाचे दाम अगाऊ देण्याचे ठरल्या प्रमाणें दामदेत नाहीं व केळीचे पीक कापण्यास आले असून तुह्मी घेऊन जात नाहीं या मुळें माल खराब होत असल्या मुळें आमचे नुकसान होत आहें याज करितां नोटिस देण्यांत आली कीं ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसांत अगाऊ रुपये देऊन तयार झालेल्या केळी घेऊन जावें नाहीतर आह्मी दुसऱ्या मनुष्यास केळी विकून त्यात जे नुकसान येईल तें तुह्मापासून फिर्याद करून खर्चासुद्धां भरून घेतलें जाईल यांत तुमचें नुकसान आहे असें होऊं नये ह्मणून अगाऊ कळविलें आहे कळावें तारीख ५ माहे आक्टोबर सन १८९० इ०

(सही)

बिसन गोंदुलालजी दस्तुरखुद.

वर्तमानसार.

गेल्या पहिल्या तारखेस काबूल येथें अमिराने जो दरबार भरविला होता त्यावेळीं पुष्कळ सरदारांची भाषणे झालीं असून ब्रिटिश सरकारास विशेष प्रकारचा दोषही देण्यांत आला. काबूल शहराजवळील काबूल नदीवरून जी रेल्वे जाणार आहे त्या संबंधानें विचार करण्याचा या दरबारचा मुख्य उद्देश होता. अमिराच्या तर्फेच्या सर्व सरदारास आमंत्रण होते व त्यापैकीं बहुतेक हजरही होते. या सर्वांत मस्कतचा राजकीय खटपटी करणारा मौलवी हजर होता व यानें या दरबारांत फार वजनदार व जोरांचे भाषण केलें. आफगाणिस्थानांत इंग्रजांचा शिरकाव होऊ दिला नाहीं याबद्दल त्या सर्व सरदारांनीं अमिराची वाहवा केली. माझें मत न विचारतां इंग्रजांनी रेल्वे सुरू केली हें त्यानी फार वाइट व दोषास्पद काम केलें व या त्यांचा शिरजोरपणाबद्दल मला फार वाइट वाटत आहे असेंही अमिरानें रागाचे उद्गार काढले. यावर मस्कतच्या मौलवीनें इंग्रजांची बरीच निंदा केली आणि इंग्रजाचा पगडा बसवून घेऊ नका असा त्यानें अमिरास उपदेश केला. काबूलचा पूर्व इतिहास, तेथील जंगी बंड, काश्मीर प्रकरण, वगैरें उदाहरणें दाखवून इंग्रज लोक किती बे भरंशाचे आहेत ते पहा असेंही सांगण्यांत आलें. या भाषणांत महमद याकूब खानच्या कैद करण्याच्या प्रकरणांत बद्दलही बरीच टिका झाली. आपल्या प्रांता पासून जितके लांब ठेवला तिकडे इंग्रजांस दुरठेवा असा सरदारांनी अमिरास वारंवार उपदेश केला आणि असें करण्याचें अमिरानेंही कबूल केलें. एव्हढाच काय तो प्रकार दरबारांत झाला असें आमचा बातमीदार आह्मास कळवितो; तसेंच काबूलचा अमीर लवकरच बल्खकडे जाणार आहे; कां जाणार तें समजत नाहीं.

मध्यप्रांतातील इंडियाच्या आसपास टोळ धाड आली आहे असें ऐकतों उभ्या पिकांचें ह्या धाडीनें बरेंच नुकसान केलें, पर्जन्याचें भय नाहींसें होतें आहे तो हें टोळ धाडीचें संकट येऊन उभे झालें आहे.

बंगालच्या ले. गव्हरनरच्या जागीं जाण्यास मी खुषी नाहीं असें सर बारबार याणी सांगितल्या वरून त्या जागीं मध्यप्रांताचे कमिशनर मि. म्याकंसी यांची नेमणूक होईल असें ह्मणतात.

जलालाबादे जवळ पुन्हा दरवडे पडूं लागले आहेत.

ब्रह्मदेशांतील पोलिस व्यवस्था चांगली नाहीं असें ह्मणतात.

उत्तर तीबेटांतील रहिवाशी अजूनही मनुष्य भक्षक आहेत असें ह्मणतात. ते पतंग नावाचे पक्षी तर चटणी सारखे उडावितात!

रशियांतील एक क्यापटन युरोपांतील राजधानींच्या शहरीं फिरावयास निघणार आहे. हा फिरावयास जाताना नुकतें मुंबईस आलेलें फेनोग्राफ नावाचें यंत्र बरोबर नेणार आहे. परत आल्यावर त्यानें ज्यांच्याशीं भेटी घेतल्या त्या सर्वांचें भाषण त्या यंत्रांतून बाहेर पडेल.

इजिप्त देशांतील नाईल नदीस पूर आला आहे; आणि दामीटा नावाच्या प्रांतांत पाणी शिरलें आहे.

आबिसीनीया प्रांतातील इतालीच्या फौजेत पटकी उठली आहे. अ० द०

अमदाबाद महालक्ष्मी फीमेल ट्रेनिंग कालेजच्या संबंधानें तिकडील गुजराथी वर्तमान पत्रांतून जे मजकूर येत आहेत, ते आह्मा हिंदुलोकांना स्त्रीशिक्षण धार्जिणें नाहीं असें दाखविणारेच आहेत. त्या ट्रेनिंग कालेजवर एक गोऱ्या बाई सुपरिन्टेंडेंटच्या जागेवर आहेत. त्यांनीं आपल्या हाताखालील हिंदुमुलीस पंक्तिप्रपंच मोडण्या विषयीं उपदेश करून पाहिला. पण त्या मुली बाईच्या उपदेशास बधल्या नाहींत. तेव्हां बाईनीं सगळ्या मुलीस एक दिवशीं उपाशी कोंडून ठेविले. इतका जेव्हां बाईनीं प्रकार केला तेव्हां त्या मुलींनीं त्या प्रांताच्या शाळाधिकाऱ्याकडे अर्ज केला अर्जाचाही लौकर उपयोग होईनासे वाटलें तेव्हां त्यांनीं चाटफिल्ड साहेबांकडे तार केली आतां असें कळतें कीं चाटफिल्ड सा०नीं त्या युरोपियन बाईस दोष दिला आहे. या प्रकरणाची विझवा विझवी नुस्त्या अक्षरी दोषावरच संपू नये असे तिकडील लोकांचे ह्मणणें आहे. युरोपियन बायांच्या तालमींत आपल्या मुली देणें हें किती धोक्याचे आहे. हें वरील आमदाबाद लक्ष्मी फीमेल ट्रेनिंग कालेजच्या ताज्या गोष्टी वरून उघड होत आहे. वास्तविक प्रकार असा होत असून आमच्या विद्वान स्त्रिशिक्षण वाद्यांच्या विशाल डोक्यांत ह्याचा प्रकाश पडत नाहीं हे पाहून आह्मांस सखेदाश्चर्य वाटतें.

जबलपूर येथें एका नऊ वर्षाच्या मुलानें आपल्या तीन वर्षाचे भावास पुरून टार मारलें. त्यास कारण विचारतां त्यानें असें सांगितलें कीं, आह्मी पोरके होतो. मला त्याच्या पोटांस घालण्याची पंचाईत पडे ह्मणून मी असें केलें.

दुर्भगा येथील मुलींनीं मलबारीशेट मागत आहेत तसा कायदा आह्मांस नको असा अर्ज केला आहे.

सीलोन आणि रामेश्वर ह्यांच्यामध्ये मोतीं काढणाऱ्या एका व्यापारी कंपनीस एक २२ हजाराचे एक १५ हजाराचे व चार सात सात हजाराची अशीं साहा मोती सापडलीं.

तिबेटांत चार फकीर फुलपतंग पकडण्या करितां गेलें असतां तेथील कांहीं लोकांनीं त्यापैकीं तिघांस मारून शिजवून खालें.

पु० वै०

विद्यार्थ्यांस कवाईत— हुगळी (बंगाला) येथील सरकारी शाळेंत सगळ्या विद्यार्थ्यांस आणि हुगळी कालेजांतील मुलांस (ड्रिल) कवाईत शिकवावी असा व्हाईसरायांचा विशेष हुकूम झाल्यामुळें ती शिकविली जात आहे अशी आनंददायक बातमी बंगाल्याकडील पत्रांत छापली आहे. एकट्या हुगळी शहरांतील मुलांसच व्हाईसराय साहेबांनीं हक्क दिला याबद्दल आह्मास असंतोष नाहीं, पण तेवढ्याच शहरास तो हक्क न देतां सगळ्या हिंदुस्थानांतील शाळांतल्या विद्यार्थ्यांस एकसहा कवाईत शिकविण्याचा एकसहा हुकूम सोडण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. पुण्याच्या न्यू इंग्लिशस्कूलवाल्यास सरकारानें ती परवानगी दिल्यामुळें ते विद्यार्थ्यांना कवाईत शिकवितात. त्या मुलांचा तो एक खारखा पोषाग त्यांची ती चिमुकली कवाईत, टाप टीप व एकदरींत त्यांची आयट पाहून मोठी मौज वाटते.

क्रूरशासन आफगाणिस्थानचे पोष्टमास्तर जनरल कर्नल वाली महमद याणीं सरकारी पैशाची अफरातफर केल्या मुळें ते बरेच दिवस अटकेंत होतें त्यांच डोळे अमिराच्या हुकमानें काढले. काबूलंच दिवाण न्याहालचंद याणीं अवज्ञा कल्यामुळें त्यांच्या दाढीचे केस अमिराच्या हुकमानें उपटून काढलें अशीं खबर सिव्हिल आणि मिलिटरी गझेट कर्त्यास अफगाणिस्थाना कडून लागली आहे.

इंग्लंडची मनुष्य गणति —तारीख ५ एप्रिल सन १८९१ ह्या दिवशीं इंग्लंडची मनुष्य गणती करण्याचें ठरलें आहे इंग्लंड आणि वेल्स करितां ८० लक्ष फार्मे व ४०००० मोजदाद करणारे ठेवण्याचें ठरलें आहे.

शुभ सू.

फेब्रुआरी महिन्यांत होणाऱ्या खानेसुमारीच्या संबंधानें जे नियम प्रसिद्ध झाले आहेत त्यांत एक असा नियम आहे कीं, खानेसुमारीचीं जीं पत्रकें तयार होतील. त्या मध्यें प्रत्येक मनुष्याचा उदर निर्वाहाचा धंदा लिहिला पाहिजे. जे मनुष्य कोणताही धंदा करण्यासारखे नसतील, त्यांच्या नांवा पुढें त्यास जो कोणी पोशींत असेल, त्यांचा धंदा लिहावा, जे लोक सुखवस्तू असून त्यांस उदर निर्वाहाच्या सोईकरितां कांहीं धंदा करावा लागत नाहीं. त्यास हा नियम लागू नाहीं. असें लिहिलें आहे.

अग्निप्रलय—ता० ४ रोजीं सालोनिका (तुर्कस्थान) येथें भयंकर अग्निप्रलय होऊन युरोपियन लोकांची जेवढी वस्ती होती तेवढी सर्व जळून खाक झाली! १२००० घरें जळून फस्त झालीं! २९० एकर जमीन घरें वगैरे जळून ओसाड पडली!

चिमण्यांचा पराक्रम —ओटेरिओ सानिआ येथें, एका सार्वजनिक इमारतीवर एक घड्याळ आहे; त्याच्या दोन कांट्या मध्यें जो कोन साधला जातो, त्या मध्यें एक घरटे बांधण्याचा दोघां चिमण्यांचा विचार झाला, व त्या घरट्याला, चालू असणारीं कांट्यांपासून त्रास होऊं नये, ह्मणून त्यांनीं गवताच्या दोऱ्यांनीं ते दोन्ही कांटे बांधून टाकलें, व घड्याळ चालण्याचे बंद केलें! ही चिमण्यांची अक्कल बरें.

काळ्या मनुष्यापेक्षां गोऱ्या मनुष्यांचें रक्त डासांस फार प्रिय आहे, व शरीराच्या निरनिराळ्या भागा पैकीं रक्त शोषणाच्या क्रियेस कोणचा भाग चांगला हें शोधून काढण्यांत डास मोठे पटाईत आहेत असें वर्णन एका पत्रांत छापलें आहे. न्या. सिं.

हिंदुस्थानच्या प्रजेस कराचे आझें दर माणसास सरासरी २। रुपये द्यावा लागतो ह्मणजे औरंजेबाच्या वेळीं दर माणशा १ रुपया होता व हल्लीं २। रुपये आहे. या १ रुपयाच्या करामुळें औरंगजेबाचें राज्य गेलें.

ब्रह्मदेश खालसा करतेवेळीं फक्त २॥ लाख रुपये खर्च येईल ह्मणून लार्ड डफ्रिन साहेबानीं थाप मारली पण आज मित्तीस नक्की खर्च झाला ६७,९३,८०० रुपये. तेव्हां यांत इस्टमेट करणारा मूर्ख कीं हिंदुस्थानच्या रयतेनें ते इस्टमेट स्वस्थपणानें कबूल केलें ह्मणून ती मूर्ख! मूर्ख तरी कोण? ब्रह्मदेशातील खर्चा संबंधानें झालेला खर्च कलकत्याच्या एका पत्रांत प्रसिद्ध झाला आहे.

गुलामांचा व्यापार करणारे कित्येक आरब हल्लीं झांझिबार येथें पकडले आहेत. इतर स्वतंत्र प्रजेस गुलाम करणारांस कोणीच पकडीत नाहीं! दुनयेची रहाटीच अशी विलक्षण आहे! !

जो कोणी उत्तम कविता करील किंवा जो कोणी पियानो उत्तम वाजविल त्यास भोंठे बक्षिस देण्यांत येईल असें रशियन सावकारांनें प्रसिद्ध केलें आहे. या संबंधाची परिक्षा लवकरच घेतली जाईल.

साताऱ्याचें ख्रिस्ती प्रोटेस्टंट देऊळ चोरांनीं फोडून कांहीं जिनसा चोरून नेल्या. ख्रिस्ती देवळांत सुद्धा चोर शिरतो का? मग हिंदु धर्म काय वाईट.

लंडनच्या ब्यांकेचा दर पाच टक्के आहे.

टा० अ०

स्टॉटुटरी सिव्हिल सर्व्हंटांस सन्दी सिव्हिल सर्व्हंटांसारख्या रांकेप्रमाणें जागा मिळण्याचा हक्क नाहीं, त्यास बढती मिळणें हे केवळ त्यांच्या कामाच्या कर्तबगारीवर अवलंबून राहील. यास्तव हें कबूल नसेल तर त्यांनीं आपले पूर्वीचें जागेवर जावें अशा अर्थाचा एक ठराव झाल्याचें ऐकण्यांत येतें.

म्हैसूर संस्थानांत लोखंडाच्या खाणी कोठे हो सांपडल्यास त्या सुरू कराव्या, त्या खाणीवर ९० वर्षे पर्यंत कोणत्याही प्रकारची जकात किंवा कर घेतला जाणार नाहीं, असा परवाना म्हैसूरच्या महाराजांनीं डा. धनकोटी राजू नांवाच्या एका उद्योगी व श्रीमान गृहस्थास दिला असून कारखान्याच्या इमारती वगैरे बांधण्या करितां लागणाऱ्या पडीत जमिनीही त्यांस दिल्या आहेत. शिवाय यंत्रे चालण्यास जे जळण पाहिजे, त्या करितां १०० चौरस मैल जंगलही त्यांच्या स्वाधीन तूर्त केलें आहे असें समजतें.

मोहनास्त्र:— युद्धसंग्रामांत लक्षावधी मनुष्यांचे बळी पाडून सत्यनाश उडविणारीं भयंकर शस्त्रें अनेक निघालीं आहेत; परंतु आलीकडे व्हियेना येथील डाक्टर जुलिन याणी लढाईत मनुष्यांचे बळी तर पडूं नयेत, आणि लढाई तर फत्ते व्हावी असें एक नवीन द्रव्य शोधून काढिलें आहे. हें द्रव्य कुलपी गोळ्यांत भरून त्यांचा भडिमार शत्रु सैन्यावर करावयाचा; ह्मणजे तेथें ते फुटून त्यांतून एक प्रकारचा ग्यास निघतो आणि त्यानें जवळचे लढवय्ये २।३ तास पर्यंत अगदी निचेष्ट होऊन पडतात! त्यांचें प्राणोत्क्रमण होत नाहीं. ही किमया अगदीं थोड्या खर्चांत तयार होते असें सदर्हू डाक्टरांचे ह्मणणें आहे. क त.

अकोलें बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनी			१००८=
" १५ दिवसाच्या मुदतीची			१००८=
सुवर्ण....	२१।	रुपें	१०८
आळशी खंडीस	८५	उडीद	६०
गहूं काठे	६०	बनशी	६७॥
जवारी	४०	चणे	६२॥
सर्की	४	मीठ	४८=
तूप	९।	तेल	४॥।=

सट्याचे भाव

जवारी वसंत	संवत	१९४७	४३।=
गहू वैशाखशुद्ध		१९४७	५८
आळशी चैत्रशुद्ध		१९४७	७९॥
रुई फाल्गुन शु.		१९४७	५७॥=
सर्की व. नवे सालाची		१९४७	४

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ३ " " ८८
सालअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास.....८४

Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरें खेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
Per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV | AKOLA MONDAY OCTOBER 13 1890 | NO 40

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख १३ माहे आक्टोबर सन १८९० इ० | अंक ४०

जामन गोपाळ यांचा अनेक औषधे मिश्रित

सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, (गरमी) व तिजपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व बुद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनः रुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गोतमराव केशव, मुंबई.

सचित्रकचाटलाग

आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

नोटीस

रा. रा. इंदरसिंग आईदान साहुदुकान अकोलें यांस नोटीस देणार नागोराव रावजी कास्त राहणार अंत्रोमलकापुर हल्लीं राहणार अकोलें नोटिशीने असें कळवितों कीं हल्लीचे हंगामांत ह्मणजे गेल्या कार्तीक पासून आलोकडे तुमचे दुकानाशीं आमची देवघेव होऊन अखेर तुह्मीं मिती भाद्रपद शुद्ध ११ संवत १९४६ रोजीं तुमचे हिशोबानें मजकडे रुपये १०० येणें काढून माझी सही घेतली आहे. पुढें मी माझे येथें हिशोब पाहतां अदा जा साडे आठशें ८५० तुमचें दुकाना कडेस आमचें घेणें निघत आहे. आतां तुह्मीं आह्मांस कोणच्या प्रकारें हिशोब समजाऊन दिला हें कळत नाहीं तरी हा नोटीस पावतांच आकोलें येथील सराफी लोक पंच यांच्या समोर आह्मांस आपण हिशोब समजावून द्यावा नाहींपेक्षां आमचे येथें जें तुमचें दुकाना कडे घेणें निघत आहे त्या मानानें दिवानींत फिर्याद करूं ह्मणून दिली नोटीस सही तारीख ८ माहे अक्टोबर सन १८९० इसवी.

सही
नागोराव रावजी कास्त राहणार
अकोलें दस्तुर खुद.

नोटीस

गणु वलद तुळजाजी कुणबी राहणार राजंदे तालुके अकोलें यांस नोटीस देणार शिवराम वल्लद लक्ष्मणजी कुणबी राहणार राजंदे याजकडून नोटीस देण्यात येतेकीं. तुह्मांपासून आह्मीं कर्जाऊ रुपये २३ तेवीस दर शेकडा दोन रुपये व्याजा प्रमाणें घेतलें त्यांस आज बरेच दिवस जाहलें आह्मीं आज पंधरा दिवस जाहलें तुह्मांस आह्मीं व्याजा सुद्धां रुपये देत असतां घेत नाहीं व आह्मांस असें सांगतांकीं ह्या रुपयां शिवाय आणखी कांहीं रुपये येणें आहेत तें अगोदर द्या ह्मणजे मग हें रुपये घेऊं याजकरितां आह्मीं असें कळवितों कीं तुह्मी आपलें रुपये व्याजासुद्धा नोटीस पावल्या बरोबर घेऊन जावें. असें केलें नाहीं व अह्मांवर पुढेमागें रुपयाबद्दल फिर्याद केल्यास त्याच्या संबंधानें आह्मीं कोणचे ही प्रकारें जबाबदार नाहीं. व तुमचे ह्मणणें आहे कीं दुसरें या शिवाय घेणें आहे तर त्याजबद्दलचा कागद वगैरे कांहीं असल्यास काढावा ह्मणजे निकाल करूं व आम्हांस हा नोटीस देण्याबद्दल जो खर्च लागला आहे तो तुमचे तंडीलीमुळें आहे सबब हा वजा केला जाईल म्हणून दिली नोटीस सही तारिख ७-१०-९० इसवी.

(सही)
शिवराम वल्लद लक्ष्मणजी कुणबी
राहणार राजंदे निशानी
हातचो. खुद्द

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ३० शके १८१२

सिंहावलोकन

(मागील अंकावरून पुढें चालू)

स्वास्थ्य व अभय या दोन गोष्टी आमच्या अधिन झाल्याकारणानें, स्वाभाविकरीत्या उलाढाल्या मनास बरीच मोकळीक मिळत चालली. व एकाच स्थितींत रहाण्याचा कंटाळा स्वभावसिद्ध असल्या कारणानें मनांत बरीच चंचलता उत्पन्न झाली आणि ह्मणून मागें कधींही लक्ष न गेलेल्या सामाजिक स्थितीकडे सहज लक्ष गेलें व आंग्लविद्येच्या संसर्गानें आणि त्यांच्यातील झकपक दिसणाऱ्या चालीरीतीच्या सहवासानें आपली सामाजिक स्थिती बरीच दोषास्पद दिसूं लागली व तेव्हांपासून समाज सुधारणेच्या कामास आमची मंडळी लागली. राजकीय व्यवस्थेंत इतरापेक्षां आमचीं मनें उदार आहेत व विचार स्वातंत्र्याचे आम्ही पूर्ण अभिमानी आहोंत असें आमचे सरकार वेळोवेळीं ह्मणत असल्या कारणानें तीही आशा सुटून राजकीय सुधारणेचे स्तोम वाढवून तिकडे ही बोट शिरकावण्यास आमची मंडळी तयार झाली, त्याचप्रमाणें सांभाळण्यास कठीण व केव्हां केव्हां अज्ञान जनक वाटणाऱ्या धर्माची बंधनें परकीयाप्रमाणें तोडून टाकून तो अजीबात झुगारून देण्याच्या व कोणी कोणी तो चालत्या काळास योग्य दिसेल असा व अयास न पडतां पाळतां येईल असा ठुमदार करण्याच्या कामीं लागले व ' धर्म सुधारणा ' असा शब्द प्रत्येकाच्या कानीं दुमदुमण्यास सुरुवात झाली. झाले! लढाई, दरवडे व जुलूम ह्या तिन्ही ठिकाणीं ' राजकीय सुधारणा, ' ' धर्मसुधारणा ' व ' समाजसुधारणा ' ह्या तीन गोष्टी येऊन बसल्या व त्यांनीं आमचीं मनें बरींच गुंगवून टाकिलीं. परंतु ह्या स्थित्यंतरा पासून कितपत फायदे होत आहेत ह्याचा निकाल ठरविण्याचा प्रयत्न करण्याचा जो आमचा उद्देश तो तडीस नेला पाहिजे, व हा उद्देश तडीस नेणें ह्मणजे सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणा हें काय बंड आहे, ह्या बंडाचा फैलाव कसा वाढत चालला आहे व साधल्यास कसा फैलाव होत गेला पाहिजे अथवा पाहिजे होता ह्याचें स्पष्टीकरण करणें होय.

राजकीय सुधारणा—हा विषय सर्व जातीस सारख्याच महत्वाचा आहे. व त्या योगानें सर्व लोक आपापल्याकडून होईल तितकीं खटपट करून आपलें परतंत्र्याचा भार कमी करण्याच्या खटपटींत आहेत. ह्या खटपटीस अडथळे फक्त अधिकारी अंमलदार लोकांकडून मात्र येतात. राज्य व्यवस्थेंत हात असणें, पुष्कळ पगाराच्या व मोठ्या हुकमतीच्या जागा मिळविणें, त्रास दायक वांटणारें कर माफी करविण्याचा हक्क असणें इत्यादी बाबीं संबंधीं चर्चा सर्वत्र सारखी सुरू आहे. सार्वजनिक, लोक, महाजन वगैरे सभा स्थापित झाल्या आहेत आणि राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचा अवतार धारणा ह्याच कामासाठीं झाला आहे. परराज्याच्या अमलाखालीं कालक्षेप करावा लागत असतां वर सांगितलेलें हक्क मिळवण्याची इच्छा धरणें जरा चमत्कारिक दिसते खरें, परंतु न्यायी, उदार व परोपकारी म्हणविणाऱ्या सत्ताधीशांच्या छत्राखालीं स्वातंत्र्यप्रिय लोकांच्या सहवासांस राहून व अठ्ठावन सालच्या बंडाच्या धामधुमी नंतरच्या प्रसिद्ध झालेल्या जाहिरनाम्या सारखे लेखी पुरावे जवळ असतां आणि सुधारणेच्या उच्च शिखरापर्यंत मजल मारलेल्याच्या विद्येचें प्राशन यथास्थित होत असतां आमच्या सारख्या निगर गट्ट बनलेल्या लोकांस सुद्धां वरील हक्क मिळविण्याची आशा सुटणें साहाजिक आहे.

हक्क संपादन करण्याचे मार्ग जर सोपे आहेत तर त्या मार्गाचा फायदा करून घेणें सुधारणाप्रिय लोकांस अवश्य आहे व त्या मानानें चाललेले आमचे प्रयत्न रतुल्य होत आहेत. परंतु यश मिळण्याची आशा कितपत बळकट आहे ह्याचा विचार झाला पाहिजे आमच्या अश्रांत श्रमाचे चीज करण्याचे ज्यांच्या हातीं आहे त्यांच्या विचारांचा कल कोणत्या बाजूला झुकतो आहे हें समजून घेतलें पाहिजे; व हें समजून घेण्याच्या खटपटींत पडलें असतां आपल्यास यश येईल किंवा नाहीं ह्याचा ताबडतोब निकाल लागेलच. राज्याधिपतीची बोलण्याप्रमाणें कृती कितीशीं वठत असेल ह्याचा बारकाईनें शोध केला असतां बरीच निराशा होते. कारण जर आमच्या सरकारांस आम्हांस मर्मतेनें वागवावें असें वाटत असेल व आमचे बुडालेले हक्क, आम्हांस देण्याची त्यांची अंतःकरणपूर्वक इच्छा असती तर त्यांच्या कडून हेत असलें धरसोडीचे वर्तन आहे तसेंच कायम न राहते. प्रत्यक्ष आपल्या जातीचे, आपल्या गोताचे स्वधर्मी, व रोटीबेटी व्यवहारास अधिकारी अशा ऐरिश लोकांच्या हकाची पाय

मजी कशी होत आहे बरें? ऐरलंडदेशा सारख्या निकट संबंधी लोकांची जर ही दशा तर आमच्या सारख्या सर्व प्रकारें विधर्मी व अतीगरीब लोकांची काय कथा! तुमचे तुम्हीं सांभाळण्यास योग्य झाल्यावर आम्हीं आपलें चालतें होऊं. आम्हांस तुमचें राज्य घेऊन काय करावयाचें आहे इत्यादि वैराग्याच्या गोष्टींची रेलचेल. परंतु कुतो? ब्रम्ह देश आमच्या करितां खालसा करण्यांत आला असेल? राणी सरकारच्या अमलांखालीं असलेल्या प्रजेस सारख्या दरजयांनें वागविलें जाईल व सर्वांवर एकाच न्याय देवतेची अमल बजावणी होईल वगैरे प्रसंग पडला तेव्हां व चनें देण्याची गर्दी उडवून दिली. परंतु बजावणीची वेळ आली म्हणजे बरीक सर्व प्रकार उलट! गौरकाय बाळांच्या हांतून आज पर्यंत शेंकडों काळे लोक प्राणास मुकले असतील; परंतु कायद्या बरहुकूम किती जणास शिक्षा झाली आहे? वारंवार होत असलेलें खुनांसारखे अपराध बंद व्हावें म्हणून कांहीं तरी उपाय योजना झाली आहे काय? इतके खून झाले परंतु खुनी मनुष्यास फाशी देण्या सारखा एकही खून या सर्व शतक भर कोणत्याही गौरकायाच्या हांतून झाला नाहीं ही खरोखरच लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट होय. कोणत्याही व कितीही मोठ्या एतद्देशीय न्यायाधिशा कडून अतीनीच आंग्ल भोमाची सुद्धां चवकशी होणें नाहीं. ज्या अपराधा बद्दल काळा आदमी दोन अथवा तीन वर्षांच्या कारगृहवासास योग्य त्याच अपराधा बद्दल आकाशांतील दुतास तीनमहिने फार होतात! असें जर आमच्या निरपेक्ष सरकाराचे डावपेच आहेत तर त्यांच्या बोलण्यावर किती सा भरंवसा ठेवावा हें समजून घेतलें पाहिजे.

(पुढें चालूं)

नुमत्या लेखणीच्या एका तडाक्यानें रखमाबाई अगदीं कुमारी किंवा अविवाहित बायको होणार होती तें झालें नाहीं म्हणून रखमाबाई स्वतः "न्युरिव्ह्यु" पत्रांतून हिंदुस्त्रियां विषयीं आणि त्यांत विशेषें करून तरुण मुलींशी त्यांच्या सासूच्या वर्तणुकी विषयीं खोट्यानाट्या व अतिशयोक्तीच्या गोष्टी इंग्लिश लोकांपुढें ठेवित आहे. कित्येक मनुष्य आपलें मत देतांना आपल्या विशेष प्रिय किंवा अप्रिय गोष्टींचा विचार करित असतो हें साहाजिकच आहे. रखमाबाईशी त्यांच्या सासूची वर्तणूक फार वाईट होती त्यांना फार त्रास सोसवा लागला म्हणून त्या हिंदु सासू वाईट असतात असें सहजच म्हणत असतील. रखमाबाई म्हणजे कांहीं अनुभवलेली स्त्री आहे किंवा सब हिंदुवर्गाची तिला माहिती आहे असें कांहीं म्हणतां येणार नाहीं.

रखमाबाईच्या सासू सारख्या समाजांत कांहा थोड्या स्त्रिया असतील त्या वरून सर्व हिंदुसमाज अगदीं रानटी नीति भ्रष्ट आहे अशी कल्पना करतां येणार नाहीं. अशा थोड्याशा उदाहरणा वरून जर एखाद्या समाजा बद्दल मत बनविता येइल असें मानलें तर इंग्लिश लोकांनांही रानटी किंवा अनीति भ्रष्ट सहज म्हणावें लागेल इंग्लिश लोकांच्या स्त्रिया परपुरुषाशीं एकांतात निर्धास्त पणें बोलतात, खेळतात, हासतात, व पुरुषांत होणारें इतर व्यवहार करतात. त्याच प्रमाणें कांहीं स्त्रिया रेनाल्डनें लिहिल्या प्रमाणें अनिन्वित कामें करितात त्याच प्रमाणें कित्येक नीच वर्गातील मंडळी मुलावरच आपण चैन भारतात तसें कित्येकांचे जन्माची कथा ही फार विचीत्र असते व शेंकडा बऱ्याच स्त्रीया हमेशा हात धरून व काडी मोडून जातात म्हणून इंग्लिश लोक अगदीं रानटी स्थितींत आहेत किंवा नीतिमान नाहीत असें म्हणता येईल काय. कधी म्हणता येणार नाहीं.

एखादा मनुष्य पक्षपाती असला ह्मणजे तो आपल्याला अनुकूळ तेवढेंच बोलून दाखवित असतो परंतु त्याजबद्दल खरेंपणा पाहण्याचें काम लोकांचें आहे.

हिंदुजातीतील सासूची गोष्ट ऐकून इंग्लिश लोकांना अगदीं कसेंसे वाटत असेल व एका प्रकारची भीति त्यांना मनांत उत्पन्न होत असेल व तसें होणें साहाजीकच आहे. कारण जों पर्यंत हिंदु स्त्री बद्दलची त्यांची माहिती रखमाबाईनें किंवा मि० मलबारी यानें त्यांच्या डोळ्या समोर वठविलें त्या चित्रा पलीकडे जाऊं शकत नाहीं तों पर्यंत तशा प्रकारची त्यांची समजूत राहणार आहे. मि. मलबारीनें दाखविलेल्या दुर्गुणी चित्रांत गुण नसतील असें मानून ते थांबणार नाहींत असें आम्ही समजतों एखाद्या जरोतील लोक किंवा त्यांचे रिवाज बरें किंवा वाईट हें समजण्या करितां त्यांच्याशीं चांगलें दळणवळण झाल्या शिवाय किंवा त्यांची खरी गृहस्थिती समजल्या शिवाय कधी समजावयाचें नाहीं. फार कशाला आमच्या वऱ्हाडांतील लोकांचे इंग्लिश लोकांच्या स्त्रिया विषयी किंवा त्यांच्या वर्तना विषयीं जें मत आहे त्याहून बऱ्याच हिशगानें मि० मुधोळकर व मि० जोशी यांचे भिन्नमत आहे या उभय गृहस्थांनीं असें बोलून दाखविलें आहे कीं पूर्वी इंग्लिश लोका विषयीं जें आमचें मत होतें तें हल्लीं आम्ही इंग्लडांस गेल्या पासून व कांहीं दिवस त्या लोकांमध्यें वागल्या पासून व त्या लोकांच्या राहण्याचें घराण्यातील लोकांशीं संबंध झाल्या पासून अगदीं भिन्न होऊन गेलें आहे.

(मा. अं. पु. चा.)

हिंदुस्थानांतून इंग्लंडास तेथील लोकांस हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेची व प्रजेच्या सुखदुःखाची माहिती देण्याकारितां डेलीगेट स (हिंदुस्थानांतील लोकातर्फे मुखत्यार) गेले होते त्यांनीं इंग्लंडांत निरनिराळ्या ठिकाणीं मोठमोठ्या सभा भरवून त्यामध्यें जीं भाषणें केलीं तीं मराठी भाषा जाणणाऱ्या लोकांस कळण्या करितां भाषांतर रुपानें खालीं दिलीं आहेत.

आमचे मित्र मिस्तर नवरोजी पहिलें हिंदुस्थानवासी गृहस्थ यांसही ते हिंदुस्थानाकरितां मेंबर निवडून पार्लमेंट सभेस पाठवतील अशी आह्मी आशा करितो. अशा रीतीनें कळवळा दाखविणें यालाच खरी राजबुद्धि ह्मणतात असें मला वाटतें. हिंदुस्थानचें राष्ट्र सदृढ करण्याची व मानवी प्राण्याचा उत्कर्ष करण्याची खरी रीति हीच आहे. माझे मित्र मिस्तर सुरेंद्रनाथ बानरजी यांचें भाषण आपण सर्वांनीं संयमपणानें व कळवळापूर्वक ऐकावें अशी आपणांस विनंती करण्याची मला जरूरी दिसत नाहीं कारण माझी पूर्ण खात्री आहे कीं आपण त्याप्रमाणें कराल च. आतां मी मोठ्या संतोषानें मिस्तर सुरेंद्रनाथ बानरजी साहेब यांस आपल्या समोर भाषण करण्यास उभे करितो.

मिस्तर सुरेंद्रनाथ बानरजी— महाराज वुलियम वेडरबर्न साहेब, कुलीन स्त्रियानों व सभ्य गृहस्थहो हिंदुस्थानवासी लोकांचीं दुःखें आपणा सर्वांस जाहीर करून तीं दूर करण्याचे उपाय आपण योजावे अशाबद्दल आपणांस विनंती करण्याची हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभेनें कामगिरी मजवर सोपविली आहे ती बजावण्याकारितां मी आपणासमोर उभा राहिलो आहे. ही एवढी मोठी कामगिरी बजावण्याच्या योग्यतेचा व एवढ्या मोठ्या विश्वासाला पात्र असा मनुष्य मी नाहीं ही गोष्ट मी कबूल करितो. तरी करण्यास दिलेलें काम मोठें असलें ह्मणजे झालें तें काम करणारा इसम किती तरी कमकुवत असला तरी हरकत नाहीं ही गोष्ट मनांत आणिली ह्मणजे मला हें काम करण्याची जास्ती हुषारी येते [आनंदाची टाळी] तसेंच सर्वज्ञ जगनियंत्यानें आज २० कोटी प्रजेच्या हिताहिताचा हवाला तुह्मांवर सोपविला आहे. त्या बीस कोटी प्रजेचे स्वतंत्रतेबद्दल व न्यायाबद्दल हक्क आहेत हे आपणा सर्वांस वाटल्यावांचून कधींही राहणार नाहीं. आपणा सर्वांस पूज्य व जे आपणापैकीं लाखो लोकांस आनंद व सुख देतें व कोणी मनुष्यप्राणी त्याचें ज्ञान करून घेईल तर त्याचें इतर सर्व ज्ञानास तें भूषणच होईल असें जें पुस्तक आहे तें मी वाचलें व त्यामध्यें माझें वाचण्यांत आहे कीं " नीति ही राज्योन्नतीस कारणीभूत आहे " मी आपल्या देशाचा इतिहास वाचला व तो वाचल्यापासून माझ्या अंतकरणाला मोठा आल्हाद होऊन माझा फायदाही झाला. त्यामध्यें उचलण्या सारखी मोठ्या एकापेक्षां दुसरी गोष्ट जी ह्मणून सांपडेल अगर त्या सुंदर लेखांत सगळ्यांत झळकणारें जें एखादें सत्यामोभानी रत्न चमकेल तें तुमच्या धर्मपुस्तकांतील " नीती ही राज्योन्नतीस कारणीभूत आहे " या वचनाच्या अर्थाला अनुसरूनच सांपडेल. (आनंदाची टाळी) कुलीन स्त्रीयानों व सभ्य गृहस्थहो ज्या नीतीनें तुह्मा सर्वांस हल्लीची स्थिति प्राप्त झाली आहे ती नीती तुमच्या हिंदुस्थानच्या राष्ट्रांत आणून सोडा, दिलेलीं वचनें पाळा. तुमच्या नांवानें व तुमच्या देशच्या पार्लमेंट सभेच्या वतीनें व हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांनीं जे कांहीं करार केले आहेत त्यांतून मुक्त व्हा.

ती वचनें व ते करार

मला सांगण्यास फार वाईट वाटतें कीं आजच्या घटकेपर्यंत जसेचे तसेंच आहेत. आतां मी आपणास अखेरचे मागणें मागतो व मी जी आपणास दाद मागण्यास आलो त्यांत माझें हेंच मागणें मुख्य आहे कीं अह्मांस निदान अंशतः तरी लोकांनीं निवडलेल्या सभा स्थापण्याचे अधिकार द्या. ज्या ज्या ठिकाणीं इंग्रज सरकारची सत्ता व सुधारणा गेली आहे त्या त्या ठिकाणीं अशा प्रकारच्या सभा स्थापन झाल्या आहेत व त्या स्थापन झाल्यापासून त्या देशांमध्यें स्वस्थता व भरभराटी झाली आहे व देशांतील लोकांस सुखप्राप्त झाले आहे. (आनंदाची टाळी) ही जी मागणी मी आपणास करितो ही मागणी मंजूरच होईल असा थोडा भरंवसा जाणून करितो कारण आपण आमच्या देशांतील एका प्रख्यात विद्वान गृहस्थास आपण आपल्या तर्फे पार्लमेंट सभेमध्यें मेंबर करण्या करितां निवडले आहे. मिस्तर दादाभाई नवरोजी यांनीं आपला जन्म लोकहितार्थ कामें करण्यांत घालविला त्यामुळें सर्व लोक त्यास पूज्य समजतात व त्यावर त्यांचा भरंवसा आहे व त्यांच्या गुणाची वाखाणणी करितात मिस्तर दादाभाई नवरोजी यांनीं या आपल्या सद्वर्तनानें आह्मापुढें मुर्तीमंत स्वदेशहिताकरितां झटणारें उदाहरण ठेविलें आहे त्यांच्या प्रमाणें आमच्याहातून असें कधीं घडेल याची आशा करणें सुद्धां नको. त्यांना आपण यशाचा विडा द्याल असा मला भरंवसा आहे. (आनंदाची टाळी) ते प्रथम तुह्मा लोकांचे हित करण्याकारितां झटतील व नंतर मुकी बनविलेली बेदाद हिंदुस्थानची कोटिशः प्रजा हिंच हिताकरितां झटतील. (आनंदाची टाळी) कुलीन स्त्रियानों व सभ्य गृहस्थ हो! इंग्लंड देशानें मनुष्य प्राण्याकरितां मोठमोठ्या गोष्टी केल्या आहेत. या देशानें रणामध्यें मोठमोठ्या लढाया मारल्या व राजकारस्थानीं मोठमोठीं कामें केली एवढेंच नाहीं तर या देशानें लोक सुधारणेचे दुसरें मोठमोठे उद्योग केले आहेत. अशा प्रकारचा या देशाचा इतिहास असतां आपल्या परवानगीनें व पूर्वेकडील प्रदेशांत घडून आलेल्या गोष्टीवरून मी असें ह्मणतो कीं हिंदुस्थानांत जीं जीं कामें या देशाकडून झालीं आहेत त्यावरून कळून येईल कीं खरोखरीच हा देश वर्णन केलेल्या गुणास पात्र आहे.

(पुढें चालेल)

मि. शामराव लाड यांनीं आपल्या खंबायतच्या दिवाणगिरीच्या जागेचा राजिनामा दिला. बिघाड्याच्या माळीमागें साडेसाती च लागली होती. स्वराज्यांत रयतेचे लाड बरेंच पुरवावे लागतात व दाखविण्यांत येतें तितक्या जुलमी अमला खालीं तिचा कालक्षेप होत नाहीं असें ह्मणावें लागतें. त्या संस्थानातील लोकांनीं हट्ट धरून कारभारी साहेबांस तर घरीं बसवावयास लाविलेंच परंतु दंगा उपस्थित होण्याचें मुख्य कारण जी कर वसूलाची बाब त्या बाबींत या संस्थानातील प्रजा कितपत टिकाव धरतें हें पाहिलें पाहिजे. मि. शामराव मोठे हुशार कारभारी आहेत व आमच्या सरकारास व तेथील नबाबास फार प्रिय झाले होते. परंतु राजिनामा देऊन आपला जीव धोक्यांतून काढणें हेंच त्यांस या वेळीं योग्य होते.

बारावाजतां प्रदिप्त होणाऱ्या प्रखर जठराग्नीस आहुति घालण्याची सावंनें स्वरूप करून ठेवणें हाच सुधारणेचा पाया व हा पाया भक्कम करण्याला मसाला पैदा करण्यास लक्ष्मीची पूर्ण कृपा दृष्टी असणें अवश्य आहे व ती कृपदृष्टी संपादण्यास मुख्य साधन व्यापार आणि ह्याच व्यापारांत त्यांस पूर्ण यश मिळाल्या कारणानें त्यांचा चहोकडे वहावा होत आहे. व जों पर्यंत व्यापारांत त्यांनीं आपली सरशी कायम ठेविली आहे तों पर्यंत त्यांना मागें हटवण्यास कोणाची ही छाती होणार नाहीं.

सामाजिक स्थिति रीतींत किंवा व्यवहार वागणूकींत त्यांच्या चालीं रीति जरी आम्हास ग्राह्य नसल्या तरी त्यांच्यातील पुष्कळ गुण आम्हांस घेण्याजोगें आहेत. चाळणीचा गुण आम्हास टांकून दिला पाहिजे च सुपाचें अनुकरण केलें पाहिजे. आमच्या पुढाऱ्यांचा बोलण्याचा काळ केव्हां संपणार असेल तो संपो. व्यापारा मध्यें तरी वायफळ बोलण्यां पासून अथवा निबंधावर निबंध खरडल्या पासून कांहीं फायदा होणें नाहीं. सामाजिक सुधारणें करितां कृति करून दाखविण्याचा हा काळ असो वा नसो, परंतु व्यापार अथवा कला कौशल्याच्या भरभराटीची उपाय योजना होणें जरूर आहे. व तिकडे आमच्या मंडळीचें मन जितकें लवकर लागेल तितके बरें!

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 13, 1890

SOME REFLECTIONS ON REPRESENTATIVE GOVERNMENT.

(Communicated.)

(Continued from our 36th issue.)

Another case in which a central monarchy is required to carry a people through improvement is when the inveterate spirit of locality is to be got rid of. There will be no political union of small aggregates unless there is a strong authority to which they render obedience in common. The King, in such cases has an interest in raising the people to resist his subordinate chiefs.

Other miscellaneous obstacles to representative government which may be noted are strong prejudices in the people, stolid conservatism, ignorance, absence of culture. All these will be reflected in their representative assemblies. In a case like this, subjection to a foreign government, notwithstanding its inevitable evils is of the greatest advantage to a people, under which obstacles to improvement will rapidly vanish, whereas if the people were left to themselves the same obstacles would have lasted indefinitely. You will readily see that this as very much the state of India. The masses are deeply sink in ignorance. They cling to their old habits with obstinacy. There is a vast difference of opinion even among the cultured few. If we are to move onwards and not wallow in the mud of ignorance and prejudices foreign govt. of a highly civilized people like the English is an indispensable help. But only it is to be a help to something higher and how soon we shall be able to dispense with this help which at present is so necessary depends upon the educated class, men of superior culture and superior advancement.

There is another tendency in a people, which though not unfitting them altogether seriously incapacitates them from reaping the full benefit of representative government. This is the greed of power, the passion of place- hunting. There are some in whom love of power is so strong that they will be themselves the slaves of others to make others slaves of themselves. In such a govt. we have nothing but constant struggles for getting ascendency in the state the only important question is whether this or that man will be the leader, whether this eligue or that will predominate. They allow themselves to be taxed heavily if only thereby number of places competition is increased. This is a partial description of the French people. In an Englishman on the contrary, love of power, love of places, is not the ruling passion. Only he will not allow others to exercise power over himself. His ambition generally is not to rise in office but to succeed in business is a profession. Consequently English men enjoy the benefits of representative govt. better than French people.

5th Chapter... Let us consider, for a moment the proper functions of representative bodies; the meaning of representative govt. is that the whole or people of them exercise through their deputies, the ultimate controlling power. They must have this in its completeness. But though it is necessary that the final power should reside with the representatives of the people, it does not follow that the sole executive power should also rest with them. Assemblies, in the first place, are too unwidly for carrying on practical business. They are not trained for the special business of each separate department.

(To be continued.)

The following rules for securing a proper registration of births and deaths made at a special meeting by the Municipal Committee of Akola, Akot, Khamgaon, Shegaon, Ellichpur, and Basim, under section 116 C of the Berar Municipal law, 1886, having been confirmed by the Resident, are hereby published for general information:—

Rule I. On every birth of a child within the limits of the municipality the father or the mother or a guardian of the child, or in case of their absence or death, or inability on account of sickness, or other similar cause, any person living in the house in which the child was born, or any person who was present at its birth, shall within 72 hours from the time of birth give information on the following points at the municipal office, or to the divisional member of the committee in whose division the child was born, or to his peon, or to any other member of the committee appointed for the purpose, or to the Conservancy Inspector if there is one:—

(1) The division and the street of the municipality in which the child was born.

(2) Names of its parents.

(3) Caste, occupation and religion of the parents.

(4) Sex of the child.

(5) Date of the child's birth.

[6] Whether the child was born alive, or was still born, or whether, having been born alive, it died immediately after birth.

Rule II. On every death within the limits of the municipality a member of the family to which the deceased belonged, or in case of their being no such member, or such member being unable on account of absence, sickness, or other similar cause, any person living in the house in which the death took place shall within 72 hours from the occurrence of the death, give information on the following points at the municipal office, or to the divisional member of the committee in whose division the death took place, or to his peon, or to the member of the committee who has care of the conservancy and sanitation of the town, or to the Conservancy Inspector.

[1] The division and the street of the municipality in which the death took place.

(2) The name, caste, religion, sex and age of the deceased.

(3) The disease causing death, and how many days ill.

(4) The date of the death.

(5) The occupation of the deceased.

Rule III Any municipal officer receiving information under Rules I and II from any person shall, if required, furnish him with forms in the form given in the appendices A and B to these rules as may be required, and shall, on the receipt of the information give a receipt to the person furnishing it in the form given in Appendix C.

Rule IV Whoever refuses or neglects to give information in accordance with Rules I and II, it being his duty under those rules to give information, shall on conviction before a Magistrate, be lible to pay a fine not exceeding Rs. 5.

PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Evidence, Registration and Stamps.

Time allowed three hours

I What is the law of Berar in regard to *statements* and *confessions* made by accused persons *to* and when *in the custody of* a police officer? M. 10

II How should a magistrate record the confession of an accused. When a confession recorded by a Magistrate is tendered in evidence what presumtions of law and what sections of the Evidence Act would have to be considered before the confession was either rejected or admitted in evidence. Supposing the confession was rejected could oral evidence be taken to prove that the confession was made? M. 12

III (1) What are the chief rules in regard to the burthen of proof? M. 3

(2) On whom does the burthen of proof lie in the following cases reasons for decision to be given.

(1) A Hindu A asserts that he and his brother B are undivided. B denies this. M. 3

(3) A executed a deed of sale selling a field to B for Rs. 500 it is admitted that the field has never been in the posses sion of B, It is admitted that it has been in the possession of A from the date of sale till the date of institution of suit. In the suit by B, A admits the deed but denies consideration. He admitted consideration before the registering officer. The issue is in regard to the payment of consideration. M. 3

(4) A purchased a house from the guardian of B a minor. B sues to have the sale set aside on the ground that there was no necessity for the guardian to sell the property A contends that the guardian was justified in selling on the ground of necessity. M. 3

IV What is estoppel. What are the provisions of the evidence act in regard to the matter? M. 8

V What is a certified copy and how is it prepared; can a public document be proved otherwise than by a certified copy and if so how. How is a certified copy itself proved? M. 8

VI In what respects do the powers of a registrar differ from those of a subregistrar? M. 10

VII In what respects do the powers and duties of (1) The civil court (2) The collector, (3) any other public officer differ in regard to the action to be taken when an insufficiently stamped document is produced before them? M. 10

VIII A memorandum of appeal ought to bear a ten rupee stamp the appellant affixes a five rupee stamp only and presents the memorandum to the proper officer of the Court on the last day of the period of limitation. Three days after he comes to the Court and asks the Clerk of Court to let him make up the deficient stamp which the Clerk of Court allows him to do. He then affixes an additional five rupee stamp. Is the memorandum of appeal properly stamped and is the appeal within limitation having reference to the provisions of the Court Fees Act?

10 Marks.

IX State generally how witnesses are examined. What questions must not be asked in the examination in chief, cross examination and reexamination respectively. What question is a witness not bound to answer?

10 Marks

X What is an expert. In what respect does his evidence differ from that of an ordinary witness. What are the presumptions of law in regard to the credibility of an accomplice, a police man, and an expert?

10 Marks

CORRESPONDENCE.

To

The Editor, Berar Samachar

Sir,

The new notification, issued by the Great Indian Peninsula Railway Company, has added to the already existing inconveniences of the public. Abolition of reckoning of the time with A.M. and P. M. and the method of calculating time from midnight to midnight will put the passengers into great troubles. It would have been far better if the Company had warned the public to keep a pen and paper to calculate time while travelling by the rail-road.

Running of only 2 passenger trains through central Provinces and Berar is a grievance of very long standing. We required at least one Passenger train more-particularly in hot and busy season— but the Company instead of giving an extra up and down train, deprived us of the advantages of night trains making them to run without stoppage at some small stations. Especially to the peasants, agriculturing classes and Banias this arrangement will be of great inconvenience. These people used to come from their villages to zilla stations such as Akola, Amraoti by day train and after finishing work with Courts, Bazars &c, were able to return by night train. But now they are obliged to spend the whole night and almost the whole following day at these towns where they have very little means of getting shelter and food.

If the Company wanted to have a fast running train over this section, it ought to have arranged for a local train from Bhusawal to Nagpur and back, by which local Passengers would have travelled and through Passengers for Bombay, Poona Jabalpur &c. would have had their trains sufficiently convenient.

Not to attend to the just complaints of the public is, it seems, the general rule of this Company, and therefore, it would be advisable for the Government--Especially Berar Commission— to make the Company do as public necessarily requires. Our kind and benevolent Commissioner should move in the matter and see that the Company leaves its indifference and high-handedness, at least, as far as Berar is concerned.

Akola — Yours

10-10-90 — Sufferer.

वऱ्हाड.

मि० महंमद रोशनखान आनररी माजिस्ट्रेट व सब रजिस्टार दिवस यांस एक महिन्याची रजा मिळाली.

मि० सफदर अली बेग तहशिलदार से० ग्रेड हे ए० अ० कमिशनर झाल्या मुळें मि० एकनाथ मोरेश्वर से० ग्रेड तहशिलदार झाले व मि० कृष्णाजी अनंत थ० ग्रेड तहशिलदार झाले.

वर्तमानसार.

बाबू हा शब्द ब आणि बू अशा दोन शब्दांनीं झाला आहे. व या दोन्ही सामासिक शब्दाचा अर्थ "मपखुशबू" ह्मणजे सुगंध असा आहे. ज्ञा० च०

जगांतील साडे नऊ मुत्सद्दीः— पेरिक्लीज सीझर, शालेमन पहिला इंग्लंडचा विल्यम, लॉर्ड चॅथाम, वाशिंगटन, पिट, स्टेन, कव्हर, बिस्मार्क (अर्धा) शेवटले बिस्मार्क हे परदेश संबंधीं राज्यकारभारांत जितके चतुर आहेत तितकी त्यांची स्वदेशसंबंधीं आस्था बरी ल नऊजणांच्या तोडीची दिसली नाहीं ह्मणून ते अर्धे मुत्सद्दी होत.

लाहोर येथें सन १८९१ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेपासून कुत्र्यांवर कर बसणार आहे.

नेपाळी दरबारानें असा ठराव केला आहे कीं ब्रिटिश सरकारच्या प्रजेनें जुन्या चालीप्रमाणें नेपाळांतून इमारती लांकूड तोडून नेऊं नये.

यमुना नदीच्यावरील पुलाच्या दोन्ही बाजूला किल्याची तटबंदी चालली आहे या मुळें तेथील लोकांचा मनें जरा अस्वस्थ झाली आहेत असें समजतें.

कलकत्याचे हायकोर्टातील वकील बाबू प्राणनाथ पंडित यांनीं एका चार लक्ष रु. किंमतीच्या जमिनीबद्दलच्या खटल्यांत १, ४४,००० रु. मिळविले ! !

इंग्लंडचा इजिप्त सोडून देण्याचा सध्याच इरादा नाहीं असें लार्ड सालिसबरी यांचें टर्कीला उत्तर गेलें.

निझाम हैदराबादच्या राज्यव्यवस्थेंत बराच मोठा महत्वाचा फेरफार व्हावयाचा आहे व सर अस्मनजा हेही आपल्या कामाचा राजीनामा देणार आहेत असें समजतें.

एका फ्रेंच मनुष्याचे इंडियन कांग्रेस संबंधीं विचार फार महत्वाचे आहेत. ह्या तिन्हाईत मनुष्यानें कांग्रेससभेला राजाविरुद्ध ह्मटल्याबद्दल लार्ड डफरिन यांस दोष दिला आहे. ह्याचें असें मत आहे कीं ही सभा फारच राजभक्त आहे व हिचा राज्यकारभारांत सुधारणा करण्याचा उद्देश आहे.

आपल्या स्त्रीबरोबरोबर १२ वर्षांपूर्वी नवऱ्यानें रत होऊं नये अशाबद्दल ९० सुधारकांनीं हिंदुस्थान सरकारास एक अर्ज केला आहे. बीस कोट प्रजेपैकीं या ९० च्या ह्मणण्यास हिंदुस्थान सरकार कितपत वजन देतें पहावें.

इतालींत गव्हाचें पीक चांगलें आलें आहे.

मि. केशव हर्षद ध्रुव बी. ए. हे येत्या माट्रीक्युलेशन परीक्षेंत संस्कृतचे परीक्षक आहेत.

मुंबईचे लष्करी हेड क्वारटर येत्या १० व्या तारखेपासून महाबळेश्वरास झाले. यासंबंधानें विशेष प्रकारचा पत्रव्यवहार मात्र महाबळेश्वरास पाठवावा इतर नेहमीप्रमाणें पुण्यास पाठवावा.

पंजाबांत पोष्टाची तिकिटें फार झपाट्यानें खपत आहेत गेल्यावर्षी एकंदर ३६ लाख रुपयांचीं हीं तिकिटें संपलीं ह्मणजे मागील सालापेक्षां ६ लाखानें या वर्षी जास्त संपलीं.

तेलू व्हाल माथूपेट नावाच्या मद्रासेकडची रेल्वे गव्हरनरांनीं ता. २६ मिनहू रोजीं उघडली.

विंचू चावला असतां तुरटीच्या पाण्याचे कांहीं थेंब डोळ्यांत घातले असतां थोड्याच मिनीटांनीं मनुष्य बरा होतो. ठा०अ०

सरकारी कामगारांच्या वर्तणुकीवर दिवसें दिवस टिका फार होऊं लागल्या, व लाचलुच्च्या फिर्यादी करण्या बद्दलच्या मागण्या सरकारा पाशी फार जाऊं लागल्या ह्मणून हिंदुस्थान सरकारानें ह्या संबंधानें हल्लीं एक ठराव करून टाकला आहे कीं, कोणत्याही सरकारी नोकरानें आपली वर्तणूक शुद्ध करून दाखविण्या साठीं स्थानिक सरकारची परवानगी घेतल्या शिवाय अगोदर बिलकूल फिर्याद लाऊनये, अशा फिर्यादीचा खर्च पहिल्यानें नोकरानें करावा, सरकारानें द्यावा, कीं त्याच्या तर्फे फैसला झाला तर मागहून त्याला त्या खर्चाचा कांहीं भाग किंवा सर्व रक्कम सरकारानें द्यावी हें जशी हकीकत असेल तसा विचार करून ठरविण्याची सर्व मुखत्यारी स्थानिक सरकाराकडे संपविण्यांत आली आहे असें सिमल्याचे तारेवरून समजतें.

दुरी जाहाजें—पर्वतप्राय लढाऊ जाहाज असेल तरी लहानशा टार्पेडो बोटीनें त्याच्या चिंधड्या उडाविण्याची ल्पकना निघाल्याला बरींच वर्षे झालीं. आतां एका कल्पकानें त्याच्यावर ही अपील करून डब्बल जाहाजें तयार करण्याची युक्ति अमेरिकेंत काढली आहे. बाहेरील भांडें निराळें व आंतील निराळें अशा ह्या जाहाजाची घडण असून त्या दोहोंमध्यें चौफेर राहणाऱ्या रित्या जागेत लागेल तितका माल ठेवतां येतो. समय विशेषी ह्या जाहाजाचें बाहेरचें कवच काढें दगावलें, तरी आंतल्याला सहसा भीति नाही. अशी व्यवस्था केलेली आहे. ह्या नवीन जाहाजाच्या कित्येक मागण्या इतक्यांतच आल्या आहेत.

क्रिमि० प्रोसि० कोडाच्या दुरुस्तीचें एक लहानसें बिल हिंदु० सरकारच्या कायदे कौन्सिलापुढें आलें आहे.

मनुष्यांच्या चोऱ्या— बंगाल्यांत हल्लीं मनुष्याच्या चोऱ्या फारच सुरू झाल्या आहेत हे चोर म्हणजे आसामांतील शेतकऱ्यांस मजूर पुरविणारे कंट्राक्टर लोक असून लोकांस ते भुलथाप देऊन आणतात आणि बखारीतून कोंडून ठेवितात? अशा प्रकारचे कित्येक खटलें हल्लीं तिकडे चालले आहेत. तुलुराम नांवाचा एक सवदागर आपल्या बायकोनीशीं बरद्वान येथें घोडे विकण्या करितां गेला होता, त्याला फसवून एका कंट्राक्टरानें कलकत्यास आणिला व बायकोसह कोंडून ठेविला. दोनतीन दिवसांनी त्याला संशय येऊन तो प्रयत्न करून पळाला व त्यानें पोलीस ठाण्यांत जाऊन फिर्याद केली. पोलीसांनीं झडती घेतली त्यांस त्या कोंडवाड्यांत आणखीं दोन मनुष्य कोंडून ठेविलेलें सांपडलें. खटले चालले आहेत.

बरे झालें — सरकारी कामगारांनीं जमिनी खरेदीच्या व व्यापाराच्या भानगडींत पडूंनये असें सरकारानें जे नियम केलेले आहेत, त्या सर्व नियमाचे संक्षेपतः विवरण करून हल्लीं एक सरक्युलर सुटलें आहे, त्यांत सरकारी नोकरांनीं स्वतःच्या उपयोगास जमीन विकत घेण्यास हरकत नाहीं. त्याचा व्यापार मात्र त्यांनीं करूंनये असा अर्थ केला आहे, असें स्टे. म. वरून समजतें. स.शो.

काबूलचे अमीर लॉटसाहेबांना भेटावयाला हिकडे येणार आहेत.

हुगळी येथील सर्व शाळांत व कालेजांत व्हाइसरॉय साहेबांच्या परवानगी वरून विद्यार्थ्यांना कवाईत शिकविण्यास प्रारंभ केला आहे.

विंचू डसला असतां कापुराचा वास घेण्या सारखें उत्तम औशधच नाहीं. क. त.

बंगालच्या चेंबर आफ कामर्सनें इनकमटाक्सच्या संबंधानें सरकारास अर्ज केला होता त्याला उत्तर ह्मणून सरकाराकडून ज्या चार ओळी आल्या आहेत त्या अगदीं मासलें वाईक आहेत. " कर कधी कधी केला जाईल हें सांगवत नाहीं; व तो लोकांस आवडला आणि न आवडला ह्मणून सरकारास त्याचे काय, "या सरकारच्या उत्तरा मुळें आजवर कधीं जर " प्रजेचे हित तेंच आमचे हित तिच्या कल्याणांतच आम्हांस आनंद " असें आमच्या बादशाहिणीनें म्हटलें असेल तर त्याला हरताळ लागली पाहिजे व इंग्रज सरकारचें राज्य व मुसल्मानांतील जुलूम यांत कांहीं फरक नाहीं असें समजलें पाहिजे.

ठराव—लष्करी पेनशनर शिपायांस मुल्की खात्यांतून पटेवाल्यांच्या वगैरे जागा देण्या बद्दल सरकारानें पूर्वीच ठराव केलेला आहे. परंतु " पेनशनरांनीं पुनः दुसरी सरकारी नौकरी पतकरिल्यास त्याचा पेनशनाचा हक्क दुर होईल " असा नियम झालेला आहे. त्याची वाट काय? असा त्यावर एक प्रश्न निघाला होता, त्या बद्दल सरकारानें हल्लीं असें ठरविलें आहे कीं लष्करी पेनशनरांस ह्या जागा दिल्या, तरी त्यांचे पेनशनास बाध येत नाहीं चपराशी. चौकीदार, गेटकीपर, फारेस्टगार्ड, पोष्टमन इ० जागा लष्करी पेनशनरां करितां च राखून ठेवाव्या असें विशेषें करून ठरविण्यांत आलें आहे. न्या. सीं

१८९१ च्या फेब्रुवारी महिन्यांत खाने सुमारी होणार असल्यामुळें त्या कामास मदत करण्याकरतां मुंबईचें हायकोर्ट व इतर सर्व सिव्हिल कोर्ट फेब्रुवारी ता. २५—२६ व २७ रोजीं बंद राहतील.

मि. आत्माराम चिमणाजी गडकरी यास नाशिक जिल्ह्यांत वकिलीची सनद मिळाली.

पुण्याचें घोड्याचें प्रदर्शन गेल्या तिसऱ्या तारखेस गव्हरनरांचें हातून उघडण्यांत आलें. या प्रदर्शनांत एक घोडा आला. असून त्याची किंमत १०, ००० रुपये झाली होती परंतु त्यांच्या पायास जरा दुखापत झाल्यामुळें तो ४००० रुपयास विकला गेला.

निझामच्या राज्यांत कांहीं गुप्त घोटाळा उडाला आहे असें ह्मणतात. ठा०अ०

युरोपांत पेसली येथें एक लहान मूल समोरून येत असलेल्या बैलगाडीखालीं सांपडून मरणार असें पाहून एका कुत्र्यानें त्यांचे कपडे तोंडांत धरून त्यास ओढीत ओढीत पलीकडे नेलें । कुत्र्याच्या अंगीं असे अमोलीक गुण असतां त्यांस मांजरापलीकडे आमच्या शास्त्रानें कसें गणलें हें कळत नाहीं.

काश्मीरच्या महाराजांस इंग्रजसरकार फिरून त्यांचे सर्व हक्क देणार ह्मणून समजतें काबूलच्या अमीर साहेबास शांत करण्याचेंच हें साधन नसेलना ?

फ्रान्स सहराच्या मैदानांतून रेलवे करणार ह्मणून समजतें. पु० वै०

मद्रासेस कोणी मि. मार्सल नांवाचा इंग्रज आहे तो हिंदु बनला आहे, व हिंदुधर्माचा तो उपदेश करीत असतो.

मुंबई—दोनशें रुपयाचा दंडः— हांगकांग गिरणीचे म्यानेजरानें बारा वर्षांच्या आंतलि पांच लहान मुलें कामावर लाविलीं ह्मणून मि. रिचर्डसन मॅजिस्ट्रेट यांनीं त्या म्यानेजरास२०० शें रुपये दंड केला. दी० बं०

कलकत्ता हायकोर्टाच्या गेल्या सेशनांत हिंदुस्थान, चीन, व आस्ट्रेलियाच्या चार्टर्ड ब्यांकेस बुडविल्या बद्दल शामचरण सेन या बंगाली गृहस्थावर फौजदारी खटला होता हे गृहस्थ त्या ब्यांकेचे वीस वर्षें खजिनदार होते याणीं ब्यांकेस १२ लक्ष रुपयांची टोपी घातली असा त्यांच्यावर आरोप होता. हायकोर्टाचे सेशन्स जज्ज जस्टिस प्रिन्सेप यांच पुढें हा खटला बरोबर तेरा दिवस चालला होता शामचरण सेन यांच्या तर्फे मि० जाक्सन व ब्यांकेच्या तर्फे आडव्होकेट जनरल होते. खटल्याच्या पहिल्या दिवशी १३० सोन्याच्या मोहरा व पुढें खटला चालेल तितक्या दिवस रोज १०० मोहरा अशी फी चार्टर्ड ब्यांके कडून अडव्होकेट जनरल यांस मिळाली. ह्या खटल्याच्या चौकशी साठीं विशेष जुरी बोलाविली होती तीस सहा अस्सल युरोपियन व तीन नेटिव गृहस्थ होते.

ब्यांकेचे मुख्य मि० लिंडसे यांस शामचरण सेन यानें स्वदस्तूरचें पत्र लिहिलें आहे त्यांत "ब्यांकेतून बारालक्ष रुपये मी उचलले आहेत, ब्यांकेतून असें पैसे मी आजच नेले नाहींत. मि० सेन यांच्या कारकीर्दीं पासून माझी अशी वहिवाट होती व ती ह्या मिती पर्यंत चालली आहे. मी एक सारखा झटपटत आहे पण काय करावें दैव मज्ज अनुकूल नाहीं. मि० लिंडसेस मी तीन लक्ष रुपये उचलल्या बद्दल सांगितलें तें खरें नाहीं आदल्या दिवशी जो अफू खरेदी केली तिच्या करितां मी तीन लक्ष रुपये नेलें ही गोष्ट सर्वस्वी खरी होती." असें लिहीले असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. या प्रमाणें स्वदस्तूरच्या लेखानें पैसा नेल्या बद्दल पूर्ण कबुली असतां शामचरण सेन दोन्ही आरोपां बद्दल दोषी नाहीं असा अभिप्राय दोन्ही तर्फेच्या बारिस्टरांची भाषणें ऐकल्यावर जूरीनें दिला, आणि त्या अभिप्राया प्रमाणें शामचरण सेन हा दोष मुक्त होऊन सुटला.

शु० मू०

आपुढें दरमहा ४९००००० असें रुप्याची खरेदी अमेरिकेंत होणार.

क्रिमिनल प्रोसीजर थोडा दुरुस्त करण्याचें बिल व्हाईसरायांचे कायदे कौन्सिलांत गुदरलें.

गतवर्षीं इनकम टाक्सचें उत्पन्न रुपये १५,०४६४२ झालें व खर्च रु० २७१२८ झाला. ही एक सरकारास कायमचीच कामधेनु मिळाली आहे.

मातीतून सोनें काढण्याच्या कामांत विजेचा उपयोग करण्याचे एक नवीन यंत्र निघाला आहे.

फ्रान्सांत नारळापासून सिलुलोज ह्मणून एक पदार्थ तयार केला आहे. तो पदार्थ घण असून, त्याचे विशिष्टगुरुत्व बुचाच्या लाकडापेक्षां ही कमी आहे. त्याच्या योगानें गलबत समुद्रांत कधींच बुडावयाचें नाहीं असें करतां येईल असें ह्मणतात. म. मि.

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ३ " " ८८
सालअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास.....८४

Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ८१८६
दुसरें खेपेस ८१

वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
Per line over10...4 as
Repetition per line3as

VOL XXIV AKOLA MONDAY OCTOBER 20 1890 NO 41

वर्ष २४ अकोला सोमवार तारीख २० माहे आक्टोबर सन १८९० इ० अंक ४१

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे. उपदंशजन्य विकार, (गरमी) व जिपासून होणारे पक्षघातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे. सारांश उपदंशजन्यापासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बाटली व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुन्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यांत वरील सर्व औषधे मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर
गीतमराव केशव, मुंबई.

सचित्रक्याटलाग

आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव ह्यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं माझा मुलगा नामे विश्वनाथ वल्लद रतनसा याजला मी मुखत्यारपत्र दिलें होतें पण तो वाईट चालीचा निघाला असून त्यानें लोकांचें कर्ज दुकानदारीकरितां न घेतां चैन करीत आहे करितां कळवितों कीं त्याचें मुखत्यारपत्र मी रद्द केलें आहे व त्याजला कोणी कर्ज वगैरे देऊं नये दिल्यास मी जबाबदार नाहीं. व ज्यांनीं यापूर्वी दिलें असेल तें दुकानचे वहीस जमा असेल त्यापुरतां मी जबाबदार होईल. कळावें. तारीख १ आक्टोबर सन १८९० इ०

(सही)

रतनसा सोनसा रंगारी पातुर्डे दस्तुरखुद्द

नोटीस.

किसन वल्लद परशराम कुनबी राहणार ज्वाहागीर पुनोती यांस खालीं सही करणार नोटीशीनें असें कळविताकीं आमची मुलगी नामें गीरजी तुह्मांस लग्न करून दिली व पाचसाहा वेळा सासर माहेर ही जाहले परंतु मुलीला तुह्मीं खाण्यास वगैरे कांहीं देऊं नये हाल करावेत आज एकवर्ष जाहले गीरजी ही शाहाणी जाहाली ह्मणून आह्मी तुमचे घरी आणून दोनवेळा पोंचती केली परंतु तुह्मी व तुमचे वडील बंधु जानजी यांणी आह्मांस धमकीनें त्या प्रमाणें सोबीगाळ करून आमचो व मुलीची इज्जत घेतली या वरून मुलीस वागविणें नाहीं हे उघड दिसते. याज करितां ह्या नोटीशीनें तुह्मां उभय बंधुस असें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत ह्यार जातभाई चांगलें गृहस्थ यांची अशी खात्री करून द्यावी व मुलीस नेतर घेऊन जावे असें केले नाहीं तर हीच सोडचिठ्ठी समजून आह्मी मुलीचा घरठाव दुसरा करूं मग तुमचा कोणतेही प्रकारचा हक्क आमेचवर व मुलीवर नाहीं. हे समजावे ह्मणून दिली नोटीस सही तारिख १० माहे अक्टोबर सन १८९० इसवी.

सही

सहीची नीशानी चंद्रभान वल्लद रामजी पाटील गुडधीकर

नोटीस

मेहेरबान सयदअमीर वल्लद सयद बजीर साहेब राहणार उमरावती यांस खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मांस तारीख ९ मे सन १८८९ इसवीचे नोटीशी वरून हकीकत कळविली च होती त्यावरून आपण बाळापूर मुकामी येऊन पंच व काजीसाहेब यांच्या समक्ष धर्मीसंबंधी लेखी तलाख वरील पंचा समोर तारिख १५ माहे मे. सन १८८९ इसवी रोजीं देऊन तुह्मीं रवाना जाहाला हल्लीं मी दुसरा नवरा करणार आहे तर माझें मेहेरचा पैसा रुपये ५०० नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत बाळापूर मुक्कामी जनाब मौलवी साहेबांचे समक्ष देऊन पावती घ्यावी तसें न केल्यास कोर्ट मार्फत तजाविज केली जाईल हल्लीं माझें राहण्याचे ठिकाण तालुके बाळापूर जिल्हे आकोला येथें मेहेराबखा लोकल कमीटी कडील जमादार यांचे येथें आहे. वरील व्यवस्था लवकर न केल्यास आमचे कामांत आडथळा येईल. व पुढें तुह्मांस ही यापासून त्रास होणार व मेहेरबान गुलाबखा व. इंगनखा यांचे कर्जरोख्या बद्दल आह्मी आपसां तोडून निकाल केला. कळावें म्हणून दीली नोटीस सही. तारीख १५,१०,९०, इसवी

सही

सही उडदु नुरबी इच्या हातची असें

पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजू नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते.

रामराम वि. वि. खालीं लिहिलेला मजकूर आपल्यापत्रांतू प्रसिद्ध करण्याची मेहर बानगी कराल अशी आशा आहे.

ज्या गरीब लोकांस वागविणारे नसून ज्यांच्या आंगांत काम करण्याची शक्ति राहिला नाहीं अशापैकीं माझ्या शक्तिप्रमाणें खर्चांत खर्च पांच इसमास वागविण्याची मी येत्या दसऱ्यापासून सोय केली आहे. सदरहू लोक खालीं लिहिलेल्या नियमाप्रमाणें असले पाहिजेत.

१ हे इसम वऱ्हाडी असावे.

२ ह्या इसमास कुणब्याच्या किंवा ब्राह्मणाच्या हातचें अन्न चालावें.

३ सदरहू इसमाचें नावें जमीन नसावी व जिंदगी नसावी.

४ त्यास कोणी वारस नसावें.

५ त्याला महारोग नसावा. किंवा असाच कोणी भयंकर रोग नसावा.

६ त्यास काम करण्याची शक्ति नसावी

७ त्यांच्या आंगावर डागडागिनें नसावेत.

८ ते कुलीन घराण्यांतील असावेत

९ सरकारी गुन्ह्यांत आलेले नसावेत.

वरील नऊ नियमाप्रमाणें दाखले ज्या गांवचे इसम असतील त्या गांवच्या पाटील पांड्यानें आमच्या कडेस पाठवावें. दाखले आल्यावर सदरहु इसमास आणण्याची सोय आह्मी करूं.

सदरहू मजकूर वऱ्हाडचे पत्रकार आपल्या पत्रातून एकवेळ प्रसिद्ध करतील तर त्यांचे आमच्यावर महत उपकार होतील.

कळावें तारीख १२ माहे अक्टोबर सन १८९० इ०

सूर्यभान नानजी हेडमास्तर केळीवेळी तालुके आकोट.

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन शुद्ध ७ शके १८१२

सिंहावलोकन.

(मागील अंकावरून पुढें चालूं)

मागील अंकातील लेखावरून सांप्रत जारी असलेलीं खटपट व्यर्थ आहे असें सिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे असें कोणीही समजूं नये. आमच्या सरकार कडून होत असलेली आगळीक त्यांच्या पदरांत घालून देण्यास आपल्यास नेहमीं तत्पर असलें पाहिजे. व वेळोवेळीं सरकारची कानउघाडणी करणें आमचे कर्तव्य आहे व ते कर्तव्य आमच्या कडून जर न बजाविलें जाईल तर आमचे पुरेहाल आहेत. परंतु राजकीय हक्क सारख्या माशानें गिळलेल्या रत्नाच्या शोधांत सर्वच वेळ दवडणें हितप्रद होणें कठीण शोचनीय वाटत असलेली स्थिती जर सुधरणें अवश्य आहे तर राजकीय सुधारणें सारख्या परकीयावर सर्व प्रकारें अवलंबून असणाऱ्या गोष्टींत सर्व श्रम खर्च घालणें श्रेयस्पद होईलच असें ह्मणणें धाडस होय. कष्टमय भासत असेलली सांप्रतची स्थिती दूर करण्याचें रामबाण साधन व्यापार व कलाकौशल्योत्तेजन आहे, असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. तिकडे आमचे लक्ष कां जाऊं नये?

देशोन्नतीची मुख्य साधनें व्यापार व कलाकौशल्य. ह्या दोहोंतही आमचा देश मागासलेला असल्या कारणानेंच अम्हांस सांप्रतची दीनवाणी स्थिति प्राप्त झाली आहे. व ह्मणूनच राजकीय सुधारणें बरोबर ह्या दोघांच्या सुधारणेचा पाया आह्मास बसविला पाहिजे. मनुष्य प्राण्यांचा कल जर सुखप्राप्ति करून घेण्या कडे आहे तर ह्यांची व्यापारांत सरशी झालीच पाहिजे. व कलां कौशल्यांत निपूणता असलीच पाहिजे परोपकार व स्वातंत्र ह्या दोहोंचे साधन जर अवश्य आहे व ते साधन होण्यास दुसरा मार्गच नाहीं तर आमच्या लोकांनीं हलगरजीपणा करून दारिद्रांध कारांत चांचपडत कां असावें हें कळत नाहीं. व्यापारामध्यें व त्यांच प्रमाणें कारागिरीत सरशी दाखविण्यास अलीकडे आहेत तशीं साधनें आम्हांस पूर्वी कधींही नव्हतीं. इंग्रज

पारशी आदिकरून लोकांचा कित्ता आम्हांसमोर मांडलेला असून ही आम्हीं आपलें आळस झुगारून देणार नाहीं तर त्याचे परिणाम आम्हांस किंवा आमच्या पुढच्या पिढ्यांस कसकसे भोगावे लागतील ह्याचा एकातरी सुज्ञानें विचार केला आहे काय? खाविंद चरणीं मिलींदमान होऊन रहाण्यांतच आमचा सर्वकाळ जाणार कीं काय व दारिद्र आणि अपमान ह्यांस कायमचा आश्रा देऊन काल च। दिवस गेला तोच बरा होता अशा विलापांत कालक्रमणा होऊन शेवटीं आमची काय वाट होणार असा एक मोठा बिकट प्रश्न कित्येक दूरदर्शी सज्जनांस उलगडावा लागणार आहे. जगाचें पाऊल पुढें आहे. त्याची सुधारणा झपाट्यानें सुरू आहे इत्यादि सिद्धांत ठरीव होऊन बसले आहेत परंतु तेच सिद्धांत ह्या देशाला लागू करून स्वस्थ झापा घेण्याचें सोडून देणें भावी काळांस फायदेशीर होणार आहे. (पुढें चालूं)

रखमाबाईनें विलायतेतील वर्तमानपत्रांत दिलेला मजकूर.

मुलांचे लहानपणीं लग्न करणें अगदीं तान्हा असतांना लग्न करणें किंवा पाळण्यांत देखील सोयरीक जमविणें व मुलमानें लग्न करणें. असें चारदां कां दहादां 'लग्न' शब्दाचा उच्चार कितीदां ह्मणून करावा! आणि हेच शब्द आपल्यापैकीं किती लोकांस कंटाळवाणें होऊन बसले आहेत बरें! असें जरी आहे तरी देखील या शब्दांचा उच्चार वारंवार करणें किती अवश्यक आहे बरें! आणि याचा उद्देश एवढाच कीं हिंदुस्थानांतील लोकांत हा जो दुष्ट प्रचार लहानपणीं लग्न करण्याचा पडला आहे तो लोकांच्या कसा वर्मीं भेदतो आहे आणि प्रत्येक माणसाचें व एकंदर लोकांचें कर्मे अनहित होत आहे व आजपर्यंत झालें आहे हें दाखवायचें. लहानपणीं लग्न करण्याची चाल कशी पडली हें सांगत बसण्याचा किंवा त्यावरून पुढें होतां होतां पाळण्यांतच सोयरीक जमविण्यापर्यंत मजल येऊन पोचली हें दाखविण्याचा कांहीं आज उद्देश नाहीं. पण ही चाल फारच अलीकडे पडली आहे अशाबद्दल कांहीं संशय नाहीं व जुन्या काळीं हिंदु लोकांत ही चाल नव्हती अशाबद्दल पुरावा हा आहे एवढें सांगितलें ह्मणजे पुरें होईल. आज आपल्याला विचार कर्तव्य म्हटला ह्मणजे एवढाच कीं हिंदुस्थानांत आज लहानपणीं मुलांचीं लग्नें होत आहेत व त्यामुळें सहस्रावधि मुलांचे जिणें गुलामगिरींत नसून सध्यां बंदींत असल्यासारखें होत आहे. या दुष्ट चालीमुळें एका दोघांचा नव्हे पण प्रत्येक कुटुंबाचा व साऱ्या हिंदू लोकांचा देखील मोठा नाश झाला आहे. कोणत्याही प्रचाराचा चांगुलपणा पाहायाचा ह्मणजे त्यापासून लोकांस फायदा काय होत आहे हें पाहायचें व तो जर या प्रचारापासून होत नसेल तर प्रत्येक या देशाचे हितचिंतकानें हा दुष्ट प्रचार नाहींसा करण्याकरितां मनापासून झटलें पाहिजे.

लहानपणीं लग्न झाल्यामुळें शंभरांत एखादेसुद्धां ठिकाणीं त्याचा ह्मणजे चांगला परिणाम होत असेल असें नाहीं पण नव्हेच्या-ण्णव ठिकाणीं वाईट परिणाम मात्र खास होतो. प्रथमतः यापासून आईबापांवर काय परिणाम होतो तो तो पाहूं. आपलीं मुलें शरीरानें सदृढ असावीत, हुषार असावींत व योग्यायोग्यतेचा विचार त्यांस करतां यावा अशाबद्दल कित्येक आईबापांवर ईश्वरानें मोठीच जबाबदारी ठेविली आहे. पण आमच्या लोकांत या जबाबदारीपेक्षां दुसरी एक डोईजड होऊन बसली आहे तो कोणती तर मुलांचें लहानपणीं लग्न करून टाकण्याची. मूल जन्मास आलें ह्मणजे त्याचे आईबापास एक मोठी घोड्याएवढी काळजी उत्पन्न झाली ह्मणायची. ही काळजी किती असतें हें मुलांचे लग्न लहानपणीं ज्या देशांत करीत नाहींत त्यांस कांहीं समजणार नाहीं. चांगले नवरे व बायका मिळाल्या पाहिजेत म्हणून होईल तितकें लवकर लग्नें उरकून घेतात कधीं कधीं तर मुलाचे बाराव्या दिवशीं चांव ठेवतात व त्याच दिवशीं सोयरीक होते पण बहुधा बारीच नंतर होते. आठवर्षाचे होण्यापूर्वीं जर त्या मुलीचें लग्न झालें तर मोठेच भाग्य समजतात. पण ज्याच्या नशीबीं हें लिहिलें नसेल त्यांची गत काय? बहुतः वर्षाच्यावर मुलगा लग्नाचा राहिला किंवा १० वर्षांत मुलगी राहिली तर त्यांच्या आईबापांना लोकांत खालींच पाहावें लागतें. बापाला एवढी काळजी नसते पण बिचाऱ्या आईला मात्र पोराविषयीं काळजी फार आणि सारी भिती ही कीं लोक काय ह्मणतील. आपल्या मैत्रिणींत तोंड दाखविण्याची देखील तिला लाज! तिच्या बिचारीचा यांत तो अपराध काय! तरी पण लोकांचे हासूं सोसून घ्यावें लागतें. मग सारखा देवाचा धांवा चालतो. देवा! आमची आतां लाज राख! कांहीं वेळ असें चाललें म्हणजे अगदीं सोसेनासें होतें. योग्य मुली जोगता नवरा मिळाला नाहीं म्हणजे मग काय कसा तरी नवरा पाहायचा. आंधळा पांगळा कसाही असो खुळा असला तरी चालेल पण कसलातरी नवरा आपल्या जातीची बघायचा आणि त्याच्या पदरीं तिला लोटायची! मुलगी द्यायची ती नातींतच दिली पाहिजे त्यामुळें तर योग्य नवरे फारच थोडे मिळतात. आणि ही जातीतल्या जातींत स्थळें पाहाण्याची चाल लहानपणीं लग्न करण्याच्या इतकी खोटी आहे.

लग्नाचें ठरलें म्हणजे मुलीचें लग्न ९ वर्षांपूर्वीं व मुलाचें १४ वर्षांपूर्वीं लग्न केलेंच पाहिजे लग्नाला खर्च पाहिला तर बापाला ऐपत एकपट व खर्च वीसपट एका मुलाचें कार्याला लागलेला पैसा फेडीपर्यंत तीन चार वर्षें लागतात मग साहासांत मुलें असतील त्यांची गत तर विचारायलाच नको. त्यांचे सारें आयुष्य या रामरगाड्यांतच जातें एक कर्ज फेडावें तों दुसऱ्याची तयारी झालीच. चाल पडली दुर्घट तिच्यापुढें काय उपाय? साऱ्या देशभर या चालीचा भयंकर परिणाम आहे. लोकांच्या साऱ्या सुखावर व शांतीवर माती पडते पण चाल आहे ती आहेच. कित्येक मुलांचे बाप सावकारी तुरुंगांत महिन्याचे महिने व वर्षांची वर्षें काढतात या भयंकर चालीमुळेंच एवढा दुःखाचा प्रसंग! कित्येक कुटुंबें सफाई बुडाली पण चाल आहे ती आहेच आणखी लाहापणीं लग्नें झाल्यानें नातवंडें होतात मग मुलगा किंवा घर जांवई कवडीन मिळविना त्याला मुलें होण्याची कांहीं बंदी नाहींच. आपल्या मुलांना खाऊं घालायचा बापच आणि नातवंडें १० १२ पोसायची.

आतां नवरा बायकोचें लाहानपणीं लग्न झाल्या पासून काय स्थिती होतें तें पाहूं मुलाचें वय बारावर्षाचें असतें नसतें तोच त्याला नवेरपण येतें. त्याला कांहीं तरी त्या स्थितीची योग्यता असतें काय?

आठराव्या वर्षी पोरें पुष्कळांना होतात. शाळेंत असलातर अभ्यासावर मन लागत नाहीं. संसाराची काळजी लागतें. त्याचा भार त्याला सोसेनासा होतो. उमेद त्याची सगळी गुंडाळून ठेवावी लागते. अभ्यासांत आला खो. मग शाळा सोडावी लागते व कुटुंबाचें संरक्षण होण्यासाठीं कोठेंतरी नौकरी करावी लागते. पोरखेळ सर्व सगळे सोडून द्यावे लागतात व एकसारखें श्रम करावे लागतात इकडे कुटुंबाचें संरक्षण करावयाचें त्यांत दुबळी बायको आणि पोरें ही पाप्याची पितरें असतात आणि त्यांची लग्नकार्यें करायला आणखी कर्ज काढावें लागतेंच. कधीं कधीं स्वारीचें लग्न झालें, असतें त्यांचें ही कर्ज त्यांनींच वारायाचें आणि या प्रमाणें या पिढीनें पाप करोंत व भोगावें पुढलीनें असें होतें. अशा स्थितींत संसाराची काय स्थिती असेल याची कल्पना सहज करतां येईल.

(पुढें चालूं.)

(मा. अं. पुढें चालूं)

आज इंग्लंड देशांतील लोकांनीं एवढें मोठें हिंदुस्थानराष्ट्र अज्ञानांधःकारांत बुडालेलें पाहून त्यांस उंच प्रतीच्या सुधारलेल्या देशाच्या स्थितीस आणून पोहोंचविलें. तसेंच त्यामध्यें नवीन सुधारणेचें बीज पेरून त्यास नवीन जन्म दिला. हें सर्व भूषण इंग्लंड देशांतील लोकांनाच आहे. आमच्या हिंदुस्थान देशामध्यें सुधारणा विद्या व कला ह्या सर्व गोष्टी नांदत होत्या असा काळ खरोखरी होऊन गेला व त्याकाळाची आठवण झाली ह्मणजे आह्मांस त्या बद्दल मोठा अभिमान वाटतो. रोम शहराचें नांवाचा व कीर्तीचा गजर ऐकूं येण्यापूर्वी, तसेंच अलेक्झांडर बादशाहाची सेना तैग्रीस व यूफ्रेतीस नदीच्या किनाऱ्यावर येऊन थडकण्या पूर्वी, व बाबेलान शहरांत भरभराटीचा कळस होऊन गेला होता त्यावेळीं आमचे पूर्वजांनीं भाषेची सुधारणा केली नीति वाढविली व धर्म स्थापना केली. आपणास हल्लींच्या काळीं जें ज्ञान प्राप्तझालें आहे त्या ज्ञानाच्या दृष्टीनें ह्या गोष्टीचा विचार करून आपल्या मनांत त्याबद्दल कांहीं ही तरी सुधारलेल्या लोकांस ते विषय अद्यापि आवडतात व त्यांचा ते अद्यापि अभ्यास करितात हें आपण पक्कें लक्षांत ठेवावें. (आनंदाची टाळी) ह्या गोष्टी प्राचीन काळच्या आहेत व त्याबद्दल आतां बोलण्यांत अर्थ नाहीं, त्यापुढें झटिंग बादशाही सुरू झाली, ब्राह्मणाचें वर्चस्व मागलें मीही कमनशीबी ह्मणा अगर नशीबवान ह्मणा, ब्राह्मण वर्गांतीलच आहे अशा प्रकारची घटना शतावधी वर्षें पर्यंत चालली व पुढें अशा स्थितीपासून अवश्यमेव होणारे परिणाम घडून आले. हिंदुस्थान देश निकृष्ट दशेस येऊन पोहोंचला; नेटिव संस्थानें अगदीं मोडकळीस आलीं, व परस्परांमध्यें सख्य भाव नाहींसा होण्याची स्थिती येऊन प्राप्त झाली. अशा प्रसंगीं इंग्लंड देशांतील लोक आह्मांस तारण्यास येऊन उतरले. इंग्लिश लोक तारण्यास आले ते परोपकार बुद्धीनें आले असतील असें आपण ह्मणाल तर असें नाहीं हो! ते केवळ द्रव्य प्राप्ती करितां व देशाभिलाष करण्या करितांच आले. (आनंदाची टाळी) कसें हो असो इंग्लंड देशानें हिंदुस्थानचें पुष्कळ कल्याण केलें. तरी

अद्यापि त्यांचे हातून पुष्कळ
होण्याचें राहिलें आहे. (ऐका ऐका)

इंग्रेज सरकारच्या अमला खालीं शांततेपासून व सुराज्या पासून होणारीं सुखें आह्मी भोगून राहिलों आहोंत. (ऐका ऐका) इंग्लंड देशांतील लोकांनीं आह्मास उंच प्रतीचे इंग्रजी विद्यादानाची अप्रतीम देणगी दिली आहे. तसेंच छापण्याची मोकळीक हीअमोल्य देणगी दिली आहे. तसेंच वादविवाद करण्याची मोकळीक ठेविली आहे. आमच्या देशांत स्थापिलेल्या युनिव्हर्सिटी मधून दरसाल हजारों लोक पदव्या घेऊन निघत आहेत. हे लोक पश्चिम खंडांतील भाषेंत प्रावीण झालेले आहेत व त्यांना तुमच्या देशांतील राजकारस्थानी कामें चांगल्या रीतीनें अवगत आहेत. युरोपखंडांतील भाषेचें ज्ञान त्यांना मिळाल्यामुळें त्यांना युरोपखंडांत स्थापन झालेल्या सभांप्रमाणें आमच्या देशांत ही सभा असाव्यात असें मागणें ते करीत आहेत. अशा स्थितीमध्यें त्यांचा पुष्कळ काळ गेल्यामुळें देशांतील मूळ स्थिती त व बाह्य स्थितींत इतका कांहीं फरक पडून गेलेला आहे कीं राष्ट्रांत जिकडे तिकडे प्रत्येक सजीव चळवळ दिसत आहे (ऐका ऐका) बंड पुंडावे व रक्तस्राव न होतां राज्यक्रांति होऊन गेली आहे. व अशा प्रकारची राज्यक्रांति झाल्याचा कोणत्या ही इतिहासांत दाखला सांपडणार नाहीं. फक्त तुमच्या देशाच्या इतिहासांत जो सांपडेल तोच खरा. अशा प्रकारची पूर्ण उच्च स्थिती ह्या देशाला आली ह्याचे श्रेयाचा वांटा इंग्लंड देशाचाच आहे व ज्या प्रसिद्ध पुरुषांनीं इंग्लिश राष्ट्राची स्थापना केली त्यांनीं अशा प्रकारचें भाकितच करून ठेविलें होतें. त्या गेल्या काळच्या महा पुरुषांपैकीं एकानेंच कायतो या वैभवाचा अनुभव घेतला. एवढेंच नाहीं तर राष्ट्राचा बोजाही शिरावर घेतला असे जे महाराज मेकाले साहेब, ज्यांची आठवण आतां नुकतीच अध्यक्ष साहेबांनीं केली होती त्या मेकाले साहेबांनीं इसवी सन १८३७ सालीं चारटर आक्ट (सनदेचा कायदा) पसार झाला त्या वेळीं जें भाषण केलें तें भाषण हल्लींच्या काळीं तेव्हां पासून घडून आलेल्या गोष्टींशीं ताडून पाहातां मलाच काय, परंतु माझी अशी खात्री आहे कीं, तुह्मांलासुद्धां असें वाटेल, कीं, तें भाषण कोण्यातरी भविष्य वादी देवतेनें असलें पाहिजें. त्या वेळीं मेकाले साहेब ह्मणाले "आमच्या राज्य पद्धती खालीं हिंदुस्थानांतील लोक इतके हुशार होतील कीं ते त्या राज्य पद्धतीला मागें टाकून देतील, आमची प्रजा चांगल्या राज्य व्यवस्थेखालीं [illegible] ह्यामुळें तिला ज्यावेळीं चांगल्या राज्यव्यवस्थेची जरूरी लागेल व युरोपखंडांत असलेल्या सभा आमचे देशांत स्थापन कराव्यांत

असें मागणें तो करील असा दिवस कोणत्या काळीं येईल हें मी सांगूं शकत नाहीं. परंतु तो ज्या काळीं येईल तो काळ इंग्लंड देशाचे इतिहासांत मोठा भाग्याचा समजला जाईल." अशा तऱ्हेची पूर्ण स्थिती, जिची मोठ्या प्रेमभावानें अशा करीत होतो तो हल्लीं आली आहे.

नुकत्याच खंबायतचे झालेल्या बंडाचें प्रायश्चित तेथील नबाबास भोगावें लागले. सरकारनें दोन वर्षे पावेतों त्यां संस्थानचा कारभार त्याच्या पासून आपल्या कडे घेतला आहे. मि. शामराव लाड तेथील दिवाण व पोलिटीकल एजंट हे दंगा होण्यास मूळ कारण होते व नबाबासही शिक्षा विनाकारण देण्यांत येत आहे असें नबाबाच्या भावाचें म्हणणें आहे. काय घोटाळा आहे कोण जाणें! !

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 20, 1890

MRS. PECHY- PHIPSON ON CHILD MARRIAGE AMONG THE HINDOO COMMUNITY.

Mrs. Pechy- Phipson gave a very instructive lecture on the baneful effects of child-marriage to a large audience of the Hindus at the Hall of the Prathana Samaj in Bombay. The lecture is full of sincere and earnest advice to the Hindoo society, with a very touching appeal to put down the most pernicious and barbarous custom at any cost. Dr. Pechy- Phipson has spoken with such earnestness and a force of conviction that almost every word of the lecture carries conviction home to every reasonable mind. We strongly recommend our readers to read-nay to study-the lecture with a *view* to see if it is not now a high time to move in the matter. We are sorry we cannot reproduce the whole lecture. Yet we cannot resist the temptation to put before our readers some of the forcible passages from the lecture. The lecturer speaks with a just air of authority derived from her peculiarly advantageous position to judge about the custom and its thousand mischievous results. We wish our people will open their eyes, and see how the custom is vitally ruining the Hindoo race, and will not fail to root out such a dirty custom. That the custom will one day become a thing of the past, it requires no prophet to foretell; but what we most desire is that sooner the custom is put down, the better it would be for our progress in every direction. Dr. Pechey Phipson says that she has observed and studied the custom with its results with a mind free from bias or prejudice. In studying the custom she brought no pre-possessions nor prejudices, but as a student of life and character and so far as concerned the making of comparisons, she was quite willing to admit and imitate traits of superiority. The lecturer very cheerfully & with a feeling of satisfaction and admiration remarks that there is much in the Hindoo family life that excites her sincere admiration, much in the devout piety which appears to her to be a strong characteristic of the Hindu mind which commands her respect, whilst the religious toleration which has, from time immemorial, been not only taught but practised by the Hindu race is an example to all the world in the very highest degree. After referring in such eulogistic terms to some of the best traits of the Hindu life and Hindu character which fact testified to the unbiassed state of her mind, the lecturer then turned to the child marriage custom, and spoke very forcibly and feelingly about its most disastrous effects to the whole Hindu race. The lecturer remarked: "But at present I am anxious to speak to you of a custom which prevails amongst you which, from the nature of my calling, has been brought prominently before me, and which so far from being worthy of imitation, is so barbarous in its immediate effect, and so disastrous to you as a race in its remoter action, that it should at once be put a stop to," This is a sufficient and a just condemnation of the custom. Our people assert that girls attain puberty in India at a much earlier age than in cold climates. But the lady doctor has a quite different tale to tell and she has reasons to support her assertion. Let us see what the lecturer remarks on this point. She says: "Judge, therefore, of my surprise to find that so far from Hindu girls being precocious in physical development they are much behind in this respect, that a Hindoo girl of fifteen is about the equal of an English child of eleven instead of the reverse." Thus the climatic influence doctrine is exploded. In speaking about the disadvantages of marriage before maturity, the lecturer remarks (1) that it is in this country one of the chief causes of sterility rather painfully unwelcome idea to the Hindu mind that longs for progeny—(2) that in those cases where the young wife bears children they are puny and sickly, (3) that the evil increases as time goes on in each of such families, and (4) that it leads to slow but sure degeneration of the race. The lecturer very truly observes that thousnnds of still-born children, hecatombs of dead infants, an ever increasing number of sickly disfigured, and deformed people bear witness to the results of this pernicious custom of child marriage. How strongly yet how truly the lady doctor takes the Hindu gentlemen to task with the following remarks: "Ah gentlemen, you are very tender about the life of the beast *it is only your wives and children you sacrifice, bringing them to a painful death, or, what is worse a lingering life of misery*—a life without hope, without any of the pleasures which make life worth living, in the case of the wives without those mental resources which can make the mind rise superior to the ills of the body. Tell me any of you, has it never occurred to you when you have looked upon your young wife turned into a decrepit old woman *through your doing*, that she has a right to revile you as the author of all her affliction? Does it never dawn across your mind as you look upon the sickly boy whom you tend with so much care as the sole hope of your declining years that, instead of returning your affection, he would be justified in turning upon you and cursing you as the *author of his wretched being*? Yes he would be right. You and you alone are responsible for all this cruel misery; to you are due these young faces saddened by days and nights of lingering pain, these disfigured countenances, these misshaped limbs? Are you not ashamed to have begotten them?" Such are the disadvantages, disastrous effects, of the barbarous custom of the child marriage from the physiological point of view. Premature physical decline and consequent misery of our women and the feeble sickly & miserable life of our own children—the hope of our declining years—are the acknowledged results of this cruel custom. We see this, we admit this, and yet the custom prevails with all its might and main. We say that the custom prevails because our religion commands it. But the lecturer answers this objection "that religion concerns itself with the relations of man to God and his duties to his fellow-man, neither of which require or justify but on the contrary prohibit, any acts which are injurious to the interests of mankind." Child-marriage is not only detrimental to the physical development, but also to the mental and moral development of the race. Consequently the able lecturer has appealed in very impressive and touching terms to the Hindu audiance to put down the custom at once. Thus Mrs. Pechey Phipson appeals: "Consider carefully these things I beg of you, for of a truth I assure you that if you still persist in your present ways if you still fight against the laws of nature, your race will degenerate more and more so that not at all the support of a paternal Government can save you from decay, whilst if the cry of the pessimist should come true, and England should one day have to retire from India you will become an easy prey to the first comer, you will ever be hewers of wood and drawers of water to any robust race who are not like yourselves the children of children but the progeny of healthy adult men and women." We earnestly wish that our leaders especially leaders of orthodox views will seriously take to heart this forcible appeal and warning of Dr. Pechey Phipson and will move in abolishing the custom and thus save the Hindu race from the calamity of contuining to be hewers of wood and drawers of water to a race better in physical intellectual and moral development owing to the absence of customs like child marriage among them.

PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Transfer, of Property and Specific. Relief

Time allowed three hours

I What is *notice*. How does it enter into questions under the transfer of Property and spenfic Relief Acts. Give three examples of cases into which the question of notice enters. M. 15

II Section 44 of the specific Relief Act runs thus " The appointment of a Receiver pending a suit is a matter resting in the discretion of the court.

The 1 mode and 2 effect of his appointment and his rights 3 powers 4 duties and 5 liabilities are regulated by the Code of Civil Procedure. Write notes on (1) (2) (3) (4) and (5) explaining what the law in regard to each of them is. M.20

III Discuss " inadequacy of price "

(1) as evidence of breach of trust

(2) as a defence to specific performance. M. 15

IV What is the law in regard to the enforcement of public duties given in chapter VIII of the specific Relief Act. Is it applicable to Berar. If so what court would enforce the execution of public duties under that chapter. If not what would you do if you wanted to have a public duty enforced. M. 10

V In what respect does a suit under section 9 of the specific Relief Act differ from an ordinary suit. What is the corresponding provision of the Act in regard to movable property, contrast what you consider to be the corresponding provision with section 9 and point out the difference. M. 12

VI What is meant by " priority " marshalling " " contribution " " tacking " " foreclosure " " redemption " " equity of redemption " " usufructuary mortgage" " English mortgage " and mortgage by conditional sale. M. 16

VII In what ways is a lease of immoveable property determind. M. 12

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करणें करितां घेण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६० चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें कि. क्लास नंबर १९ मि. २. सन १८९०

विद्यमान स्पे. अ. कमिशनर साहेब जिल्हा अकोलें यांचे कोर्टांत.

नांव—धनाजी. व सिवराम

बापाचे नाव—पुंजाजी.

राहणार मुंडगांव तालुके अकोट जिल्हा अकोला यांस मयत पुंजाजी बापाचेनांव—राहणार मुंडगांव तालुके अकोट जिल्हा अकोले यांचें कर्ज वसूल करितां घेण्यासाठीं सरटिफिकीट मिळावे ह्मणून सदर्हू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हु मयत मनुष्यांचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहीरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ३१ माहे अक्टोबर सन १८९० इ० रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीखें १९ माहे अक्टोबर सन १८९० इ.

Maniksha Rattanji

सी० नज्ज.

जाहिरात.

सर्वत्र लोकांस व उकरडा माळी पाटील गोधणापुर यास भगवान वल्लद गडबड धोबी राहणार मांडके तालुके मलकापूर यांन कडून अमे जाहिर केले जातें कीं माझा भाऊ नामे रघु वल्लद गडबड धोबी हा बावरा होऊन आज चार महिने जाहले रघु हा बावरा होऊन कोणा पासून कर्ज काढील अगर काहींतरी आमच्या स्थावर जंगम इस्टेटी पैकीं लिहून देईल तर त्याज बद्दल आम्ही जबाबदार नाहीं त्यास कोणी कर्ज वगैरे कांहीं देऊं नये तो खुळा आहे. म्हणून जाहिर केलें आहे. हें सर्वत्र लोकास कळावें. तारिख १८ माहे अक्टोबर सन १८९० इ०

सही--सहीची निशाणी भगवान वल्लद गडबड धोबी याच्या हातची असे.

वऱ्हाड.

कर्नल लेन सा. येत्या ता० २९ चे सुमारास रजेवरून परत येऊन आपले कामावर रुजू होतील व मि० राईट सा० इलिचपुरास डि० सु० पोलिसचें कामावर जातील.

मि० म्याग्रिल सा० कांहीं दिवसांचें रजेवर जाणार आहेत.

मे० कर्नल मेकंझी सा० १ ले नोव्हेंबर पासून रजेवर जाणार असें कळतें.

रा. रा. केशव ब्रह्मगिरी पाळेकर डे० ए० इन्स्पेक्टर इलिचपुर यांनीं आणखी ८ महिन्यांची रजा घेतली असें कळतें.

मे० सेशन जज्ज साहेब यांची स्वारी सेशन साठीं वाशिमास गेली आहे कारण त्या जिल्ह्याचेच चार मुकद्दमे या महिन्यांत आहेत.

वर्तमानसार.

पाऱ्याच्या खाणी—युनायटेडस्टेटस्, स्पेन, आस्ट्रिया व इटली या चार देशांत पाऱ्याच्या खाणी आहेत. सन १८८० ते १८८९ या दहा वर्षांत या चारही देशांतील एकंदर खाणी पासून १०९३६११ फ्लास्क पारा उत्पन्न झाला असें व्यापारी माहिती वरून कळतें.

अमिराकडून अटी—अफगाणिस्थाना संबंधानें लंडनटाईम्स पत्रांत तीन निबंध प्रसिद्ध झाले आहेत. ते इंडिया आफिसांतील फॉरीन खात्याच्या पूर्ण माहीत गारानें लिहिले असावे असा शहाण्या लोकांचा अदमास आहे. त्यांत अमिरा कडून पुढील अटी ठरवून घ्याव्या असें निबंध लेखकानें दर्शित केलें आहे त्या अटी येणें प्रमाणें "अफगाणिस्थानांत दक्षिण व उत्तर भागांत तार व पोस्ट आफिसें स्थापन करावी, त्यांचा हिंदुस्थानांतील तार पोस्ट खात्याशी संबंध जोडावा, कंदाहार पर्यंत आगगाडी नेऊं द्यावी, हिंदुस्थान सरकारशीं व्यापारीव मित्रत्वाचा लेखी तह करावा नानाविध विषयांसंबंधी माहिती घेण्या करिता अफगाण हद्दींत इंग्रज आफिसर जातील त्यांस पूर्ण मोकळीक द्यावी" अटी अमिरानें कबूल केल्यास त्यास जेमणूक वाढवून द्यावी असें त्यांनीं त्यांत दाखविलें आहे.

नवें तरम-सातार जिल्ह्यांतील माण तालुक्यांतील ७२ गांवांस, व खटा तालुक्यातील ५९ गांवांस सन १८९०।९१ ह्या रेव्हिन्यू साला पासून सन १९१९।२० ह्या रेव्हिन्यू साल अखेर ३० वर्षे ठरलेलें नवें तरम कायम केलें आहे असें तारीख २ अक्टोबर १८९० च्या सरकारी गॅझिटात प्रसिद्ध झालें आहे. हे नवें तरम कांठें सवापट कांठें दिडपट असें झालें आहे. या वरून सुधारणेनें होणारा सगळा नफा सरकारच मटकाऊन बसणार असें म्हटल्या शिवाय उपाय नाहीं. शु० सू०

येथील कालेज आफ सायन्समध्यें (पुण्याच्या) शेतकीचा जो वर्ग आहे त्या वर्गांतील पसार झालेल्या विद्यार्थ्यांनीं नामदार गव्हरनर साहेबांकडे एक अर्ज केला आहे व त्यांत रेवहिन्यु खात्याच्या संबंधानें लोअर व हायर स्ट्यांडर्डच्या परीक्षांचे नियम ग्राज्युएट लोकां प्रमाणें आपणास लागू करावे, शेतेकाच्या परीक्षा पास होणारास जागा देण्याविषयीं जे नियम आहेत ते चांगल्या रीतीनें पाळले जावे असें कलेक्टर लोकांस हुकुम सरकारानें द्यावे अशा दोन मागण्या केल्या आहेत शेतकीच्या क्लासांत दोन वर्षे घालवून परीक्षा पसार होणारे लोकांस केवळ बि ग्राजुएटांच्या पंक्तींत सरकारानें बसवूं नये अशा अर्थाची मागणी या अर्जांत मुख्य आहे.

भोकणारी वाळू-हवें इपन नांवाचा एक बेटाचा समुह आहे त्यांतील क्यानै आणि न्यूहौ नांवाच्या बेटांत वाळू आहे ती तुडवून गेले असतां त्यापासून मोठा अवाज ऐकूयेतो.

विद्वत्परिषद—पूढल्या वर्षी लंडन शहरांत निरनिराळ्या २३ राष्ट्रांतील ३।४ शें विद्वान लोकांचें एक कान्फरन्स भरणार आहे. न्या सि.

पुण्यास शिकारी कुत्र्यांची १३ जोडपा मि. अली अबदुल नावाच्या एका मनुष्यानें १६२५ रुपयांस विकत घेतलीं आहेत. हीं जोडपीं हैदराबादच्या कित्येक शिकारी लोकांस पाहिजे म्हणून मि. अली साहेबानीं घेतल्या असें म्हणतात.

मेसर्स ओब्रायन व डिलन हे. त्यांच्या वरील खटल्याचा निकाल झाला नसतां अमेरिकेंत निघून गेले असें ल. ता. १० तारेवरून समजतें.

ठिहएना येथें एका संभावित कुटुंबांतल्या दोन मुलांनीं परिक्षेंत नापास झाल्यामुळें गोळ्या घालून घेऊन आत्महत्या केल्या.

अमेरिकेंतील कोलोराडा जवळील एका दरीत एक तेथील इंन्दिअन लोकांची जात आढळली आहे. ते लोक बांध्यानें चांगले मजबूत आहेत.

हिंदुस्थान सरकारच्या इराणांतील नोकरापासून इनकम टाक्स घेण्यात येणार आहे.

जरूशलेम येथील फ्रेंच धर्मोपदेशकांस ठकीं शिपायांनीं हांकून दिलें, त्याबद्दल फ्रेंच वकीलानें तकरार केली आहे.

क्युबा बेटांत फारच दंगा उसळला आहे त्या बेटांत जिकडे तिकडे लुटारूंच्या टोळ्या फिरत आहेत आगगाड्या बंद पडल्या व पुष्कळ खून पडत आहे असें समजतें.

असें ह्मणतात कीं हिंदुस्थान सरकार हे मध्यप्रांतातील अमृत बझार विरूद्ध प्रसिद्ध झालेल्या सर्क्युलरा संबंधी चौकशी करीत आहे.

चांगल्या मानण्याजोग्या गोष्टी तीन—धैर्य सभ्यपणा व प्रीति. आश्चर्य करण्याजोग्या गोष्टी तीन— बुद्धि मान्यता व शोभा. द्वेश करण्याजोग्या गोष्टी तीन — क्रूरपणा, गर्वानें अलेली मस्ती व कृतघ्नता!

गंजमध्यें दुष्काळाची फार भीति पडली आहे. सु. प०

दिल्ली कलका रेल्वे येत्या जानेवारींत खात्रीनें सुरु होईल असें ह्मणतात.

विलायतेहून आलेला व कलकत्यास जाणारी डाक मुंबईहून सुटणाऱ्या मेलच्या मागून आल्यास ती पोंचविण्यासाठीं नेहमीं एक स्पेशल ट्रेन काढण्याचा पोष्ट खात्याचा विचार आहे असें ह्मणतात.

मुंबईचे माजी गव्हर्नर लार्ड रे यांचा पुतळा मुंबईस तयार करण्यासाठीं विलायतेहून एक कारागीर मुंबईस येण्यासाठीं तिकडून निघाला आहे.

मि. प्राईस वीडन यांस मुंबईचे शेरीफ नेमले आहेत.

ता० ३० सपटंबर १८९० पर्यंत हिंदुस्थानच्या खजिन्यांत ११,४२,४४,००० रुपये शिल्लक होती.

काश्मीरांत रेल्वे संबंधानें रस्त्याची पहाणी सुरू आहे.

सर चार्लस इलियट हे सरहद्दी कडील मोठमोठाले बोगद पहाण्यासाठीं निघाले आहेत.

बालविवाह व असंमत वैधव्य या संबंधानें आमच्या इकडे बरीच ओरड चालूं आहे तसेंच ती ओरड एकानें पुरी न झाल्यामुळें दुसरें हीं एक बाळ उत्पन्न झालें आहे! या दोन्ही गोष्टी बद्दल आमचे कित्येक सुधारक कायदा मागत आहेत पण त्यांचे ते निर्लज्यतेचे मागणें सरकार कबूल करीत नाहीं हे एक त्या सुधारकांचे भाग्यच समजले पाहिजे! याच विषयावर विलायतचे प्रसिद्ध सर डब्यू. डब्यू. हटर यांनी एक लेख लिहिला असून तो वाचण्याचा आह्मी उतावळ्या सुधारकांस आग्रह करतों. यांनी या लेखांत ही चाल कशी प्रचारांत आली, त्यावेळी वस्तुस्थिती कशी होती, वगैरे सुरेख व ओळानें वर्णन केलें असून त्यांतच त ह्मणतात कीं सती व बालवध जसा कायद्यानें बंद करण्यांत आला तसेंच या गोष्टी कायद्यानें बंद करणें ह्मणजे मोठा मूर्खपणा आह हंटर शेवटीं म्हणतात कीं, या विषयासंबंधानें हिंदुस्थानांतील समंजस लोक शांतपणानें व सावकाश विचार करीत आहेत. पूर्वीच्या परतंत्रतेचें सुख कायम ठेऊन नवीन स्वतंत्रतेचें योग्य सुख आपल्या बायको बहिणास कसें मिळेल आणि धर्माच्या बाबतींत यत्किंचित ही हात न घालतां आणि कुटुंबाच्या चालीरीतींत किंचितही फरक न करतां हें स्थलांतर कसें करतां येईल या धोरणावर त्यांचा विचार चालूं आहे. सर हंटर साहेबांचें हें शेवटचे वाक्य आमच्या अजागळ व मुर्ख सुधारकांनीं स्मरणींत ठेऊन दररोज त्याचा जप करावा असें आमचें त्यांस सांगणें आहे.

किनाऱ्यावर व्यापार करण्याकरितां झांझिबारच्या सुलतानानें जर्मनीस ४० लाख मार्क (नाणें) घेऊन, परवानगी देण्याचे कबूल केलें आहे.

यंदा अमेरिकेंत कापसाचे पीक चांगलें येईल असें म्हणतात.

तेहरानचा लष्करी अधिकारी जनरल गार्डन लवकरच हिंदुस्थानांत येणार आहे. कां?

अमेरिकेकडे लोखंडी व जस्ती सामान अती झपाट्यानें तयार करण्यांत येत आहे. याचें कारण असें सांगतात कीं, नवीन टारिफ अक्ट होणार असल्यामुळें त्याचा फायदा मिळावा.

पंजाबच्या १ ल्या पायदळ पलटणींत आफ्रिडीस लोकांची एक नवी कंपनी नुकताच सामील करण्यांत आली. हे लोक चांगले लढवय्ये आहेत असें म्हणतात.

हिंदुस्थानांतील राहिवाशास नेटीव ह्मणावें किंवा नाहीं अशाबद्दल कांहीं दिवसांपूर्वी वाद सुरू होता. त्यावेळीं कित्येक या लोकांस 'इंडियन्स' असें म्हणावें असें सुचवीत होतें. लाहोरच्या ट्रिब्यून पत्रानें या संबंधानें लेख लिहिला असून त्यांत तो म्हणतो कीं, या लोकांस 'नेटीव' न म्हणतां "मूळचे रहिवाशी" म्हणावें. नामकरणाबद्दल इतका वाद कशाला? नाव सोनूबाई आणि हाती कथलाचा वाळा त्यांतली स्थिती झाली आहे! ठा० अ०

नोटीस.

चिरंजीव विश्वनाथ वल्लद रतनसा रंगारी वस्ती पातुर्डे यांस—

आशिरवाद विशेष नोटीस देण्यांत येतें कीं मी काशी यात्रेस जातांना तुह्मास कुलमुखत्यारी देऊन गेलो होतो त्यावेळची तुमची वर्तणुक चांगली होती. हल्ली तुह्मी लोकांचें कर्ज काढिलें असून काय करितां हें मला कळत नाहीं, व वाईट नांदसलागला. तुम्ही मला व माझ इतर मुलास बुडवूं पाहात आहां करितां तुमचें मुखत्यारपत्र आजपासून रद्द केलें आहे. व जें कर्ज तुम्ही केलें आहे त्या जबाबदार नाहीं. कळावें तारीख १ आक्टोबर सन १८९० इ०

(सही)

रतनसा सोनसा रंगारी पातुर्डे दस्तुरखुद्द

नोटिशीचें उत्तर.

बाको मर्द कान्हु तेली जामोदकर हल्लीं वस्ती मौजे सुरवाडें तालुके भुसावळ जिल्हे खानदेश इस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं तूं मजला प्रबोधचंद्रीका वर्तमानपत्रांतून जी नोटीस दिली तिचें उत्तर देण्यांत येत आहे तें.

तुझें ह्मणणें कीं आपलें लग्न होऊन सरासरी १०-१२ वर्षे झालीं असून इतक्या काळांत फक्त एकदांनवेळ माझी ने आण केली मी माझे बापाचे घरी राहिल्याबद्दल दरसाल ५० रुपये प्रमाणें पांचवर्षांचें २५० रुपये अन्नवस्त्राबद्दल सावकाराचे कर्ज मी घेतलेलें तुह्मी १० दिवसाचें आंत आणून देऊन सावकाराची पावती घेऊन मजला आपले घरी नांदविण्यास घेऊन जावें मी येण्यास राजी आहे. वगैरे मजकुरची तूं नोटीस दिली त्याचें उत्तर खालीं लिहिले प्रमाणें:—

तूं आपले बापाचे घरी पांच वर्षांपासून मुळींच नाहींस एक वर्षापासून तुझें बापानें जबरीनें माझें घरून नेले त्यादिवसापासून आहेस. तुझें उदर निर्वाहास मुळींच कोणाचें कर्ज घेण्याची गरज नाहीं कारण तूं दररोज मजुरीनें आपले उदर निर्वाहापुरते पैसे मिळवात आहेस. या एक वर्षांत निदान मी तुला घेऊन जाण्याकरितां ४-५ वेळा आलो होतो हे वडनेर येथील चार पंचास माहीत आहे. शेवटीं सरासरी १ महिन्याचे पूर्वी नेण्यास आलो असतां तुझें बापानें तुला लपऊन सुरवाडे येथें पाठविलें आणि तेथून ही खोटी नोटीस देववीली. मी तुला नांदविण्याला अगदीं तयार आहे. तुला तुझें बापानें माझें घरीं आणून घालावें. असें १५ दिवसाचें आंत न झाल्यास तुझी आणि तुझें खोटें पक्षकार लोकांची मी कोर्टमार्फत योग्य व्यवस्था करून तुजला ताब्यांत घेईन आतां तुजला व तुझें बापाला या उत्तरानें असें कळविलें जातें कीं माझे डागडागिन्यासह वरील मुदतीचें आंत जामोद येथें तुला आणून घालावें. नाहींपेक्षां मजकडून जें व्हावयाचें तें होईल ह्मणून अगाऊ उत्तरानें कळविलें आहे हो नोटीस दिली सही तारीख १४ माहे आक्टोबर सन १८९० इ०

(सही)

कान्हु वल्लद खुशाल तेली राहणार जामोद तालुके जळगांव

निशाणी खुद्द हातची

अकोलें बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनीं			१००।
" १५ दिवसाच्या मुदतीची			१००८=
सुवर्ण....	२०	रुपें	१०८
आळशी खंडीस	८४॥	उडीद	६५
गहूं काठे	६०	बनशी	६५॥
जवारी	४०	चणे	६५
सर्की	४८=	मीठ	४८≡
तूप	९॥	तेल	४॥।=

सध्याचे भाव

जवारी	वसंत संवत	१९४७	४३८≡
गहू	वैशाखशुद्ध	१९४७	५८
आळशी	चैत्रशुद्ध	१९४७	७९॥।=
रुई	फाल्गुन शु.	१९४७	५७॥।=
सर्की	व. नवे सालाची	१९४७	३॥।-॥

☞ हें पत्र अकोला येथें कै० कृष्णराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

वर्षाची अगाऊ रु० ५ डांक हाशील ०१३
सहामाही ३ " " ०८
सालअखेर " ७ " १०८
किरकोळ अंकास.....०४

per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as
Six monthly.....3 " 8 as
Single copy.....4as

नोटीशीचद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरें खेपेस ०१

वऱ्हाडसमाचार.

Advertisemehts
Below 10 lines...2Rs
Per line over10...4 as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIV | AKOLA MONDAY OCTOBER 27 1890 | NO 42

वर्ष २४ | अकोला सोमवार तारीख २७ माहे आक्टोबर सन १८९० इ० | अंक ४२

सचित्रक्याटलाग

आर. डी. कानिटकर आणि कंपनी मुंबई गिरगांव यांचा नवीन तऱ्हेचा इंग्रजी किंवा मराठी अर्ध्या आण्याचें तिकिट पाठविल्यास मिळेल.

NOTICE.

Auction Sale of Valuable Landed Property at Hyderabad Deccan Sorabjee Nowrojee Govt: Auctioneer will sell by public Auction to the highest bidder without reserve on the 24,' 25,' 27,' 28,' 29 ' and 30 ' October 1890 at 3 P. M. each day. The sale will take place on the respective premises Chudderghaut " by virtue of a decree in suit No. 59 of 1886 of the Supdi Residency Bazaars Court.

The Right Title and interest of Hormusji Bapuji Vicaji, Manckoba Bapuji Vicaji, Nowroji B. Vicaji, Awabai (lately deceased) widow of Pursetji Bapuji Vicaji (also deceased) and Vicaji Mehrjeebhai Bapujee Vicaji

For further particulars concerning the Property please apply to the undersigned.

Sorabjee Nowrojee
Govt: Auctioneer
Secunderabad Deccan

जाहिरात.

संस्थान सोंडुर जिल्हा बल्लारी इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचे महास्थान आहे. तेथें येत्या कार्तिक महिन्यांत शुद्ध पाणिमेस महायात्रा भरणार आहे तर यात्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्ष लोकांच्या सोईकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें तिकीटाचे दर ठेविले आहेत

	रुपये
पंचामृताभिषेक	२५
सर्वांगभिषेक	१५
पादाभिषेक	१०
पादस्पर्श	५
दर्शनटिकीट	२
बारावर्षाचे आंतील मुलास दर्शनटिकिट	१

कार्तिक शुद्ध १३ पासून ते कार्तिक शुद्ध १५ पावेतों श्री कार्तिक स्वामीचे डोंगरावर टिकीटे विकत मिळतील. ब्राह्मणा वाचून इतर लोकांना अभिषेक पादस्पर्श वगैरे ब्राह्मण द्वारा करवावे. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९० इसवी.

सही

सही भीमराव पोळ स्थानेनर
श्रीकार्तिक स्वामी देवस्थान संवस्थान
सोंडुर.
जिल्हा बल्लारी.

वामन गोपाळ यांचा अनेक औषधें मिश्रित

सार्सापरिला

हा सार्सापरिला अनेक रोगांवर गुणावह असून खालीं लिहिलेल्या रोगावर विशेष गुणाकारी आहे उपदंशजन्य विकार, (गरमी) व जिपासून होणारे पक्षवातादि भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दुषित झाल्यापासून हाता पायांच्या तळव्यांवर व सर्व शरिरावर काळे डाग पडणें. संधी दुखणें कळा लागणें, सूज येणें वगैरे सर्व संधिगत वायुवर तसेंच कोणत्याही प्रकारचे त्वचेचे रोग, जसें सर्व शरीरास कंड सुटणें, खरूज, गळवें व फोड येणें, इत्यादि; डोळ्यांची, मस्तकाची व हातापायांची आग होणें, तसेंच रसायनें व कच्चा पारा सेवन करून होणारे वाईट परिणाम वगैरे सारांश उपदंशजन्या पासून अगर दुसरे कोणत्याही कारणानें रक्त दूषित झाले असल्यास ते शुद्ध होऊन त्याची वृद्धि होण्यास ह्या सारखे दुसरे औषधच नाहीं. दर बाटलीस किंमत १। रुपया, पोस्टेज ४ आणे; उत्तम गुणास चार बाटल्या पाहिजेत. एकदम बारा बाटल्या घेतल्यास १२ रुपये. पोस्टेज शिवाय. परंतु चार बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

पौष्टिक व अत्यंत कामोत्तेजक धातु व रक्तवर्धक मिश्र फास्फरसाच्या

गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षिणता जाऊन अशक्तता, अग्नीमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार ताबडतोब नाहींसे होतात. ह्यानें सर्व शरिरांतील चैतन्याचा व वृद्धि व स्मरणशक्तीचा राजा जो मज्जाकंद (मेंदू) व मज्जातंतु यांच्या मंद झालेल्या सर्व क्रियांचे पुनःरुज्जीवन होते. शिवाय ह्या गोळ्या कामोद्दीपक व स्नायुची शक्ति वाढविणाऱ्या असल्यामुळें कोणत्याही कारणानें जननेंद्रियाची शक्ति क्षीण झाली असल्यास पूर्ववत होते. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्याचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्ट मिळून एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ आणे पडतील.

पांढरेकेस काळेभोर होण्याचा

कलप

हा कलप प्रत्येक पंधरादिवसांनीं एक वेळ लाविला ह्मणजे पुरें आहे. यानें सफेद करड्या व पिंगट रंगाचे केस काळेभोर होऊन त्यांस तेजी येते. किंमत १ रुपया पोस्टेज ४ आणे.

वरील सर्व औषधांच्या विशेष माहितीचा कागद प्रत्येक औषधासोबत मिळेल. पुण्याच्या लोकांकरितां डा. एन. व्ही. छत्रे यांचे दवाखान्यात वरील सर्व औषधें मिळतील.

आमचा पत्ता— नव्या ठाकुरद्वारासमोर गौतमराव केशव, मुंबई.

नमुना नंबर १४३.

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हा कोर्टास अर्ज केल्याविषयीं जाहिरात.

सन १८६० चा आक्ट २७ कलम ३ प्रमाणें.

कि क्लास नंबर १५ मि. नं. ६ सन १८९०

स्पे० अ० कमिशनर साहेब जिल्हा अकोला. यांचे कोर्टांत.

नांव महादु. बापाचें नांव गोपाळा. कासार राहणार गायेगांव तालुका बाळापूर जिल्हा अकोला यांस मयत परशराम बापाचें नांव गणाजी राहणार गायेगांव ता० बाळापूर जि० अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहु मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं तारीख ३१ माहे आक्टोबर सन १८९० इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १९ माहे आक्टोबर सन १८९० इसवी.

Maniksha Rattanji
सिव्हिल ज्यडुज्य.



मिती अश्विन शुद्ध १४ शके १८१२.

सिंहावलोकन.

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

नोकरी व शेती हे दोनच कायते उपजीवनाचे मार्ग हल्लीं आमच्या हातांत आहेत. ह्या पैकीं नोकरी फार दुर्मिळ होत चालली आहे. पुष्कळ पगाराच्या जागा परकीयांच्या स्वाधीन झाल्यानें थोड्या पगारांच्या जागांवर संतुष्ट राहण्याचें भाग झालें व द्रव्याजिनाचा मार्ग त्या बाजूनें बंद पडल्या सारखाच झाला आहे. तरी नोकरी सारखा आवडता व्यवसाय नाहींसा झाला आहे. व ह्या नोकरीचा हव्यास जर आणखी कांहींवर्षें असाच सतत चालू राहील तर उपपदधारी विद्वानांसही भालदार चोपदार व्हावें लागेल अशें एक इलाखा पतीनें केलेलें भविष्य खरें ठरेल. सोनार, शिंपी, कोष्टी, साळी इत्यादि लोकांसही दहा रुपयांचे नोकरीचे महत्व वाटून त्या लोकांनीं आपल्या धंद्यावर पाणी सोडण्याचा संकल्पच केला आहेसा दिसतो. आमच्या कारागिरांस नोकरी सारखा सर्वांत टाकाऊ पेशापसंत पडत चालला आहे ह्याची कारणें, एकतर त्या लोकांस उत्तेजन मिळण्याचे मार्ग कमी झाले. कला कुशलतेंत प्रविण व यांत्रीक साधनांच्या भरपूर पुरवण्यानें उद्योग करणाऱ्यांशीं स्पर्धा सुरू होऊन, अर्थात आमच्या तुटपुंज्या सामोग्रीसहीत ऐरण घणवाल्यांचा पाडाव होणें सहाजीक आहे रात्रंदिवस श्रमकरूनही मीठ भाकर आहे तर आहे, नाहीं तर नाहीं अशी व्यवस्था झाल्यानें त्या लोकांचे आपल्या मूळ व्यवसाया कडे दुर्लक्ष्य होत चाललें गरीब अथवा श्रीमान, लहान किंवा थोर, आणि विद्वान व अविद्वान ह्या सर्वांनीं देशाभिमानास रजा दिली असल्या मुळें आमच्या कारागीर लोकांस अकलेनें व द्रव्य बळानें पाबठळ देऊन परकी यांवर चालकरून जाण्यास तयार करण्याची इच्छा त्यांस होणार कशी! अशा रीतीनें चोहोंकडून हताश झाल्यानें गुलामगिरी पतकरण्यास तयार होणें भाग पडलें. सर्व लोक नोकरीच्या मागें असल्यामुळें वेतन कमी मिळूं लागलें व ती मिळविण्याचीं साधनें दिवसें दिवस कठीण होत चाललीं. नोकरी फक्त मासमान सुखावह वाटूं लागून पुढें उपजीवनाचें जें मुख्य साधन शेती तिकडे लोकांची नजर फिरली, द्रव्यसाधनाचें इतर मार्ग बंद व लोक संख्येचे वाढतें प्रमाण ह्या दोहोंचे शेतीची पूर्ण देना झाली आहे.

पडीत असलेली जमीन भराभर लागवडींत येऊन सर्व जमीन निःसत्व झाली आहे. वर्षाऋतु नजीक आला म्हणजे शेत नांगरावें पुढें चार पांच महिन्यांनी उगवलेलें धान्य काढून घेऊन वर्षभर कशी तरी पोटभरणी करावी; असें रहाट गाडगें सुरू आहे. ह्याचा परिणाम काय होईल इकडे कोणी लक्ष्य पोहोंचवित नाहींत. आपल्या जमिनीची काय गत होणार हें शेतकरी लोक जाणून आहेत परंतु त्यांनीं काय करावें? शेती सुधारण्याचीं साधनें पैदा करण्या जोगीं त्यांची योग्यता नाहीं. बरें! ज्यांच्या पाशीं साधनें आहेत त्यांना तिकडे लक्ष्य देण्यांत विशेष अर्थ दिसत नाहीं. व शेती सारख्या हलकट धंद्यांत वेळ घालवून मिळमिळींत वाटणाऱ्या समाज स्थितीची उलथा पालथ करण्यास वेळ सांपडणार केव्हां! मायबाप सरकारानें घर बसल्या पोट पूजेची योजना करून ठेवण्याचा मक्ता घेतलाच आहे; मग दगदग कां? अशा विचारांत आमचे पुढारी दंग असतील. परंतु आपल्या भावि प्रजेची कालक्रमणा सुखावह करून ठेवण्याचा उद्देश तडीस नेणें हितकर आहे असें समजून त्या प्रमाणें चालू व्यवहा

राम चलन देण्याच्या खटपटींत असणाऱ्यांनीं शेतां कडे लक्ष अवश्य पुरविलें पाहिजे. परकीयांचे तिकडे लक्ष गेलेंच आहे. शेतीची सर्व व्यवस्था त्यांच्या स्वाधीन झाल्यावर बरीक फारजड जाईल.

(पुढें चालेल.)

हिंदुस्थानानें ब्रिटन कडेच कां पाहावें?

इंग्लंडांतील बड्या लोकांच्या सभेंत आफ्गाणिस्थानाच्या संबंधानें कडाक्याचा वादविवाद चालला असतांना लार्ड बेकन्सफिल्ड एकदां असें म्हणालेंकीं आफगाणिस्थानची किल्ली हिंदुस्थानांत नसून लंडनमध्यें आहे; कारण कलकत्याहून हिंदुस्थान सरकारचे हुकूम सुटतात मात्र परंतु त्याची किली इंडिया आफिसांतील भिंतीच्या खिळ्याला लावलेली सांपडेल. आफगाणिस्थानसारख्या परराष्ट्रासंबंधानें या म्हणण्यांत कितीही तथ्य असो पण खुद्द हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची किलीकुलुप इंग्लंडांत असून हिंदुस्थानांत नाहीं हो गोष्ट सर्वांशीं खरी आहे. इंडियांत राज्यप्रकरणी सुधारणा जी होईल ती फक्त पार्लमेंट द्वारानेंच होईल. पार्लमेंट सभेचें द्वार बंद होतांच राज्यसुधारणेचा ही मार्गीवरोध होतो. पार्लमेंट सभेतच हिंदुस्थानवाशीं जनांस स्वदुःख परिहारार्थ दाद मागावी लागेल आणि लागली तर तेथेंच त्यांची दाद लागेल हिंदुस्थानांत आमच्या राज्यकारभारावर दाब बिलकुल नाहीं एवढेंच नव्हे तर आमचे सामोपचाराचे प्रयत्नही विफल होतात प्रत्यक्ष पार्लमेंट सभेत दुबळ आम्हांस हक्कानें दाद मागतां येत नाहीं. त्या सभेतील कांहीं उदार अंतःकरणाच्या सभासदांच्या कृपेमुळें आमची दाद कधीं कधीं लागते इंग्लिश लोकांच्या सत्कृपेवरच आमची भावी सुधारणा अवलंबून आहे. वरील कृपेचेदर्शक प्रस्तुत विलायतेस आम्हा कोट्यावधी प्रजेचीं दुःखें कळविण्या साठीं चाललेला उद्योग होय हिंदुस्थानांतील कोट्यावधी प्रजा इंग्लडांतील लक्षावधि लोकांना आपलीं दुःखें कळविण्याची इच्छा करितात आणि एतदर्थ आमच्या राष्ट्रीय प्रतिनिधींचा ही अव्याहत प्रयत्न चालू आहे. त्यांचें असें म्हणणें पडतें कीं आमचीं दुःखें कळलीं म्हणजे त्यांचें परिमार्जन इंग्लिश लोकांच्या हातून होईल.

राष्ट्रीय सभेच्या मागण्या इंग्लंडनें कां कबूल कराव्या या विषयीं कारणें आहेत तीं ही कीं राष्ट्रीय सभा ज्या पक्षा साठीं भांडत आहे तो पक्ष चांगला आहे आणि राष्ट्रीय सभेनें मनांत जे उद्देश धरले आहेत ते योग्य व उत्तम आहेत. आपलें मनोरथ सिद्धीस नेण्या करितां जें उपाय ता योजिते ते सर्व राज्य रीति व कायदा यांस अनुसरून आहेत. पहिल्या, दुसऱ्या, व तिसऱ्या राष्ट्रीय परिषदांचें अध्यक्षांनीं दोन वर्षांपूर्वी म महिन्यांत ब्रिटिशमध्यें बोलतांना या गोष्टी पूर्णपणें उघड करून सांगितल्या आहेत. त्या सभांतील विषया वरून व भाषणा वरून कांहीं कांहीं गोष्टी आबालवृद्धास स्पष्टपणें कळून आल्य व त्या बद्दल त्यांची इतकी खात्री झाली आहे कीं या उपर त्या विषयीं कोणा ही संशय घेणार नाहीं. त्यापैकीं मुख्य मुख्य खालीं नमूद केल्या प्रमाणें:—

(१) ज्या मागण्या ह्मणून मागितल्या आहेत त्या लोक स्थित्यनुरूप, लोकांच्या बुद्धीनुरूप, व कायद्याला अनुसरून असणाऱ्या लाकवतनानुरूप आहेत.

(२) सर्व नेटीव लोक व विशेषतः त्यांचे पुढारी हे मनोभावें करून अंतःकरण पूर्वक इंग्रज सरकारशीं राजनिष्ट आहेत आणि सर्वांची अशी खात्री झाली आहे कीं राष्ट्रीय सभेच्या मागण्या इंडियाला दिल्या असतां परराष्ट्रा बरोबर झुंजण्यांस इंग्रज सरकारचें बळ कमी न होतां पुष्कळ वाढेल आणि सार्वजनीक सुखांत ही मोठी भर पडेल.

(३) हिंदुस्थानची राज्य स्थिती सुधारक आपली कार्यसिद्धी होण्यासाठीं या गोष्टी विषयीं खबरदारी घेतात कीं इंग्लिश लोक व नेटिव लोक या उभयतांचा एकोपा होऊन इंग्रज लोकांच्या कळवळ्यानें व सदिच्छेनेंच आपला कार्यभाग साधावा.

नेटिव लोकांची मुख्य इच्छा ही कीं इंग्रज लोका बरोबरच आपली गणना व्हावी ही त्याची इच्छा सफळ न होण्या सारखी आहे कीं काय? इंग्लंडकडील कांहीं थोर थोर मुत्सद्यांनीं व वजनदार वर्तमानपत्रकारांनीं या प्रश्नाचा जबाब उत्तम तऱ्हेनें दिलेला आहे. 'न्याशनल लिबरल फेडिरेशन' नामक सभेनें राष्ट्रीय सभेच्या उद्योगाला पूर्ण साह्य देण्याचें पत्करलें आहे. वरील मंडळीच्या सेक्रेटरीकडून गेल्या अक्टोबरांत एकपत्र अशा आशयाचें आलें आहे कीं लिबरल पक्षाची मंडळी कांग्रेसला अनुकूल आहेत आणि फेडिरेशन मधील गृहस्थ कांग्रेसच्या कामासाठीं झटण्यास तयार आहेत. या लेखानें राष्ट्रीयसभेच्या पुरस्कर्त्यांस समाधान वाटलें आणि उत्तेजनही आलें तरी त्यांचें ह्मणणें असें आहे कीं राष्ट्रीय सभा एकपक्षीय नाहीं त्या अर्थी कान्सरव्हेटीव मंडळीकडून मदत मिळणें साहजिक व अवश्यक आहे. इंडियांतील राजकीय सुधारणा ही तिकडील राजकीय पक्षद्वयांचा वादग्रस्त विषय व्हावा अशी आमची मुळींच इच्छा नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांच्या उन्नत्यर्थ व ग्रेटब्रिटनच्या लोकांशीं प्रेमभाव वृद्धिंगत होण्याकरितां प्रस्तुतची चळवळ ही पार्लमेंट मधील भिन्नभिन्न पक्षांचा खेळ अथवा राज्यवारस्थानांतील क्रिडाविषयक पदार्थ होऊं नये ह्मणून आम्ही मनापासून काळजी वहात आहों.

राष्ट्रीय सभेसंबंधानें जी आज तहत पांच वर्षें चळवळ चालू आहे तिच्यांत अद्याप पावेतों एकही जुलमाचें कृत्य, राजद्रोहाचा एक ही शब्द, इंग्रज सरकार विरुद्ध कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन इत्यादि गोष्टी मुळींच घडल्या नाहींत हे अगोदर लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे. राज्यकारभारांत सुधारणा होण्याविषयीं पुष्कळ लोक अहर्निश झटत आहेत त्यांत कित्येक फार उतावीळ आहेत व कित्येक फार धिमे आहेत तरी त्या दोहोंचेही वर्तन मर्यादशील असून सामोपचाराचें आहे. आयरिश लोकांची राज्यास्थती न सुधारण्याचें कारण ह्मणून असें कांहींजण प्रतिपादितात कीं आयर्लंडसंबंधानें इंग्लंडचें वर्तन अन्यायाचें आहे खरें तरी त्या अन्यायाच्या प्रतिकारा साठीं ते लोक दांडगाई करितात हा त्यांचा दोष होय. असला प्रकार आमच्या हातून हा काळपर्यंत घडला नाहीं हें नव्यानें सांगणें नको. आयरिश लोकांविषयीं वरील विचार ज्यांच्या डोक्यांत घोळत आहेत असे अधिकारी व दुसरे अन्यगृहस्थ हिंदुस्थानांतील चळवळीचा कितीवारकाईनें विचार करितात ही गोष्ट ध्यानांत आणिली असतां आमच्या ह्मणण्याची सत्यता दिसून येईल.

रखमाबाईनें विलायतेतील वर्तमानपत्रांत दिलेला मजकूर.

(मागील अंकावरून पुढें चालूं.)

लहानपणीं लग्न करण्याचे चाली पासून हिंदुस्त्रीयांवर तर फारच वाईट परिणाम होतो ह्मणजे पुरुषांपेक्षां त्यांचीं वाईट स्थिति होते. या चालीपासून किती वाईट परिणाम होतो हें सांगतां येत नाहीं हिंदुस्थानांतील बायकांची निकृष्ट अवस्था होण्यास हेंच कारण होय. या चालीमुळें पुरुषाचें नुकसान एकपट होत असेल तर दहा हाजर पट बायकांचे नुकसान होतें बायकांची स्थिती त्यामुळें इतकी वाईट झाली आहे कीं त्यांची गणना माणसांत नाहीं. खरोखर पुरुषांच्या दृष्टीनें जसें एखादें पाळीव जनावर घरांत असेंत त्याचप्रमाणें बायका आहेत. मुलगी जन्मास आली कीं कोणास आवडत नाहीं बापदांत ओंठ चावतो व पाय आदळतो आईची नाउमेद होते व आईची प्रीती जरी कमी होत नाहीं तरी आपणास मुलगी झाली नसती; तर बरें असें तिला वाटतें. आणि त्यांत अशी समजूत आहे कीं ज्या बायकांस मुलीच होतात त्यांचें पुण्य कमी व यामुळें त्या फारच खंती धरतात. मुलगी जसजशी वाढत जाते तसतशी तिचे आईची काळजी ही वाढते.

मुलीचें लग्न बहुधा आठ वर्षाची असतांना होतें. तिच्या दृष्टीसमोर सासुरवास काय असतो हें तिला थोडेसे ठाउकच असतें व ह्मणून ती सासुकडे जायला भिते. सासूचें नांव काढलें कीं कधीं कधीं पोरीनां ताप येतो. आणि कसें तरी करून सासुकडे न जाण्याचा प्रयत्न करितात. तिला सासूघरीं काय सुखदुःख असतें याची पक्की कल्पना असते. तेथें तिला खेळणें नाहीं, गमत नाहीं, धड सुखाचे शब्द ही नाहींत. कोणी हासून बोलावयाचें नाहीं, अन्न पुरें खायला मिळायचें नाहीं व निजायला सुद्धां धड जागा नाहीं. नेहेमी सासु तिच्यापुढें असेंतच; नेहेमीं रागावलेली मुद्रा तिची व नेहेमी कांहीं तरी गुन्हा सुनेचा काढत बसलेली असेंतच गुन्हा झाला ह्मणजे त्याबद्दल शिक्षा असेंतच कधीं थोबाडींत कधीं डाग कधीं उपासमार कधींकधीं मरेमरेतो मार. दीर नणदा जवळच असतात व कांहीं तरी खोट्यानाट्या गोष्टी सांगून सासूच्या मनांत भरवितच असतात सकाळपासून संध्याकाळपर्यंत कबाडकष्ट करायचे व त्यांचे बक्षीस ह्मणजे शिव्या तिला घरांतल्या किंवा बाहेरच्या माणसांशीं बोलण्याची देखील चोरी. असें तिचे जीणें असेंत. मग लहान पोरीना तें भयंकर वाटेल यांत नवल तें काय. पण करावयाचें काय तें तिला सोसलेंच पाहिजे. सासू मला असा सासुरवास करते ह्मणून आईला सांगून सुख मानायचें सवी सापडली ह्मणजे आईजवळ गाऱ्हाणीं सांगावीं व रडावें कीं आईतरी कांहीं तजवीज करील. पण ती काय करणार बिच्चारी तिच्या हातांत काय आहे. आई तिलासांगतें. "माई तूं बायको जन्मास आलीस यांत तुझा ही दोष नाहीं व माझाही नाहीं. पण देवाचे मनांत तुला बायकोचें जन्मास घालायचें होतें ह्मणून घातलें मग आतां दुसऱ्यांची गत ती तुझी कांहीं दिवसानीं तुझा नवरा कदाचित तुझ्यावर प्रीती करील व तुला नीट वागवील मग तुं" हे सारे दुःख विसरशील गरीब बिचारा पोरगी काय करते आईनें सांगितलें म्हणजे ऐकून घेते व पुढें सोन्याचा दिवस येईल ह्मणून वाट पाहात बसते तिला वाटतें कीं आईची गत तरी अशीच असेल तेव्हा ती सांगते तेंच खरें. असें होता होतां एकदांची ती सोन्याची वेळ येते व नवरा बायकोच्या गाठी पडतात. मग ती आपल्या कडून नवऱ्याची मरजी राखण्याला झटते जर त्याची प्रीति तिच्यावर जडली तर तिच्या आईनें सांगितलेली गोष्ट फळास येते. नवरा पैसे मिळवूं लागेल व मग तरी आपणास सासूचा त्रास चुकेल असें तिला वाटत असतें व नवराही तेंच सांगतो पण केवळ आईचे ऐकून बायकोच्या वागविणारे नवरे कांहीं थोडे नसतात नवऱ्याचे दृष्टीनें बायकोंत सांपडणारे पुष्कळ असतात कदाचित बायको चांगली सुरेख नसते कदाचित चांगल्या घराण्यांतली नसते किंवा हुंडा चांगला तिच्या बापानें दिला नसेल किंवा हुषार नसेल किंवा सांगितलेलें ऐकत नसेल व दिवसानुदिवस तिचे अपराध वाढतच जातात व शेवटीं तिला टाकून देण्याचा विचार होतो असें झालें ह्मणजे संकट येतें.

पृथ्वीचे पाठीवर तिला वाली कोणी नाहीं काय! तिचें आईबाप तिला मदत करणार नाहींत काय. पोटचा गोळा पण त्याला काय करायचे मुलगी त्याजकडे जरी गेली तरी लोक हांसतील ह्मणून तिला घरांत ठेवीत नाहींत. जरी तिजवर ममता असते तरी फक्त गोड शब्द मात्र बोलतात. आईला अतिशय दुःख होतें. व बापालाही दुःख होतें. ते ह्मणतात "आईबाप जन्म देतात पण नशीब घालीत नाहींत. ज्याचे नशीब त्याचे बरोबर पूर्वीच्या जन्मी कांहीं पाप केलें असशील म्हणून या जन्मी भोगते आहेस. भोग भोगला पाहिजे ह्मणजे पुढल्या जन्मी तरी सुख भोगतील. आम्ही चांगलें स्थळ पाहून तुला दिली आतां लग्न झाल्यावर नवऱ्याचें घर ते तुझें तेथें जिवंत राहा किंवा मर. घोर घर ह्मणजे सगळें बरें होईल.

एकून नवऱ्याचे घरीं राहाणें व मरणें हेंच बायकांचें जिण्याचें सार्थक ना! वर्षेवी वर्षे नवऱ्याचे घरीं काढलीं पण मरणतर आलें नाहीं जिवंत राहण्याचा तर पक्का कंटाळा आला. मग अशा स्थितीत एकदांचा परिणाम कां लागेना असें तिला वाटतें मग उपाय जवळच असतो जवळच्या विहिरीत नाहींतर तलावांत जाऊन जिव देते किंवा अफु खावून मरून जाते या प्रमाणे दुःखाचा कळस होतो.

बरेंतर बरें हिंदुस्त्रियांची सगळ्यांची अशी स्थितीत नसती ह्मणून बरें ज्या बायका असल्या स्थितींत असतील त्यांचे कसें काय आहे तें पाहूं या दुष्ट चाली मुळें १४ वर्षाच्या वयांत कित्येक बायका आया होतात मग दहापंधरा दुबळी पोरें होतात आणि त्यांतली नि-

मी मरतात आईला मात्र व्यर्थ भार वाहव्याचे कष्ट अशा सपाट्यांत बायकाची तबेत कशी निट राहाते हेंच आश्चर्य आहे वर सांगितलेंच आहे कीं मुलाचें लग्न लवकर झाल्यानें पुरुषांची शारिरीक व मानसिक स्थीति बिघडुन जाते परंतु बायकांची स्थिती ही त्याचप्रमाणें होतें. म्हणजे त्यांचें सर्व तऱ्हेचें शिक्षण बंद होते. व म्हणुनच हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षण देणें तें ही चाल मोडल्याशिवाय अशक्य होय.

आतां ज्या दुष्ट चालीनें हिंदुलोकांचे नुकसान झालें आहे ती नाहींशी कशी कराची याचा विचार करूं. आपल्याला ही गोष्ट लक्ष्यांत बाळगिली पाहिजे कीं ही दुष्ट चाल पुष्कळ दिवस एकसारखी चालत असल्यामुळें लोकांचे मनाची स्थिती अशी होऊन गेली आहे कीं सर्वांचें मनांत एकदम येऊन ही चाल एकदम मोडली जाईल अशी लोकांत उमेद नाहीं. पाश्चिमात्य शिक्षणानें कित्येक लोकांची तयारी अशी झाली आहे कीं याकामाकरितां आपलें नुकसान झालें तरी बेहत्तर पण असलीं माणसें म्हणजे समुद्रांत एकथेंब. पुष्कळ लोक अज्ञान असल्यामुळें या अडचणी कशा निवारल्यांत याची हिंमत त्यांनमध्यें बिलकुल नाहीं. त्यांना आपल्या समजुतीप्रमाणें वर्तन ठेवण्याची किंवा स्वदेशासाठीं नुकसान करून घेण्याची सवय लागलेली नाहीं असें जरी आहे तरी होईल तितकी मदत त्यास देणें हें आपलें कर्तव्य आहे.

(पुढें चालूं.)

The Berar Samachar

MONDAY, OCTOBER 27, 1890

AGRICULTURAL CONFERENCE.

The above conference closed its sittings on the 14th, instant. The Conference passed a resolution of introducing a system of instruction to the agricultural population of the country. India is an agricultural country and if the necessary precautionary measures are not adopted and brought into force her population will suffer and there will be ruin brought upon the country. There are many grain producing countries and consequently many competitors in the field to fight with India for a share in the profits of the grain market. It is the bounden duty of our government to take as much care of the agricultural interests of the country as it is possible for them to do. Enormous has been expenditure incurred in regard to higher education of the people of India but nothing virtually seems to have been done for the agricultural population. The Conference has done an immense service to the people by proposing the resolution above alluded to and if govt. takes any steps in respect of it much good will result to the people.

There is another and very important point in respect of improving the status of the agricultural interests and this does not seem to have been a subject of discussion before the Conference. This point is the opening of agricultural banks for the sole use of *bona-fide* agriculturists. The cultivators as a class stand in great need of money whenever there are sowing operations to be carried on. The money lenders are as a rule very extortionate in their dealings with the cultivators; and it would be a boon conferred upon the agriculturists of some provision in the shape of loan associations could be made to meet the wants of the agricultural population. The Tehasildar of Amraoti Mr. Krishnaji Hari we hear has a scheme under contemplation of starting village associations for lending money at a moderate rate of interest to the needy cultivators for purposes of agriculture. It would be a very good thing if the scheme could be worked up and put before the Government in a tangible shape. We hope to discuss the whole question of agricultural banks at some future date.

EDITORIAL NOTES.

The Agricultural Conference.

An agricultural conference was held in this month at Simla under the orders and authority of the Government and the needs of the agricultural class and the necessity and utility of agricultural improvements were discussed at the sittings of the conference. The Report of the conference embodying the suggestions and remedies for the improvement of agriculture in the country, has been, or will be, submitted to the government. And until the Report is published, we shall not be able to discuss this question in the proper manner. But one thing, one principal fact has struck us most, and we cannot help remarking that it shows the apathy of our people in general and of the educated community in particular. It has been admitted on all hands that agriculture is the staple industry of the country and the bulk to the extent of more than three fourths of the population is of agriculturist class. Moreover it has been persistently but very truly urged by many influential gentleman--natives and Europeans-on many occasions that to improve the country and make it more happy means practically to improve the agricultural industry and better the condition of the agricultural class. And yet we have observed very painfully that the agricultural conference attracted no considerable notice— and it would not be too much to say that it attracted no notice at all— from our people of light and literature. No reporters of our more fortunate brethren of the native press were sent to the conference, nor any delegates attended the sittings. We are not aware if the Government had specially prohibited any reporters and correspondents of the Native press, or any delegates and spectators from attending the conference. But we are sure and confident that the government would have most gladly made even special arrangements for our people to take direct or indirect part in the conference, if they had seen an earnest desire on part of our people for the purpose. At any rate no signs were shown by our educated people as to the importance of the conference; and the result of all this is that though the conference held and finished its sittings, the majority of our people are quite ignorance of it. To what should we attribute this result— this melancholy and disgraceful result— but to the characteristic apathy and indifference of our leaders. Or were our leaders in Government service afraid of Government brow-beating and government displeasure, and were our other leaders too afraid of opposition of the orthodox community and their religious scruples?

Memorial to Professor Wordsworth

We are glad that pupils, friends and admirers of the learned Principal of the Elphinstone College in Bombay, intend to commemorate the invaluable services of Principal Wordsworth to the various communities in this country. The learned Principal has certainly claims on the obligations of the Native Community, and we are sure our people will not fail to discharge their duty in a most satisfactory and useful manner. Principal Wordsworth has justly been held not only a friend but also a guide to the Native community in educational, social and even political matters. He has sympathized with Native aspirations, and given the Native community on many a critical occasion very sound and sensible advice. Who of us will not bring to mind without feelings of admiration his vigorous letters full of free and frank opinions and views on the Ilbert bill question the Income Tax imposition, and the Hindoo marriage customs? Who of us will not appreciate with grateful feelings his broad sympathies with the natives, and his advocacy of the native cause before the Civil Service Commission in the regime of Lord Dufferin? We confidently hope that the right movement set up in Bombay to commemorate Principal Wordsworth's services by raising a fitting and useful memorial, will command co-operation from our community, and at least those who are capable of appreciating the Principal's services will respond liberally to the invitation o the Wordsworth memorial Committee in Bombay.

The Nawab of Cambay has been deposed for the recent serious disturbances in his state, and the administration is entrusted to Mr. Kennedy a special officer appointed by the Government of Bombay. The full facts of the circumstances leading to the deposition of the Native Ruler are not published yet, and we shall be wrong if we quarrel with the decision of the Government at this stage. But if we have correctly understood the matter that resulted in the *fracas*, we know that the Cambay government all along acted during the critical period under the strict advice of the Political Agent; and consequently the public have no small reason for surprise at the deposition of the Nawab. We do not know if there was anything more serious behind and beyond the unfortunate and melancholy incident. We hope the Government will publish the necessary particulars of the information on which the Government Resolution is based, and thus restore confidence among the people.

We learn that the Resident will visit Berars in the beginning of January 1891. The people will of course welcome him right loyally as the head of the Berar Government and the representative of our most Gracious Majesty the Queen-Empress. We also recommend our leaders to avail of this opportunity and present addresses welcoming the Resident and representing the needs and wants of the people in the province. The visits of the heads of Government are few and far between, and people are therefore loyally anxious to see their Ruler. Our Municipalities should bestir themselves and show to the Resident personally how efficiently and beneficially they are discharging their duties under the elective system. We insist on the attention of our Municipalities that this is the time to convince the Resident that they "do introduce reforms and do not allow their affairs to drift into confusion, even when left to themselves."

PLEADERS EXAMINATION.

September 1890.

Criminal Law

Time allowed three hours

I In what cases is an *order in writing* required under the provisions of the criminal Procedure Code, and who records it in each case. M. 10

II In what cases is there no appeal against the order or sentence of a Magistrate or Court. M. 10

III Describe the procedure of a Sessions court in trying a case. In what respect does the procedure of a magistrate trying a warrant case differ from that of the sessions court. M. 10

IV Define "Complaint" "Investegation" "offence" 'pleader' and 'public prosecutor' as used in the code of criminal Procedure. M. 10

V Name all the punishments which may be inflicted under the Penal Code giving the maximum and menimum in the cases in which the length or quantity is limited. Can a man ever be sentenced to transportation for 3 years. If you think so say in what cases. M. 15

VI Discuss the question of *negligence* in regard to criminal law. What forms of negligence are made specially punishable under the Penal Code. M. 10

VII What forms of *personation* are made specially punishable by the Penal Code. What is cheaking *by personation* M. 10

VIII In what cases is it necessary for an accused person on his trial for defamation to prove that the imputation was true. Is a witness punishable under section 500 I. P. C. if he says the complainant is a theif knowing the statement to be false. Is an accused person punishable under section 500 I. P. C. if he makes a similar imputation against the complainant. Is a pleader punishable under section 500 I. P. C. if he makes a similar imputation against the complainant. M. 15

IX A wanting to get some money for drink asks C a boy of six years of age to take B's jewels out of B's house and give them to D an accomplice. C does what he is asked to do. D sells the jewels to E telling him exactly how he came by them what offences if any have A C D and E committed. M. 10

वऱ्हाड.

मे० रेसिडेंट सा० यांची स्वारी वऱ्हाडांत येत्या जानेवारी ता० ५ रोजीं, येणार असें कळतें.

मे० कमिशनर सा० ता० २-११-९० चे सुमारास चिखलदऱ्याहून इलिचपुरास येतील व तथून इवऱ्यावर निघून पुढें सुमारें १९ दिवसांनीं उमरावतीस जातील असें समजतें.

मि० आर्बर्ड सा० ना कामाचा चार्ज देऊन कर्नल मेकेंझी सा० ता० १-११-९० पासून रजेवर जाणार आहेत.

मि० एलिअट सा० रजेवरून परत येऊन यवतमाळास आपलें कामावर रुजू झालें व पुन्हां सहा दिवसांचे रजेवर मुंबईस गेलें. तेथून यवतमाळास जाऊन मि० हेअर सा० यांना कामाचा चार्ज देतील व नंतर येथें येऊन मि० आर्बर्ड सा० पासून सिव्हिल आणि सेशन जज्जचें कामाचा चार्ज घेतील.

कर्नल लेन सा० रजेवरून परत आले.

यंदाचे वकिलीचे परिक्षेंत पास झालेल्या उमेदवारांचीं नांवें रेसिडेन्सी आर्ड वरून खालीं देतों:—

रा० रा० रघुनाथ नारायण ठोसर, गोविंद केशवराव चावक, पद्मनाभ रावजी दंडे, वासुदेव बाळाजी पिंपळीकर, आणाजी रामचंद्र पिंपळीकर, विश्वनाथ काशिनाथ काळें, नारायण रामचंद्र गढीकर, रामचंद्र रघुनाथ बापट, वासुदेव कृष्ण डांगे, विनायक सावळाराम ओक विनायक विष्णु गोखले.

रा० रा० त्रिंबक पांडुरंग कजवाडकर मु० आ० व्हाक्सिनेशन जि० अकोले यांस ता० १७ रोजीं पुण्यास देवाज्ञा झाली. हें क्षयानें तीन महिने अजारी होते.

यंदाच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेकरितां १३ विद्यार्थी अकोले हायस्कुलांतून जाणार.

वर्तमानसार.

नव्या युक्त्या — अमेरिकन लोकांच्या युक्त्या व कल्पना यांणी सर्व लोक दिवसेंदिवस थक्क होऊन जात आहेत! अगदीं अलीकडे वाशिंग्टन शहरांत पुढें लिहिलेल्या नवनव्या वस्तू निघाल्या आहेत. एक बाहुली अशी तयार केली आहे की, ती दूध पिते! मुलांची दुग्धपानक जी कुपी असतें तिची रबरी नळी ह्या बाहुलीचे तोंडाला लाविली ह्मणजे त्या कुपींतलें दूध ती बाहुली शोषून घेतें! याचप्रमाणें, एक दूध देणारी गाय तयार केली आहे. ती इतकी हुबेहूब आहे कीं, तिचेपुढें वैरण व पान्हवण ठेविलें ह्मणजे ती ते तोंडानें खाते व तिचे आचळ आढळे ह्मणजे त्यांतून दूध निघते! एक प्रकारचे मांजर केलें आहे तें धांव मारतें व तोंडानें म्यांव म्यांव् करिते! त्याचे योगानें उंदीर नाहीसे होतात व जेथें हें मांजर असतें तेथें त्यांचा शद्ब एकन उंदीर यईनासे होतात! आणि याचप्रमाणें, एक प्रकारची कोंबडी तयार केली आहे. ती अंडी देते! ही कोंबडी आपल्या खुराड्यांतून बाहेर येते, एक अंडे टाकते, कीं, झट्कर खुराड्यांत जाते! ह्या सर्व नवीन वस्तू निर्जीव असून त्यांचेकडून खऱ्या व जीवंत प्राण्यांप्रमाणें कामें होतात व तीं पाहून खरोखर मोठें आश्चर्य वाटतें! याचप्रमाणें, नाक सरळ करण्याचेंही एक यंत्र निघालें आहे। नाकाला तेल लावून, हें यंत्र रोज रात्रीं नाकाला लावलें ह्मणजे एका आठवड्यांत नाक पाहीजे तसें सरळ व लांब होतें ! या सर्व युक्तीवरून अमेरिकन लोकांना प्रतिविश्वकर्मा म्हणण्याची योग्यता येणार, असें दिसतें! पु० वै०

आयर्लंडांत बटाट्याचें पीक यंदाचें सालीं झाले नसल्यामुळें तिकडें दुष्काळ पडण्याची भिती दिसत आहे; त्या कारणानें मुंबईचे व्यापारी दुष्काळ निवारकास कोणतामाल पाठवू शकतील याजबद्दल विचारण्यांत आले आहे.

कुशाईप्रांतांतील दंगेवाईक लोकांवर पाठविलेल्या पोलिस फौजेनें बंडखोरावर हल्ला करून त्यांस ताब्यांत घेतल्याची खबर मिळते. पकडलेल्या लोकांची व्यवस्था कशी करावी त्या विचारासाठीं कमिशनर मि० लायल सिमल्यास गेले आहेत.

सियामची सरहद मुकरर करण्यासाठीं येत्या हिवाळ्यांत लष्करी फौज सरकार पाठविणार.

पुढील वर्षी करितां हिंदुस्थान सरकारानीं लढाईच्या कामी उपयोगी पडण्यासाठीं खालीं दाखल केलेले सरजाम मागिवल्याचें कळतें.

१ नंगी तोफा १०
२ तोफखान्याचें सामान.
३ बलकुबलीच्या वेळी स्वारांच्या व पायदळाच्या उपयोगी पडणारें अवश्य सामान.
४ लढाऊ किल्ले रसातली मिळविता येणाऱ्या यांत्रिक १४ तोफा.
५ " माटिं हेनरी " यांच्या कारखान्यांतील ७१००० बदुका.

वरील मागणीवरून पुढील सालीं कोठेतरी चकमक उडणार असा रंग दिसतो.
म० मि०

झांबेसी नदीवर ब्रिटिश लढाऊ जहाजें गेल्यामुळें पोर्चुगाझ सरकार व ब्रिटिश सरकार यांजमध्यें कुरकुर उत्पन्नझाली आहे.

खंबायत खाजिन्यांत शिल्लक सगळी २ रुपये ८ आणे सांपडली. संस्थानच्या नोकरांचा मागील चार महिन्यांचा पगार देणें राहिला आहे. सरकारानें ही सर्व अव्यवस्था सुधारण्यासाठीं मेजर केनडी पोरबंदरचे माजी कारभारी यांस नेमलें आहे.

२०० नवे पोलीस शिपाई व त्यांच्या मुख्य अमलदारींचे जाग्यावर एकयुरोपिअन नेमण्यांत येण्याबद्दल हुकूम झाला आहे.

सर साम्युअल व लेडी बेकर हे हिंदुस्थानास येण्यासाठीं विलायतेहून निघाले.

मध्यप्रांतांत लांडग्यांचा फार सुळसुळाट झाला आहे व त्यांनीं सुमारें ४० गुराखी मारले. प्रत्येक लांडग्या बद्दल २५ रुपये देणगीचे सरकारानें ठरविले आहे.

न्यूयार्कची लोकसंख्या: १५,१३,९०१ आहे ह्मणजे मुंबईच्या सरासरी दुप्पट आहे असें ह्मटलें तरी चालेल.

कोलंबो व रशिया यांजमध्यें, लवकरच व्यापार चालूं होईल.

क्यांबेच्या नबाबास दोन वर्षें मुंबई सरकारानें त्यांच्या गादीवरून त्यांस पदच्युत केले.

मि. केशवलाल हिरालाल यांस क्यांबेचे दिवाण नेमलें व त्यांनीं आपल्या कामाचा चार्ज घेतला.

रशिया व इराण यांच्या मध्यें एकनवा तह होणार आहे असें समजतें.

पुण्यांत कांटोनमेंटमध्यें विजेचे दिवे लावण्याचा विचार चालला आहे असें समजतें. सु० प०

रोम येथील ख्रिस्ती धर्मगुरु (पोप महाराज) यांचे वार्षिक उत्पन्न ४८०००० पौंड आहे. ह्याशिवाय त्यांनां देणग्या वगैरे मिळतात त्या निराळ्याच.

अस्त्रेलियामध्यें कांगरू नांवाचे एक जनावर आहे ते ६० पासून ७० फूटपर्यंत लांब व १५ फूट उंच अशी उडी मारूं शकतें असे ह्मणतात,

अमेरिकेंतील प्रसिद्ध विद्युच्छास्त्रकलानिपुण एडिसन साहेब यांणीं केलेल्या बोलक्या भावल्या लंडन येथें आहेत. त्या कांहीं कविता व येशू ख्रिस्ताची एक प्रार्थना ही म्हणतात

झाडांवर आगगाडीचारस्ता:— कॅलिफोर्नियामध्यें एके ठिकाणीं समुद्र किनाऱ्यानें आगगाडीचा रस्ता गेला आहे, तो खरोखरच झाडांवरून रूळ टाकून नेला आहे, तिकडे झाडें मोठमोठीं आहेत, त्यांचे शेंडे खोडापर्यंत सारख्या उंचीचे कापून त्यांजवर पुलाप्रमाणें रूळ बसवून आगगाडीचा रस्ता नेला आहे. यामुळें भराव वगैरे टाकण्याचा खर्च अजिबाद वांचला आहे. अमेरिकेंतील लोकांच्या एकेक योजनेची कमाल आहे.

प्यारिस येथील 'ऐफेल टॉवर' पेक्षांहि उंच जो एक 'टॉवर' लंडन येथें होणार आहे त्याचा उपयोग कांहीं एका नवीनच प्रकारांत करून घेण्याचें तेथील कल्पक लोकांनीं योजले आहें असें कळतें. हा अतिशय उंच होणार असल्यामुळें यांचे शिखराजवळील हवा फारच शुद्ध असणार आहे. तेव्हां तेथें यंत्रें टेऊन त्या यंत्राच्या योगानें तेथील ती शुद्धहवा खालीं आणवावयाची आणि नळ्यांच्या योगानें 'ग्यास' किंवा पाणी यांच्यासारखा तिचा सर्व शहरभर पुरवठा करून द्यावयाचा! कु०शि.

पृथ्वीवरील तारायंत्राच्या सर्व तारा मोजल्या तर त्यांची लांबी सुमारें २५ लक्ष मैल भरेल असें न्यूयार्क ट्रिब्यून कर्त्याचे ह्मणणें आहे.

मुनिसिपालिट्यांनीं रेलवे कंपन्या जबळून करघ्यावे किंवा नाहीं, व घेतले असतां कोणत्या प्रमाणावर घ्यावे, याचा विचार करण्याकरितां सरकारानें कॅपटन आर. सी. टेंपल यांची मुद्दाम योजना केली आहे.

पांच खून—काठेवाडांत जसिया नांवाच्या स्टेशनावर भयंकर खून झाल्याची खबर आली आहे. त्याची हकीकत अशी आहे कीं, सरर स्टेशनावर एक रजपुत आल्या पत्नीसह आगगाडींतून प्रवास करण्याच्या उद्देशानें आला. गाडीची वेळ झाल्यावर कांहीं कारणानें त्याची गाडी चुकली आणि एक दिवस तेथेंच राहण्याचा त्याला प्रसंग आला त्यामुळें बाजारांतून कांहीं खाण्याचे जिन्नस आणण्या करितां तो आपल्या बायकोला स्टेशनावर एकटीच बसवून बाजारांत गेला. बायकोला एकटीच पाहून स्टेशनावरील रेलवे नोकरांनीं तिच्यावर बलात्कार केला. हा रजपूत गृहस्थ बाजारांतून परत आल्यावर बायकोनें झालेली सर्व हकीकत त्याला सांगितली त्या वरून त्याला अतिशय संताप उत्पन्न होऊन त्या आवेशांत त्यानें आपल्या तरवारीनें वरील नोकरांचे तुकडे केले? त्या मुळें रेलवे स्टेशनावर धोळा येथून आलेल्या तारेचा जाब देण्यास कोणीच राहिला नाहीं. हेच्हां काय प्रकार घडला हे पहाण्या करितां गाडीसह एक एंजीन जाळिया स्टेशनावर आलें. गाडीनें झालेल्या प्रकरणाची चौकशी करून सदर रजपूत गृहस्थास धोळा स्टेशावर चलण्यास विनंती केला त्यावर त्यानें आपल्या बायकोचा विचार घेतला. तेव्हां तिनें सांगितलें कीं, आपण निघून गेल्यावर येथें माझ्यावर आणखी कोणता प्रसंग गुजरेल हे सांगवत नाहीं. यावरून सदर रजपुतानें आपल्या बायकोस ही तरवारीनें छाटून टाकली तिच्या सुद्धां एकंदर पांच खून झाले! जारकर्मांचा केवढा हा अनिवार त्वेष! पुढची हकीकत समजली नाहीं.

तेलाचा झरा— आसमाम रेल्वे कंपनीला लखमिपूर डिस्ट्रिक्ट मध्यें ६१५ फुटांवर तेलाचा झरा लागला आहे. ते तेल फारच जोरानें कारंज्या सारखे वर उसळून येत आहे. ज्या० सिं०

सिलोनद्वीपाशीं परस्पर व्यापारसंबंधी दळणवळण राखून तेथील चहारूप देशाध्यें व्यापाऱ्यां कडून खपविण्याची व्यवस्था ठेवावी, असा रूस सरकारच्या व्यापारी खात्यांतील प्रधानाचा विचार ठरला आहे. सेंटपीटर्सबर्गची तारीख १६।१० ची तार.

राणीसरकारच्या राज्याचें पृथ्वीवर एकंदर क्षेत्रफळ ८,५५,७६, ५५८ मैल आहे.

मथुरेस एका स्त्रीला तीन हातांची मुलगी झाली आहे.

कलकत्याचे कोणी बाबू दि. टाकूर आहेत त्यांणीं कांचेचे शिसे कुप्या वगैरे कांपण्यासाठीं एक नव्या प्रकारची कात्री शोधून काढली आहे!

विलायतेंत शेतांमध्यें मजूरी करणाराला २ रुपये रोजप्रमाणें प्राप्ति होते. इकडे बी. ए. एम् ए. वाल्यांसही इतकी प्राप्ति होत नाहीं। उद्योगाचें महत्व असेंच आहे.

रेल्वेची वृद्धि.—या वर्षीं गोद्रा—रतलाम लाईन वाढविण्या करितां बी. बी. आणि सी. आय्. रेल्वेकडे सरकारानें ८ लाख रुपये दिले. व कारोमांडल किनाऱ्यावरील रेल्वेचें काम सुरू करण्यासाठीं ५ लाख रुपये दिले.

विलायतेस मि. ग्ल्याड्स्टनसाहेबांचें भाषण एके ठिकाणीं झालें तें सर्व भाषण फोनोग्राफ यंत्राच्या पेटींत एकानें भरून घेऊन तो पेटा आस्ट्रेलियांत नेला व तेथें तो पेटा उघडून ग्ल्याड्स्टन् साहेबांचें सर्व भाषण अक्षरशः तेथील जमलेल्या लोकांस ऐकविण्यांत आलें. व तेणेंकरून त्या श्रोतृमंडळीस अत्यंत आनंद झाला! यंत्र कला काय काय चमत्कार करून दाखवील याचा आज काय नियम सांगावा! ज्ञा० प०

पंजाबांतील पूर्वेकडील तालुक्यांतील बहुतेक लोकांनीं मुसलमान लोकांस गाई वगैरे मुळींच विकावयाच्या नाहींत, असा निर्धार केला आहे.

उकड पोळी करण्याची कृति.

गव्हांचे सपीट [मैदा] शेर १ घेवा अथवा खडीसाखर शेर १, उष्ण करून शीतळ स्थळी शिजावलेलें तूप १, शेर घेऊन, हे तीन पदार्थ एकत्र चांगलें मळून त्याच्या लहान लहान चकत्या बत्ताशाएवढ्या कराव्या. नंतर सारखा जुवा जमेल अशा दोन तांब्याच्या, आंतून कलई केलेल्या परातीं घेऊन त्यापैकीं एका परातींत कोरा कागद पसरून त्यावर त्या चकत्या, अंतरानें सारख्या ठेवाव्या. नंतर त्याजवर दुसरी परात झांकून त्याच्या खालवर कोळशांचा अग्नि, सुमारानें घालून त्या पोळ्या उकडूं द्याव्या व त्याचवास येऊं लागला ह्मणजे तयार झाल्या असें समजून त्यांतून काढून घ्याव्या.

तूप कमी खर्च करण्याची युक्ति.

तुपांत भुईमुगाचें कांहीं दाणे वांटून टाकावें; तेणेंकरून तूप कडू न लागतां चांगलें लागतें आणि गिरटी वळतें; तेणेंकरून शेर तूप ज्याठिकाणीं खपावयाचें तेथें अच्छेर खपतें. कोठेंकोठें अशी चाल आहे कीं, समुदायाचे भोजनांत ज्यास्ती तूप खर्च होऊं नये ह्मणून त्या तुपांत लोखंड तापवून विझवितात, तेणेंकरून तें तूप कडू मात्र होते आणि तें खाणारास समजून येतें. हु. चे.

अकोलें बाजारभाव

हुंडी मुंबईची दर्शनीं			१००।॥
" १५ दिवसाच्या मुदतीची			१००८=
सुवर्ण....	२१	रुपें	१०८
आळशी खंडीस	८५॥	उडीद	६५
गहूं काठे	६०	बनशी	६७॥
जवारी	४०	चणे	६९
सर्की	४८=	मीठ	४८≡
तूप	७॥	तेल	४॥।=

सध्याचे भाव

जवारी	वसंत संवत	१९४७	४३
गहू	वैशाखशुद्ध	१९४७	५८
आळशी	चैत्रशुद्ध	१९४७	७९॥।≡
रुई	फाल्गुन शु.	१९४७	५७॥।–
सर्की	व. नवे सालाची	१९४७	३॥। ॥

☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.